

उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशाला मनपाचा ठेंगा शेवटचे पान

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



आंतरजातीय विवाह अनुदानाचा संसाराला हातभार! शेवटचे पान

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २०६ ■ नाशिक, मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## बीसीसीआयचा नऊ खेळाडूंना डच्चू

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२५ दरम्यान बीसीसीआयने टीम इंडियाच्या केंद्रीय करारांची यादी जाहीर केली आहे. यावेळी एकूण ३४ खेळाडूंना बीसीसीआयचा केंद्रीय करार मिळविण्यात यश आले आहे. ज्यामध्ये अनेक तरुण खेळाडूंची नावे समाविष्ट आहेत. परंतु बीसीसीआयने ९ खेळाडूंना केंद्रीय कराराच्या यादीतून काढून टाकले आहे. बीसीसीआयने प्रथमच एकूण ९ खेळाडूंना केंद्रीय कराराचा भाग बनवले आहे. त्याच वेळी, रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा यांसारख्या अनुभवी खेळाडूंना ग्रेड + मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. मात्र आर. अश्विन, शार्दुल ठाकूर, जितेश शर्मा, के. एस. भरत, आवेश खान, विजयकुमार वैश्यक, उमरान मलिक, यश दयाल आणि विदावथ कवेरप्पा यांना यावेळी केंद्रीय करार देण्यात आलेले नाही. आर अश्विनने आधीच आंतरराष्ट्रीय क्रिकेटला निरोप दिला आहे, म्हणूनच तो या यादीतून बाहेर आहे. शार्दुल ठाकूर, केएस भरत आणि आवेश खान हे काही काळापासून टीम इंडियाकडून खेळलेले नाहीत, ते संघाच्या योजनांचा भाग देखील नाहीत, त्यामुळे त्यांनाही वगळण्यात आले आहे. त्याच वेळी, जितेश शर्माला गेल्या वर्षी केंद्रीय करार मिळाला होता, परंतु तो फार काही करू शकला नाही, त्यामुळे बीसीसीआयने त्याला यावेळी वगळले आहे. त्याच वेळी, निवड समितीने गेल्या वेळी विजयकुमार वैश्यक, उमरान मलिक, यश दयाल आणि विदावथ कवेरप्पा यांना /-...४

# सुवर्ण भरारी ; एक लाखाचा टप्पा ओलांडला

## अक्षय तृतीयेपुर्वीच सोने भावाने साधला भाववाढीचा मुहूर्त

**नवी दिल्ली : सोमवारी वायदे बाजार उघडताच सोन्याच्या दराने मोठी उसळी घेतली. सोमवारी (दि. २१) सकाळी एक तोळा म्हणजे १० ग्रॅम सोन्याचा भाव १ लाख ११६ रुपयांवर पोहोचला. यामध्ये वस्तू व सेवा कराच्या रक्कमेचा समावेश केल्यास ग्राहकांना एक तोळा सोने खरेदी करण्यासाठी १ लाखांपेक्षा जास्त पैसे मोजावे लागणार आहेत.**



राज्यात सोन्याचा नेमका दर किती?

| | |
|---|---|
| मुंबई | १ लाख ११६ रुपये प्रति तोळा |
| पुणे | ९९,१०० रुपये जीएसटीसह |
| जळगाव | २४ कॅरेट सोने ९९६०० |
| जळगाव | २२ कॅरेट सोने : ९१२४३ |
| धुळे | २२ कॅरेट : ८८ हजार ५८० |
| धुळे | २४ कॅरेट : ९६ हजार ७०० |

अमेरिकेच्या नव्या टॅरिफ धोरणामुळ जगभरातील भांडवली बाजारांमध्ये प्रचंड मोठी उलथापालथ झाली आहे. तसेच चीन आणि अमेरिका यांच्याकडून एकमेकांवर जास्तीत जास्त कर लावण्याचा सपाटा सुरु आहे. या दोन महासत्तांमधील व्यापार युद्धामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर अस्थिर वातावरण निर्माण झाल्याने गुंतवणुकीचा सर्वात सुरक्षित पर्याय असणाऱ्या सोन्याच्या दरात मोठी वाढ झाली आहे. जागतिक बाजारात ऐतिहासिक पातळीवर सोन्याचा दर गेल्यानंतर देशांतर्गत देखील सोन्याच्या भावाला झळाळी मिळाली आहे. जळगावच्या सुवर्ण नगरीत सोन्याचे दर लाखांच्या उंबरठ्यावर जाऊन पोहोचले आहे. सोन्याचे दर आज ९६२०० तर जी एस टी सह हेच ९९२०० वर जाऊन पोहोचले आहेत. लवकरच सोन्याचा दर जीएसटी वगळता एक लाख रुपयांचा टप्पा गाठेल, असा अंदाज आहे. ३० एप्रिलला अक्षय तृतीया आहे. हा साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक मुहूर्त समजला जातो. यादिवशी सोन्याचा भाव एक लाखांचा टप्पा ओलांडेल, असा अंदाज होता. मात्र, त्यापूर्वीच सोन्याच्या भावाने लाखाचा टप्पा पार केला आहे. त्यामुळे अक्षय तृतीयेच्या दिवशी सोन्याचा भाव नवा उच्चांक गाठेल, अशी शक्यता आहे. जानेवारी महिन्यापासून सोन्याच्या भावात चढ-उतार होताना दिसले आहे. १ जानेवारी २०२५ रोजी, २४ कॅरेट सोन्याचा दर ७७,५७७ रुपये प्रति १० ग्रॅम होता, तर ३१ जानेवारी २०२५ रोजी तो ८३,१०७ रुपये प्रति १० ग्रॅम पर्यंत पोहोचला. त्यानंतर आता सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅमला ९९,५०० इतका झाला आहे. आगामी काळात सोन्याचा भाव असाच वाढत जाईल, असा अंदाज जाणकारांनी वर्तवला आहे. यंदाच्या वर्षाच्या शेवटापर्यंत एक तोळा सोन्याचा भाव हा २ लाखांची पातळी गाठेल, असे भाकीत काही तज्ज्ञांनी वर्तविले आहे. तसे घडल्यास लग्नसराईसाठी सोने खरेदी करणे, सर्वसामान्यांना अवघड होईल.

## कॅथोलिक ख्रिश्चन धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांचे निधन

### पहिले गैर युरोपियन पोप होण्याचा बहुमान



**नवी दिल्ली :** कॅथोलिक ख्रिश्चन धर्मगुरू पोप फ्रान्सिस (वय ८८) यांचे निधन झाले. पोप फ्रान्सिस हे इतिहासातील पहिले लॅटिन अमेरिकन पोप होते. पोप यांचे शेवटचे सार्वजनिक दर्शन ईस्टरच्या शुभेच्छा देताना झाले. पंतप्रधान मोदींनी यांनी पोप यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून ते आरोग्याच्या समस्यांनी त्रस्त होते. १४ फेब्रुवारी रोजी त्यांना रोमच्या जेमेली रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर न्यूमोनिया आणि अशक्तपणाचा उपचार सुरू होता. फफ्फुसाच्या संसर्गामुळे त्यांना पाच आठवडे रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. पोप फ्रान्सिस हे एक हजार वर्षांत पोप म्हणून निवडले जाणारे पहिले बिगर-युरोपियन होते. पोप फ्रान्सिस यांनी समलैंगिकांना चर्चमध्ये येण्याची परवानगी देणे, समलैंगिक जोडप्यांना आशीर्वाद देणे आणि पुनर्विवाहाला धार्मिक मान्यता देणे असे मोठे निर्णय घेतले. चर्चमध्ये मुलांवरील लैंगिक शोषणाबद्दल त्यांनी माफीही मागितली. पोप फ्रान्सिस हे अर्जेंटिनाचे जेसुइट धर्मगुरू होते जे २०१३ मध्ये रोमन कॅथोलिक चर्चचे २६६ वे पोप बनले. त्यांना पोप बेनेडिक्ट सोळावे यांचे उत्तराधिकारी म्हणून निवडण्यात आले. पोप यांनी /-...४

## उध्दव ठाकरे- राज ठाकरे युतीबाबत आता चर्चा नको

### राज ठाकरे याच्या कार्यकर्त्यांना सुचना



**मुंबई :** उध्दव ठाकरे-राज ठाकरे युतीबाबत आता चर्चा नको, अशा सूचना राज ठाकरे यांनी मनसे कार्यकर्त्यांना दिल्याचे समजते. युतीबाबत माध्यमांशी न बोलण्याचे आदेश शिवतिर्थावरुन देण्यात आले आहेत. २९ एप्रिल रोजी राज ठाकरे मुंबईत आल्यानंतर या विषयावर ते बोलण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंसोबत एकत्र येणे शक्य असल्याचे विधान महेश मांजरेकरांना दिलेल्या मुलाखतीत केले. थोड्याच वेळात उद्धव ठाकरेंनीदेखील आपल्या भाषणातून याला प्रतिसाद दिला. यानंतर महाराष्ट्राचे राजकारण चांगलेच तापले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी यावर प्रतिक्रिया दिल्या. कुटुंब एकत्र येत असेल तर त्याचे स्वागत असल्याची प्रतिक्रिया सर्व स्तरातून येतेय. दरम्यान राज ठाकरे यांनी मनसे कार्यकर्त्यांना यासंदर्भात सूचना केल्या आहेत. राज ठाकरेंनी दिलेल्या टाळीनंतर उद्धव ठाकरेंनी मात्र, युतीसाठी अटी-शर्थी टाकल्या आहेत. भाजपसोबत बोलू नका, शिंदेंना घरी बोलावू नका, अशा अटी घातल्याचे समजते. उद्धव ठाकरेंच्या याच अटी-शर्थींवरुन मनसे नेते आक्रमक झाले आहेत. उद्धव ठाकरेंच्या अटींवरुन मनसे नेते संदीप /-...४

### शरद पवार-अजितदादांमध्ये पुण्यात बैठका

## ठाकरे बंधूनंतर आता काका-पुतण्यातही मनोमिलन?



**पुणे :** पुण्यातील साखर संकुलात राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यात महत्त्वाची बैठका झाल्याचे समजते. वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या कामकाजासंबंधी बैठक आयोजित करण्यात आली होती. साखर संकुलातील बैठकीनंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात वेगळी बैठक देखील झाली. यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

सोमवारी (दि. २१) सकाळी सर्वात आधी एआय तंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रात कसा वापर करावा? या संबंधित बैठकीत चर्चा करण्यात आली. त्यानंतर वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या कामकाजासंदर्भात काही अधिकाऱ्यांसोबत चर्चा झाली. यानंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात वेगळी महत्त्वाची बैठक झाली. गेल्या काही दिवसांमध्ये अजित पवार हे जाहीरपणे शरद पवार यांच्यासोबत बैठक आणि कार्यक्रमांना उपस्थित राहत आहेत. या आधी अजित पवार शरद पवारांसोबत बैठका किंवा कार्यक्रम टाळत असल्याचे दिसून येत होते. वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूटच्या बैठकीला अजित पवार हे उपस्थित राहत नव्हते. मात्र मागील बैठकीला अजित पवार हे बैठकीला आले आणि त्यांनी शरद पवार यांच्यासोबत बैठकीत चर्चा देखील केली होती. त्यानंतर सातारा येथे रयत शिक्षण संस्थेच्या बैठकीत अध्यक्ष म्हणून शरद पवार उपस्थित होते. तर कार्यकारी मंडळावर अजित पवार असल्याने ते देखील त्या बैठकीला उपस्थित होते. आता पुन्हा अजित पवार आणि शरद पवार हे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या बैठकीला एकत्र उपस्थित राहिले आहे. अजित पवार आणि शरद पवार यांच्या एक वेगळी बैठक देखील झाली. तसेच गेल्या काही दिवसांपासून अजित पवार यांनी भाषणात बोलताना काकांचा आशीर्वाद घ्यावा लागतो, असे वक्तव्य केले होते. एकीकडे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीच्या चर्चा राजकीय वर्तुळात रंगल्या आहेत. तर आता पवार काका पुतण्याचेही मनोमिलन होणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आपल्याला सकारात्मक दृष्टिकोन ठेवायचा आहे

### उद्धव ठाकरेंचा कार्यकर्त्यांना संदेश



**मुंबई :** उद्धव ठाकरेंनी संदेश दिलाय की, आपल्याला सकारात्मक दृष्टिकोन ठेवायचा आहे. आपल्याला भविष्याचा विचार करायचा आहे. तुम्ही कोणीही या संदर्भात वेगळी भूमिका मांडायची नाही. चार भिंतीमध्ये आपण बोलू शकतो. पण, हा नवीन प्रवाह सुरू होत आहे. तो प्रवाह गढूळ करण्याचं काम आम्ही आमच्याकडून कदापि करणार नाही, असे वक्तव्य शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केले आहे.

संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी एकत्र येऊन महाराष्ट्राचे राजकारण आणि राजकारणाची सूत्र हातात घेतली पाहिजे, ही आतापर्यंत लोक भावना आहे. महाराष्ट्राच्या मनात जे आहे ती भावना राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे या दोघांनीही व्यक्त केली. दोघांनीही आपापल्या भूमिका मांडल्या आहेत. जेव्हा दोन प्रमुख नेते अशा भूमिका मांडतात, तेव्हा त्या आपण गांभीर्याने घेतल्या पाहिजे आणि पुढे जायला पाहिजे. काही लोकांना त्याविषयी वेदना होणार आहे. कारण उद्धव आणि राज ठाकरे एकत्र झाले किंवा राजकारण एकत्र केलं तर आम्हाला कायमचं शेतावर जावे लागेल, असा टोला त्यांनी /-...४

### महत्त्वाचे

#### सभेला गर्दी नाही; जिल्हाध्यक्षांचे निलंबन

**पाटणा :** बिहार राज्यातील बक्सर जिल्ह्यात काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या जाहीर सभेसाठी अपेक्षित गर्दी न जमवता आल्याने काँग्रेसने जिल्हाध्यक्ष मनोज कुमार पांडे यांना पदावरुन निलंबित केले आहे. बक्सर येथे २० एप्रिल रोजी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष खर्गे यांच्या सभेसाठी सर्वतोपरी तयारी करण्यात आली होती. मात्र, सभेच्या ठिकाणी लोकांची संख्या कमी होती, अपेक्षित गर्दी या सभेला काँग्रेसला जमवता आली नाही. त्यावरुन, पक्षातही कुरबूर झाल्याने पक्षाच्या राज्यातील वरिष्ठांकडून कारवाई करण्यात आली आहे. लवकरच बक्सर जिल्हाध्यक्षपदी नवीन नियुक्ती केली जाणार असल्याची सूत्रांची माहिती आहे.

#### कोब्रा कंमाडोंकडून नक्षलवाद्यांचा खात्मा

**धनबाद :** झारखंड राज्यातील बोकारो जिल्ह्यातील लुगू पहाडी प्रदेशात सुरक्षारक्षक आणि नक्षलवाद्यांच्या चकमकीत ८ नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. त्यामध्ये, नलक्षी चळवळीचा म्होरक्या आणि १ कोटी रुपयांचे पारितोषिक असलेल्या भाकपा माओदी केंद्रीय कमिटीचा सदस्य मांझी उर्फ विवेक दा याचाही खात्मा करण्यात आला आहे. मांझीला ठार केल्याने नक्षलवादी चळवळीच्या एका युगाचा अंत झाल्याचे बोलले जाते. रविवारी रात्री पोलिसांना नलक्षवाद्यांसंदर्भात खबऱ्याकडून माहिती मिळाली होती. त्यानुसार, सुरक्षा जवानांनी संबंधित परिसरात कोंम्बिंग ऑपरेशन राबवून ८ नलक्षवाद्यांना कंठस्नान घातले. ललपनिया परिसरातील लुगू टेकड्या, बोकारो जिल्हा या ठिकाणी ही चकमक झाली. सकाळी ६ वाजल्यापासून पोलीस आणि नक्षलवाद्यांमध्ये ही चकमक सुरू होती.

## उच्च न्यायालयात नव्याने याचिका दाखल करा

### सातपीर दर्गा प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचे दर्गा ट्रस्टला निर्देश



**नाशिक : प्रतिनिधी** काठे गल्लीतील सातपीर दर्गा प्रकरणी महापालिकेच्याविरोधात दर्गा ट्रस्टने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. सोमवारी (दि.२१) या याचिकेवर सुनावणी झाली असता सर्वोच्च न्यायालयाने ट्रस्टला उच्च न्यायालयान नव्याने याचिका दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

काठे गल्लीतील अनाधिकृत असलेली सातपीर दर्गा महापालिका प्रशासनाने गेल्या आठवडयात चोख पोलीस बंदोबस्थात हटवली. त्यावेळी संतप्त जमावाने पोलिसांवर दगडफेक केल्याने परिस्थिती तणावपूर्ण झाली होती. दरम्यान सदर कारवाई चुकीची असून दर्गा अधिकृतच असल्याने महापालिकेच्याविरोधात दर्गा ट्रस्ट सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. पालिका प्रशासनाने १६ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजेच्या सुमारास कारवाई केली आणि पालिकेला सर्वोच्च न्यालयाचा इमेल दुसऱ्या दिवशी प्राप्त झाला. तोपर्यत पालिकेने दर्गाचा भाग काढून घेतला होता. महापालिकेला दर्गा प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्याची माहिती देण्यात आलेली नव्हती. तसे कोणतेही अधिकृत पत्र प्राप्त झालेले नसल्याने मनपाने कारवाईच्या दिवशीच सांगितले होते. १७ एप्रिला दुपारी स्थगिती आदेश मनपाला मिळाला. दरम्यान, द्वारका परिसरात सध्या तणावपूर्ण शांतता असून परिसरात पोलिसांनी चोख बंदोबस्त असून सर्व रस्ते खुले केले आहे. ट्रस्टची बाजु जाणून घेण्यासाठी प्रयत्न करण्यात आले, मात्र संबंधितांचे मोबाईल बंद येत होते. सोमवारी सुनावणी ठेवली असता मात्र तत्पूर्वीच मनपाने कारवाई केली असल्याची माहिती न्यायालयात दिल्यानंतर ट्रस्टला उच्च न्यायालयात जाण्याचे आदेश देण्यात आले. सातपीर दर्ग्याबाबतचा स्थगिती आदेश सर्वोच्च न्यायालयाने रद्द केल्याची माहिती अतिरीक्त आयुक्त स्मिता झगडे यांनी दिली. उच्च न्यायालयात दर्गा ट्रस्टची याचिका असून त्यात मनपाने १६ एप्रिलाला कारवाई केली, तो मुद्दा टाकून दाद मागितली जाणार आहे.कॉग्रेसचे माजी खा. हुसेन दलवाई नाशिक दौऱ्यावर येत असून ते काठे गल्लीतील सातपीर दर्ग्याला भेट देणार आहेत.

## महिलेची हत्या करून संशयिताची आत्महत्या

### प्रेम संबधातून दुर्घटना घडल्याचा पोलिसांचा अंदाज

**सिन्नर : प्रतिनिधी**

माळेगाव येथील हिंदुस्थान युनिलिव्हर कंपनीत एकाच ठिकाणी कामावर असलेल्या विधवा महिलेच्या डोक्यात धारदार शस्त्राने वार करून तीचा खून केल्यानंतर संशयिताने गोंदे येथे येऊन शेतात कडुनिंबाच्या झाडाला गळफास घेत आत्महत्या केली. प्रेम संबंधातून हा प्रकार घडला असावा, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

शिल्पा अमोल पवार (वय २८, रा. मापारवाडी) असे मयत महिलेचे नाव आहे. तर महेंद्र सखाहरी रणशेवरे (वय ४८, रा. गोंदे, ता. सिन्नर) असे आत्महत्या केलेल्या पुरुषाचे नाव आहे. दोघेही माळेगाव औद्योगिक वसाहती मधील हिंदुस्तान युनिलिव्हर कंपनीत कंत्राटी पद्धतीने कामावर होते. सदर महिलेला १० आणि ८ वर्षांची दोन मुले आहेत. तर रणशेवरे यांनाही एक मुलगा, मुलगी आहे. रविवारी (दि.२०) दोघेही कंपनीत कामावर होते. सुरक्षारक्षक कॅबिनच्या शेजारी असलेल्या इलेक्ट्रिक केबिनच्या पाठीमागे निर्जनस्थळी हे दोघेही रविवारी सकाळी ९ वाजता सोबत जाताना सीसीटीव्हीत कैद झाले. या कॅबिनच्या पाठीमागच्या बाजूला सीसीटीव्ही नसल्याची संधी साधून रणशेवरे याने शिल्पा पवार हिच्या डोक्यावर धारदार शस्त्राने वार करत तिची हत्या केल्याची शक्यता आहे. त्यानंतर कंपनीतून गेट पास न घेताच सुरक्षा भिंतीवरून उडी मारून तो घरी आला आणि गोंदे येथे त्याने श्रीधर रणशवरे यांच्या शेतातील निंबाच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. सोमवारी (दि.२१) सकाळी कंपनीतील काही कामगार कामानिमित्त इलेक्ट्रिक केबिनच्या पाठीमागे गेले असता तेथे महिलेचा मृतदेह पडल्याचे निर्दशनास आल्यानंतर या प्रकाराला वाचा फुटली. श्वानाने इलेक्ट्रिक केबिनच्या पाठीमागून मुख्य रस्त्यापर्यंत माग काढला. त्यामुळे /-...४

## परिक्रमा मार्गाचा आराखडा दहा दिवसांत सादर करा

### मुख्यमंत्री फडणवीस : शहरातील प्रकल्पांबाबत घेतला आढावा



**नाशिक : प्रतिनिधी**

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिक येथे मुंबई, जव्हार, गुजरात, छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, धुळे, पुणे, मुंबई अशा मार्गाने भाविक येण्याची शक्यता आहे. त्या मार्गातील रस्त्यांचे बळकटीकरण करण्यासह त्या रस्त्यांवर वाहनतळांची सुविधा निर्माण करावी. नाशिक शहरात येणाऱ्या भाविकांना उत्तमोत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-बस एकात्मिक सुविधेचा प्रस्ताव तयार करा. नाशिकमधील रहदारीचे योग्य नियोजन करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करा. सोबतच परिक्रमा मार्गाचा (बाह्यरिंगरोड) आराखडा दहा दिवसात सादर करण्याचे निर्देश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंत्रालयात सोमवारी (दि.२१) नाशिक बाह्यवळण रस्त्याच्या कामांसह सिंहस्थ कामाच्या प्रस्तावीत प्रकल्पाचा आढावा घेतला. या बैठकीस जलसंपदामंत्री गिरीश महाजन, मुख्य सचिव सुजाता सौनिक, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीमकुमार गुप्ता, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले आदी उपस्थित होते. कुंभमेळ्याच्यानिमित्ताने नाशिक परिसरात वाढणारी रहदारी, संत-महंत, भाविकांची होणारी गर्दी यांचा विचार करुन योग्य नियोजन करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर नाशिक बाह्यवळण प्रकल्पाचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी तातडीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले. नाशिक शहरात येणाऱ्या भाविकांना उत्तमोत्तम वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ई-बस एकात्मिक सुविधेचा प्रस्तावही तयार करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर बाह्यवळण रस्त्यांतर्गत येणाऱ्या मार्गांची कामे प्राधान्याने हाती घेण्याचे निर्देश देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, नाशिक विभागीय आयुक्त आणि नाशिकचे पालक सचिव यांनी प्राधान्याने सुरु करावयाच्या रस्त्यांचा आराखडा येत्या दहा दिवसांत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर करावा. बाह्यवळण मार्ग, परिक्रमा मार्ग /-...४

#### महामार्गासाठी ५०० हेक्टरचे भूसंपादन

नाशिक बाह्यवळण मार्गातील १३७ किलोमीटरचे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत ग्रीनफील्ड अलाईनमेंटद्वारे उभारण्यात येणार आहेत. जुन्या नाशिक–मुंबई महामार्गापासून पुढील ६९ किलोमीटरचा मार्ग हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाफमार्फत बांधण्यात येणार आहे. यातील ४१ किलोमीटरचे रस्ते महापालिका हद्दीबाहेरून जातात. या रस्त्यांसाठी ४० गावांमधील ५०० हेक्टरचे भूसंपादन करावे लागणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## अश्विनी बिद्रे हत्याकांड; अभय कुरुंदकरला जन्मठेप

**नवी मुंबई :** अश्विनी बिद्रे हत्याकांडाचा निकाल अखेर लागला असून मुख्य आरोपी अभय कुरुंदकर याला न्यायालयाने जन्मठेप आणि २० हजार रुपये दंडांची शिक्षा सुनावली आहे. ही हत्या अत्यंत क्रूर पद्धतीने करण्यात आली होती, अशी गंभीर टिपणी यावेळी न्यायालयाने केली. या प्रकरणातील सहआरोपी महेश फळणीकर आणि कुंदन भंडारी यांना ७ वर्षांच्या शिक्षा सुनावण्यात आल्या आहेत. मात्र, या दोघांनी तुरुंगात आधीच आपली शिक्षा पूर्ण केली असल्याने त्यांची सुटका करण्यात येणार आहे.

सन २०१५ साली नवी मुंबईतील सहाय्यक पोलीस निरीक्षक अश्विनी बिद्रे या महिला अधिकाऱ्याचा गूढ मृत्यू झाला होता. तिची क्रूर पद्धतीने हत्या करून मृतदेहाचा पुरावा नष्ट करण्यात आला होता. मुख्य आरोपी अभय कुरुंदकर हा खुद्द पोलीस दलात कार्यरत असलेला अधिकारी होता. त्याच्यावर अश्विनीसोबत संबंध होते, मात्र त्यातून निर्माण झालेला संघर्ष आणि दबाव यामुळे त्याने तिची हत्या केल्याचे आरोपपत्रात नमूद करण्यात आले होते. अश्विनी बिद्रे यांचा २००५ साली हातकणंगले गावातील राजू गोरे यांच्यासोबत विवाह झाला होता. लग्न झाल्यानंतर एकाच वर्षात अश्विनी स्पर्धा परीक्षा पास झाल्या आणि त्यांना पोलीस उपनिरिक्षक पदी नियुक्ती झाली. पोलीस दलात रुजू /-...४

## महत्त्वाचे



### प्रज्ञाशोध परीक्षेत जैन प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे यश

**लासलगाव :** येथील जैन प्राथमिक शिक्षण मंदिर या शाळेमध्ये घेण्यात आलेल्या मंथन सामान्य ज्ञान प्रज्ञाशोध परीक्षेत विद्यार्थ्यांनी यश मिळवले. त्यामध्ये इयत्ता १ ली तील जिवा भोकनळ हा राज्यात २९ वा, जिल्ह्यात २४ वा, केंद्रात १ ला तर इयत्ता ३ री तील श्रीयांश गाडे हा राज्यात ४३ वा, जिल्ह्यात ३४ वा, केंद्रात २ रा, तसेच रोनक कासव हा राज्यात ४६ वा, जिल्ह्यात ३७ वा, व केंद्रात २ रा तसेच इयत्ता ४ थीतील आराध्या आव्हाड ही राज्यात २५ वी, जिल्ह्यात १८ वी व केंद्रात २ री तसेच स्वराज आनंद बकरे हा विद्यार्थी राज्यात ४१वा, जिल्ह्यात ३४ वा, व केंद्रात ४ था क्रमांक येऊन यश मिळवले.तसेच बी टी एस परीक्षेमध्ये इयत्ता २ री तील प्रचिती बोरसे ही राज्य गुणवत्ता यादीमध्ये १०५ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. या सर्व विद्यार्थ्यांना मुख्याध्यापिका लिनिता अहिरे, परीक्षा प्रमुख सतीश गाडे व सर्व वर्ग शिक्षकांनी मार्गदर्शन केले.



### वडाळीभोईत तीन दिवशीय कीर्तन महोत्सव

**सोग्रस :** चांदवड तालुक्यातील वडाळीभोई येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर वर्धापन दिन सोहळ्यानिमित्त आयोजित तीन दिवशीय कीर्तन महोत्सव उत्साहात झाला. याप्रसंगी दररोज महाअभिषेक, महाआरती, गीता पारायण, प्रवचन, हरिपाठ, आरती व विविध साधुसंत यांची कीर्तने झाली. या तीन दिवसीय कीर्तन महोत्सव कार्यक्रमात प्रशांत महाराज जाधव, बाळासाहेब महाराज शिंदे, समाधान महाराज पगार यांची प्रवचने आणि सोमनाथ महाराज कराळे, नारायण महाराज राजपूत, विश्वनाथ महाराज वाडेकर यांची कीर्तने झाली. नामदेव महाराज आळंदीकर यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. या कीर्तन महोत्सवा मधील काल्याच्या कीर्तनानंतर विनता विकास फाउंडेशन, भयाळे (तालुका चांदवडच्या) च्यावतीने उपस्थित त्यांना बेल या वृक्षाची रोपे सप्रेम भेट म्हणून देण्यात आली.



### देसाईंना नाभिक समाजरत्न पुरस्कार

**लासलगाव :** महाराष्ट्र राज्य नाभिक महामंडळाच्या वतीने टिटवाळा येथे कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी लासलगाव येथील. अरविंद देसाई यांना नाभिक समाज रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे अध्यक्ष सयाजीराव झुंजार, कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी नगरसेवक अनिल पंडित होते. दत्ता अनारसे महादेव चव्हाण यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन कोकण विभाग ठाणे जिल्हा सेक्रेटरी भाऊसाहेब शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नाभिक सेवा संस्था, मांडा-टिटवाळा मंडळ यांच्यावतीने करण्यात आले.



### ओझर बाणगंगानगर येथे बिबट्या जेरबंद

**दीक्षि :** निफाड तालुक्यातील ओझर बाणगंगा परिसरात गेल्या काही दिवसापासून धुमाकूळ घालणारा बिबट्या अखेर पिंजऱ्यात जेरबंद झाला आहे. बाणगंगा परिसरात अनेकदा नागरिकांना बिबटयाचा वावर दिसून आला. परिसरातील शेतकऱ्यानी वन विभागाशी संपर्क करत पिंजरा बसविण्याची मागणी केली. मागणीनुसार वनविभागाने रविवार २० एप्रिल रोजी शेतकरी मुक्तार कुरेशी यांच्या उसाच्या शेताजवळ पिंजरा लावला. पिंजरा लावून गेल्यानंतर एक तासातच बिबट्या पिंजऱ्यामध्ये जेरबंद झाला. वन विभागाच्या अधिकऱ्यांनी रात्री उशिरा बिबट्याला ताब्यात घेतले. या बिबट्यामुळे परिसरात मोठी दहशत होती रात्रीच्या वीज पुरवठ्यामुळे शेतीतील पिकांना पाणी देणे शेतकऱ्यांना कठीण होऊन बसले होते. शिवाय परिसरातील अनेक कुत्री व प्राण्यांवर या बिबट्याने हल्ले केले होते.

### खोकरविहीरला २०० रोलर ड्रमचे वाटप

**दिंडोरी :** रोटरी क्लब ऑफ नाशिक नॉर्थ, श्री. उद्यम फाउंडेशन, ऋणमुक्त सेवाभावी बहुउद्देशीय संस्था नाशिक, इनरव्हील क्लब ऑफ नाशिक, इनरव्हील क्लब ऑफ ठाणे, रोटरी क्लब ऑफ नाशिक, जल परिषद मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने खोकरविहीर ता. सुरगाणा येथे २०० कुटुंबांना जलचक्री व महिलांना चप्पल वाटप करण्यात आले, याप्रसंगी गीता पिंगळे, दिपाली चांडक, माधुरी महाजन, रुपल गुजराती, शितल देसाई, सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्तात्रय ढगे, चंद्रकिशोर पाटील, संजय परमार, जलमित्र तथा दिंडोरी नगरसेवक नितीन गांगुर्डे, देविदास कामडी, नारायण गभाले, किरण जगताप यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. या उपक्रमामध्ये गावातील पोलीस पाटील आनंदा जाधव, आंबोडा ग्रामपंचायत सदस्य शांताराम महाले, माजी सरपंच लक्ष्मण पाडवी, शांताराम जाधव, किशोर जाधव, देवीदास पाडवी, योगेश जाधव उपस्थित होते. गावातील महिलांनी पारंपारिक तूर वाद्याने स्वागत केले तर तुरवाद्यावर गावातील महिला तसेच पाहुण्यांनी ठेका धरला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक देविदास कामडी व सूत्रसंचालन दुर्वादास गायकवाड यांनी केले.


# आदिवासी बहुल भागात भीषण पाणीटंचाई

## विहिरींनी गाठला तळ; वाढत्या उन्हाचा शेतीवर परिणाम

**दिंडोरी : प्रमोद ठेपणे**

आदिवासी बहुल मानल्या जाणाऱ्या दिंडोरीसह पेठ, सुरगाणा, कळवण तालुक्यात तीव्र पाणीटंचाईचे सावट निर्माण झाले असून महिलांना हंडाभर पाण्यासाठी पायपीट करावी लागत असून मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.

वाढत्या उन्हामुळे आदिवासी भागात विहीरी, बोअरवेल, नद्या, केटी बंधारे कोरडेठाक पडल्याने पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. शेतीसाठी पाणी तर नाहीच जनावरांनाही पाणी नाही. पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करायची वेळ गावे, वाडे-वस्त्यावर राहणाऱ्या आदिवासी बांधवांवर आली आहे. देवसाने, चौसाळे, चारणवाडी, सारसाळे, करंजखेड, एकलहरे, पिंगळवाडी, खोरीफाटा, वारे, भनवड ही आदिवासीबहुल गावे असून लगतच्या भागात विहीरींनी तळ गाठण्यास सुरुवात केली आहे. याचा परिणाम शेती व्यवसायावर होत



आहे. पाण्याअभावी शेती धोक्यात आली आहे तर जनावरांना पिण्याचे पाणी कोठून आणणार? असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी मिळविण्यासाठी दाहीदिशा भटकंती करावी लागते आहे. आजमितीला एकलहरे व करंजाळी येथील धरणातून ग्रामपंचायतीच्या विहीरीच्या माध्यमातून पिण्यासाठी पाणी पुरवठा होत आहे.

मात्र टंचाई पाचवीला पुजलेली आहे. हा प्रतिवर्षीचा अनुभव आहे. यावर ठोस उपाय योजनेअभावी आदिवासी भागाची परवड सुरु आहे, धरणसाठ्याची पाण्याची पातळी खालावली असून जनावरांनाही पाणी नसल्याने धरणालगतच्या क्षेत्रातील पाण्याचा वापर करावा लागतो आहे. जनावरांना पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे.

**मानव-प्राणी संघर्षाची शक्यता**

सुरगाणा, पेठ तालुका घनदाट जंगलांनी व्यापलेला असून येथे मोठ्या प्रमाणावर वन्यजीवांचा वावर आहे. उन्हाळ्याच्या दिवसात जंगलात पाणवठे नसल्याने वन्यप्राण्यांना पिण्यासाठी पाणी मिळणे कठीण होत आहे. बिबट्या, कोल्हे, आणि अन्य प्राणी पाण्याच्या शोधात जंगलाच्या बाहेर येत आहेत. ते गावाच्या परिसरात फिरत असल्याने मानव-प्राणी संघर्षाची शक्यता वाढत आहे. यंदा उन्हाळ्याची तीव्रता वाढल्याने उपलब्ध पाणीसाठे (झरे) लवकरच कोरडे पडण्याची भीती व्यक्त होत आहे. स्थानिक वन्यप्रेमींनी आणि सामाजिक संघटनांनी वन विभागाकडे पाणवठे तयार करण्याची मागणी केली आहे. वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, जंगलात नैसर्गिक जलस्रोत टिकवण्यासाठी झाडे लावणे, पावसाच्या पाण्याचे संधारण करणे आणि कृत्रिम जलसाठे उभारणे आवश्यक आहे.

दरम्यान, जनावरांना चारा नसल्याने गव्हाचा तुस व भाताचा कोंडा याचा वापर करावा लागतो आहे. हिरवा चारा दाट जंगली भागात असला तरी बिबट्या, अस्वल, रानडुक्करांमुळे जनावरांना मोकळे सोडता येत नाही. त्यामुळे 'इकडे आड तिकडे विहीर' अशी अवस्था आदिवासी बांधवांची झाली आहे. जनावरांना चारा पाणी अत्यल्प त्यांची भूक भागविण्यासाठी जंगलातही सोडता येत नसल्याने डोळ्यादेखत जनावरांचे हाल पाहण्याची वेळ आदिवासी बांधवावर आली आहे.

# कपिलधारा तीर्थावर पार पडले संत संमेलन

**इगतपुरी : प्रतिनिधी**

अनेक वर्षापासून सिहंस्थाचे मूळस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या तालुक्यातील कावनई येथील कपिलधारा तीर्थावर अनेक वर्षापासून साधु-महंत शाहीस्नान व ध्वजारोहन करत असतात. महंत फलहारी महाराज यांच्या अथक प्रयत्नातून माजी पालकमंत्री गिरीश महाजन व माजी मंत्री छगन भुजबळ यांनी गत कुंभमेळाव्यात रस्ते, तीर्थविकास अंतर्गत विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी दिला होता.

आताच्या काळात येणाऱ्या कुंभमेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत मंत्रालयात बैठक होणार असून सिहंस्थाचे मूळस्थान असलेल्या कपिलधारा तीर्थाला आर्थिक निधी कसा मिळेल यासाठी आम्ही मागणी करणार असल्याचे आखाडा परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ता भक्तीदास महाराज यांनी येथे आयोजित संत संमेलनात केली. आगामी सिहंस्थ कुंभमेळ्याच्या दृष्टीने कपिलधारा तीर्थावर दिगम्बर



इगतपुरी : संत संमेलनप्रसंगी दिगम्बर आखाडा परिषदेचे प्रमुख महंत भक्तीदास महाराज यांच्यासह साधु संत. (छाया : ओंकार गवांदे )

आखाड्याचे प्रमुख महंत व आखाडा परिषदेचे प्रवक्ता भक्तीदास महाराज यांच्या प्रमुख उपस्थित साधू संत संमेलन पार पडले. शासनाने नाशिक येथे होणाऱ्या कुंभमेळाव्याचा उल्लेख हा नाशिक नावाने न करता तो उल्लेख नाशिक-त्र्यंबकेश्वर व कपिलधारा तीर्थ कावनई असा संक्षिप्त करावा.नाशिक व त्र्यंबकेश्वर या ठिकाणी आगामी कुंभमेळाव्या संदर्भात शासन व लोकप्रतिनिधी यांच्या आतापर्यंत अनेक बैठका झाल्या असून कावनई कपिलधारा तीर्थावर अद्यापपर्यंत एक ही बैठक झाली नाही. त्यामुळे हे तीर्थस्थळ वंचित ठेवले जात असल्याचा मत कपिलधारा तीर्थाचे विश्वस्त कुलदीप चौधरी यांनी व्यक्त केले.

त्यामुळे कुंभमेळा मंत्री यांनी भेट देऊन सिहंस्थाचे मूळस्थान असलेल्या कपिलधारा तीर्थ कावनईला भेट देऊ न सिहंस्थ कृती आराखड्यात समाविष्ट करावे, अशी देखील मागणी यावेळी करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील शेकडो साधू संत या संत संमेलनसाठी उपस्थित होते. या संत स्नेहमेळाव्यात डॉ. भक्तीचरण दास, मंहत चंद्रदेवदास, महंत राम स्नेहीदास, महंत लालदास, पुरणचंद्र दास, महंत पितांबर दास, महंत झारखंड दास, महंत चंद्रमा दास, महंत नामदेव महाराज हरड, महंत प्रभुदास, विश्वस्त कुलदीप चौधरी, तुलसीराम बबेरवाल, ज्ञानेश्वर भागवत, दिपक मंगे, प्रविण भागवत, मुरलीधर पाटील, बबन हंबीर, रामभाऊ पाटील आदी उपस्थित होते.



## बागलाण भाजपा तालुका अध्यक्षपदी पवार, भामरे तर शहराध्यक्षपदी सोनवणे

**सटाणा : प्रतिनिधी**

बागलाण तालुका भारतीय जनता पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी युवा नेते प्रवीण पवार व शरद भामरे यांची नियुक्ती करण्यात आली असून सटाणा शहराध्यक्षपदी नितीन सोनवणे यांच्यावर पुन्हा जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

बागलाण तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोसम व काटवण मंडल अध्यक्षपदी आमदार दिलीप बोरसे यांचे निकटवर्तीय विश्वासू प्रवीण पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पवार हे गेल्या २००९ पासून पक्षात सक्रिय असून प्रसिद्धीपासून लांब राहून त्यांनी आमदार दिलीप बोरसे व भाजप पक्षासाठी सातत्याने महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आरम व गिरणा मंडल अध्यक्षपदी वनोलीचे सरपंच शरद भामरे यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. भामरे हे थेट सरपंचपदी निवडून आले आहे. सटाणा शहराध्यक्षपदी माजी नगरसेवक नितीन सोनवणे यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली आहे. सोनवणे यांनी विधानसभा निवडणुकीदरम्यान पक्षाला सटाणा शहरातून जास्तीत जास्त मताधिक्य मिळवून देण्यासाठी महत्त्वाचे योगदान दिले. आमदार दिलीप बोरसे, माजी नगराध्यक्ष सुनील मोरे, जिल्हाध्यक्ष निलेश कचवे, सरचिटणीस काकाजी पवार, ज्येष्ठ नेते साहेबराव सोनवणे, रमेश देवरे, श्रीधर कोठावदे, बिंदूशेठ शर्मा आदींनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.



## वणी महाविद्यालयाच्या पवळेस शिवछत्रपती पुरस्कार प्रदान

**वणी : प्रतिनिधी**

येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय येथे प्रथम वर्ष कला वर्गात शिकलेल्या माजी विद्यार्थी नितीन पवळे यास पहिला शिवछत्रपती पुरस्कार पुणे विभागातून देण्यात आला.

योगासन या क्रीडा प्रकारात त्याला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार पुणे येथे प्रदान करण्यात आला. मराठा विद्या प्रसारक संस्थेचे सरचिटणीस डॉ. ॲड. नितीन ठाकरे, दिंडोरी तालुका कार्यकारिणी संचालक प्रवीण नाना जाधव, मविप्र शिक्षणाधिकारी डॉ नितीन जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एस एन शिंदे, स्थानिक विकास समिती अध्यक्ष राकेश थोरात, डॉ. वाय. एम. साळुंके, उपप्राचार्य प्रा. नितीन बोरसे, समन्वयक तसेच शारिरीक शिक्षण संचालक डॉ, रविंद्र चव्हाण यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वऱ्हाड्याच्या वाहनास अपघात, १३ जण जखमी

**दिंडोरी : प्रतिनिधी**

डांग जिल्ह्यामधील सापुतारा येथील घाटात लग्नाचे वऱ्हाड भरलेला पिकअप उलटल्याने त्यामध्ये १३ जण जखमी झाले. नाशिक जिल्ह्यातील माणिकपुंज येथून सापुताराच्या पायथ्याशी असलेल्या मालेगाम येथे एका लग्नाचा वराड घेऊन जात असताना सापुतारा घाट रस्त्यावर एक पिकअप उलटल्याने गंभीर अपघात झाला आहे,

नाशिक जिल्ह्यातील नांदगाव तालुक्यातील माणिकपुंज येथून एक पिकअप (एम.एच.०२.ई. आर.९७०८) सापुताराच्या पायथ्याशी असलेल्या मालेगाम येथे १५ पेक्षा अधिक लोक लग्नासाठी निघाले होते. पिकअप गाडीचा चालक गणेश चंदू थोरात यांनी महाराष्ट्र आणि सापुताराच्या सीमेजवळ असलेल्या थानापाडा गावाजवळ चहा, पाणी आणि नाश्ता घेण्यासाठी पिकअप



गाडी थांबवली होती. त्यावेळी एक भाऊ त्यांना भेटायला आला आणि ड्रायव्हरला सांगितले की समोर पोलिस उभे आहेत, मला पिकअप गाडी चालवायला द्या. म्हणून त्याने ठाणापाडा येथून पिकअप गाडी चालवली. तो सापुतारा चेकपोस्ट पार करून सापुतारा ते शामगहानला जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या सापुतारा घाट मार्गावर पोहोचला आणि गणेश मंदिराजवळील वळणावर चालक स्टेअरिंगवरील नियंत्रण सुटल्याने पिकअप घटनास्थळीच पलटी झाली, सापुतारा घाटमार्गावर वराड भरलेला पिकअप अचानक उलटला आणि पिकअपमध्ये बसलेल्या प्रवाशांच्या किंकाळ्यांनी संपूर्ण वातावरण दुमदुमले. पिकअप उलटल्याची माहिती मिळताच, सापुतारा पोलिस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

रस्त्याने जाणाऱ्या वाहनचालकांनी आणि पोलिस पथकाने मदत केली आणि जखमींना तात्काळ उपचारासाठी शामगहान सीएचसीमध्ये नेले.

या अपघातात सविता भावसाहेब वाघ, वैशाली सुनील सेलके, ओम सुनील सेलके,गणेश रंगनाथ जाधव, रंगनाथ जगन्नाथ तुपे, राजेंद्र नाना डेळेकर, दीपक दादासाहेब गोडसे, संगिता उज्जैन वाघ, संगिता उज्जैन वाघ हे जखमी झाले तर ज्ञानेश्वर वाघ, सुनील सेलके, वैशाली सेलके, माणिकपुंज ता. नांदगाव, जि. नाशिक शामगव्हाण सीएचसी येथे उपचारासाठी हलविण्यात आले, त्यात पाच जणांची प्रकृती गंभीर असल्याचे आढळून आले, त्यापैकी ४ जणांना पुढील उपचारांसाठी आहवा सिव्हिल हॉस्पिटलमध्ये हलवण्यात आले, तर एका जखमी व्यक्तीला खाजगी वाहनातून नाशिक येथील रुग्णालयात हलवण्यात आले आहे, या अपघात प्रकरणी सापुतारा पोलिस पथकाने गुन्हा दाखल केला आहे.

# प्रदूषण नियंत्रण मंडळाला दहा दिवसानंतर जाग

## आवर्तन सोडल्यानंतर पाणी नमुने घेण्यासाठी अधिकाऱ्यांची तत्परता

**मुकणे : प्रभाकर आवारी**

मुकणे उंडओहोळ नदीपात्रातील रसायनमिश्रित दूषित पाणी प्रकरणी प्रदूषण नियंत्रण मंडळाला तब्बल दहा दिवसांनंतर जाग आली मात्र नदीपात्रातील केटीवेअर बंधारे भरण्यासाठी रविवार (दि.२०) रोजी आवर्तन सोडण्यात आल्याने रसायनमिश्रित पाणी वाहून गेले. त्यानंतर सोमवार दि.२१ रोजी नदीपात्रातील पाणी नमुने घेण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी गायकवाड व महाजन यांनी नदीपात्राला भेट देऊन पाणी नमुने तपासणीसाठी घेतले आहे.

काल केटीवेअर बंधारे भरण्यासाठी आवर्तन प्रवाहित झाले अन आज प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आले यात काही गौडबंगाल तर नाही ना अशी चर्चा शेतकरी व मुकणे ग्रामस्थांमध्ये रंगली आहे.

गेल्या १० दिवसांपूर्वी मुकणे धरणाखालील उंडओहोळ नदीपात्रात रसायनमिश्रित पाण्याचा लालसर व काळा थर जमा झाल्याने शेतकरी आक्रमक झाले होते. त्यातच नदीपात्रात बसविलेल्या विद्युत पणपद्वारेही रसायनमिश्रित पाण्याचाच पुरवठा शेतकऱ्यांना होत होता. त्या पार्श्वभूमीवर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी भड यांना दूरध्वनीवरून सदर माहिती दिली गेली. मात्र पाहू-करू असे टोलवाटोलवी करणारे उत्तर देऊन त्यांनी भ्रमणध्वनी कट केला. असे एकदा नव्हे तर दोन-तीनदा



घडले त्यानंतर संबंधीत उपप्रादेशिक अधिकारी गायकवाड हे आले मात्र त्यांनी केटीवेअर बंधाऱ्याखालील पाणी नमुने घेतले होते. त्यानंतरही नागरिकांना पोटदुखीचा त्रास होत होता तसेच काही शेतकऱ्यांनी जनावरांना टँकरद्वारे पाणी पुरवठा केला होता. काल रविवार दिनांक २० रोजी नदीपात्रातील केटीवेअर बंधारे भरण्यासाठी काही वेळ आवर्तन सोडण्यात आले त्यामुळे रसायनमिश्रित पाणी खाली वाहून गेल्याने पाणी काही प्रमाणात का होईना शुद्ध झाले असे म्हणता येईल.आज सोमवार दि.२१ रोजी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे उपप्रादेशिक अधिकारी गायकवाड हे महाजन यांच्याहस पाणी नमुने घेण्यासाठी आले. काल आवर्तन झाल्याने पाण्याचा रिपोर्ट कसा येईल असे अनेकांनी प्रश्न उपस्थित केले मात्र उपप्रादेशिक अधिकारी गायकवाड व महाजन यांनी पाणी नमुने घेतले यात पाण्याचा अहवाल दूषित येईल का..? असा सवाल शेतकऱ्यांनी केला मात्र काल केटीवेअर भरण्याच्या नावाखाली जलसिंचन विभागाने आवर्तन सोडले व आज प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी पाणी नमुने घायला आले यात जलसिंचन विभाग व प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची मिलीभगत तर नसेल ना..? असा प्रश्न शेतकरी व मुकणे ग्रामस्थांमधून विचारला जात आहे. नाशिक प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारित असणाऱ्या गोंदे औद्योगिक वसाहतीमधील मुकणे धरणाखालील उंडओहोळ नदीपात्रात रसायनमिश्रित पाणी सोडण्याचे प्रकरण नवे नाही तरी यावेळी तब्बल १० दिवसांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी दाखल झाले याबाबत सखेद आश्चर्य व्यक्त होत आहे.

## महत्त्वाचे

### बालकुमार चित्रपट महोत्सव गुरुवारपासून

**पुणे :** संवाद पुणे, कोहिनूर समूह आणि कावरे आइस्क्रीम यांच्यातर्फे कोथरूड येथील सिटी प्राइड चित्रपट गृहात २४ ते ३० एप्रिल या कालावधीत बालकुमार चित्रपट महोत्सव होईल.चित्रपट गृहातील स्क्रीन क्रमांक तीन येथे रोज सकाळी ९.३० वाजता हा महोत्सव होईल. यावेळी दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांचे 'शिवरायांचा छावा', 'पावनखिंड', 'फर्जंद', 'फत्तेशिकस्त' आदी चित्रपट मुलांना पाहायला मिळतील. या महोत्सवात मुलांना मोफत प्रवेश असून, यासाठी प्रवेशिका आवश्यक आहे. या महोत्सवाचे उद्घाटन गुरुवारी (ता. २४) सकाळी ९.३० वाजता केंद्रीय नागरी वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, दिग्दर्शक दिग्पाल लांजेकर यांच्या हस्ते होणार असून, यावेळी कोहिनूर समूहाचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, उद्योजक प्रवीण बढेकर, सिटी प्राइडचे अरविंद चाफळकर आदी उपस्थिती असतील. कोथरूड सिटी प्राइड येथे सकाळी १०.३० ते १२ या वेळेत प्रवेशिका मिळणार आहे, अशी माहिती संवाद पुणेचे सुनील महाजन, कावरे आइस्क्रीमचे संचालक राजू कावरे, जान्हवी कावरे यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

### नागपूरला उष्णतेत वाढ!

**नागपूर :** भारतात सगळीकडेच उष्णतेची लाट पसरली असून हवामान विभागाने पुढील काही दिवसांत राजस्थान, मध्य प्रदेश आणि विदर्भातील अनेक भागात अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता वर्तवली आहे. मात्र महाराष्ट्रातील नागपूरमध्ये सर्वाधिक तापमान असल्याचे म्हटले जात आहे.जानेवारी महिना ओसरला की उष्णतेच्या लाटांना सामोरे जावे लागते. कडाक्याच्या उन्हात अनेकांची प्रकृती देखील खालावते आहे. महाराष्ट्रात सगळीकडेच उन्हाचा प्रहार होत आहे तुलनेने जास्त तापमान नागपूरमध्ये नोंदवल गेल आहे. आजपासून येत्या तीन दिवसात मध्य महाराष्ट्र व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांना उष्ण व दमट हवामानाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. बीड, लातूर, धाराशिव जिल्ह्यांमध्ये प्रचंड उष्ण हवामान राहणार आहे. तर पुणे, सोलापूर जिल्ह्यातही आज उष्ण व दमट हवामानाचा इशारा देण्यात आला आहे. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्याचबरोबर आहारात फळांचा समावेश करणे गरजेचे आहे.

### शिवनेरीवर मधमाशांचा पर्यटकांवर हल्ला

**पुणे :** शिवनेरी किल्ल्यावर पुन्हा एकदा पर्यटकांवर मधमाशांनी हल्लाबोल केला आहे. या हल्ल्यात १६ जण जखमी झाले असून पाच बालकांचा यात समावेश आहे. या आधीही शिवनेरीवर चार वेळा अशाप्रकारचा हल्ला मधमाशांनी पर्यटकांवर केला होता. पुण्यातील शिवनेरी किल्ल्याचा इतिहास सर्वदूर पसरलेला आहे. शिवनेरी किल्ल्यावर सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक पर्यटनासाठी येतात. शुक्रवार, शनिवार, रविवार या जोडून आलेल्या सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी शिवनेरी किल्ल्यावर पर्यटन करण्यास पसंती दर्शवली. रविवारी पर्यटकांची तुलनेने जास्त गर्दी होती. या गर्दीत मोठ्यांसह लहानांचा देखील समावेश होता. रविवारी सकाळच्या सुमारास पर्यटनाचा आनंद घेणाऱ्या पर्यटकांवर झाडावर असलेल्या मधमाशांनी हल्ला केला. या हल्ल्यात १६ पर्यटक गंभीर जखमी झाले. या मध्ये पाच लहान मुलांचा देखील समावेश आहे. सकाळी मधमाश्यांच्या हल्ल्याच्या घटनेनंतर काही काळ शिवभक्तांना किल्ल्यावर जाण्यासाठी मज्जाव करण्यात आला होता. सकाळी झालेल्या घटनेची व्याप्ती पाहता, पुन्हा लगेच कोणावर हल्ला होऊ नये, यासाठी किल्ला दोन वाजेपर्यंत बंद करण्यात आल्याचे पुरातत्व विभागाकडून सांगण्यात आले. या आधीही चार वेळा मधमाशांनी पर्यटकांवर अशाप्रकारचा हल्ला केला होता. या हल्ल्याचं कारण अद्यापही अस्पष्ट आहे. दरम्यान जखमींना जुन्नरच्या छत्रपती शिवाजी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### मतिमंद मुलावर अनैसर्गिक अत्याचार

**नागपूर -** आई ब्युटीपार्लरच्या कामाला गेल्यावर ५० वर्षीय व्यक्तीने त्यांच्या गतिमंद मुलावर अनैसर्गिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी वाठोडा पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल करून अटक केली.मोहम्मद अनिस मोहम्मद नसरुल (रा. वाठोडा) असे आरोपीचे नाव आहे. तो शिंपी काम करतो. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ४९ वर्षीय महिला ही आपल्या २५ वर्षीय मुलासह वाठोडा परिसरात राहते. तिचा मुलगा गतिमंद असून, ती ब्युटीपार्लरचे काम करते.दरम्यान दररोज सकाळी घरून निघून गेल्यावर त्या रात्री ९ वाजताच्या सुमारास येतात. रविवारी त्या घरी परत आल्यावर त्यांच्या घराच्या बेडरुममधून मोहम्मद निघताना आढळला. त्याला त्यांनी विचारणा केली असता, त्याने त्याच्या कपड्याचे माप घेत असल्याची बतावणी केली.दरम्यान, इतक्या रात्री ते ही अंधारात तो कसा काय माप घेत होता. अशी विचारणा करताच, तो तेथून निघून गेला. दरम्यान मुलाला विश्वास घेत विचारणा केली. यावेळी त्याने तो सातत्याने त्याच्यावर अनैसर्गिक अत्याचार करीत, असल्याची माहिती आईला दिली..याशिवाय ही बाब कुणालाही सांगितल्यास त्याला आणि आईला जिवानिशी ठार मारण्याची धमकीही दिल्याचे मुलाने सांगितले. त्यावरून महिलेने वाठोडा पोलिस ठाणे गाठून दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करीत मोहम्मद अनिस यास अटक केली.

### २२ रेड्यांना कत्तलीसाठी कोंबून ठेवले

**ठाणे :** प्रतिनिधी गोवंश जनावरांची हत्या करण्यासह त्यांची वाहतूक करणाऱ्या आणि २२ रेड्यांना कत्तलीसाठी आणून गोट फॉर्ममध्ये कोंबून ठेवल्याप्रकरणी दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये ७ जणांच्या विरोधात भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलाय. मोईनुद्दीन सलाउदीन शहा, सैदु, नजीर, गफू, आजम उस्मान सिद्धीकी, मुमताज कुरेशी उर्फ कल्लु,हमजा कसाई अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पहिल्या घटनेत आरोपी मोईनुद्दीन, सैदु, नजीर, गफू या चौघांनी आपसात संगनमत करून गोवंश जनावरांची हत्या करून गोमांस शहरात विक्रीसाठी रिक्षातून २० एप्रिलला सकाळी वाहतूक करत असताना पोलिसांना आढळून आले. या सर्वांच्या विरोधात पोलीस शिपाई निलेश रवींद्र देवरे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आलाय. त्यांच्याकडून ९५ हजार रुपये किमतीची रिक्षा आणि १५० ते २०० किलो वजनाचे मांस जप्त करण्यात आले आहे.दुसऱ्या घटनेत आरोपी आजम, मुमताज, हामजा या तिघांनी आपसात संगनमतानं २ लाख ८० हजार रुपये किमतीचे २२ रेडे त्यामध्ये २ लहान नर व ३ म्हैस यांना कत्तलीसाठी समानगर येथे कोणत्याही प्रकारचा चारापाणी आणि वैद्यकीय सुविधा न पुरवताच बांधून ठेवल्याचे आढळून आले. त्यानंतर या सर्वांच्या विरोधात पोलीस नाईक अमोल तुळशीराम धायगुडे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे.याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक रत्नपारखी यांच्याशी संपर्क साधला असता ''गोट फॉर्ममधून २२ रेडे, त्यामध्ये २ लहान नर व ३ म्हैस यांना कत्तलीसाठी कोंडून ठेवल्याचे छापेमारीत दिसून आले. विशेष म्हणजे, गोट फॉर्म आडून आरोपी हे गोवंश जातीच्या जनावरांचे मांस विक्री करत असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, पोलीस पथक त्या दिशेनं तपास करत आहे,'' असं त्यांनी सांगितले.

### सिंहगड रस्त्यावरील पूल रविवारी खुला होणार

**पुणे -** सिंहगड रस्त्यावरील विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटरपर्यंतच्या उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले आहे. आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी नुकतीच या उड्डाणपुलावर दुचाकीवरून फेरी मारून पाहणी केली. या उड्डाणपुलाच्या उद्घाटनासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहण्याची शक्यता असून, हा कार्यक्रम रविवारी (ता. २७) होण्याची शक्यता वर्तवली जात आहे..पुणे महापालिकेने ११८ कोटी रुपये खर्च करून सिंहगड रस्त्यावर राजाराम पूल ते फनटाइम थिएटर दरम्यान तीन उड्डाणपूल बांधण्याचे काम हाती घेतले. यातील राजाराम पूल चौकातील ६५० मिटर लांबीच्या उड्डाणपुलाचे उद्घाटन काही महिन्यांपूर्वी झाले..त्यानंतर आता २१२० मिटर लांबीचा विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटर या दरम्यानच्या उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले असून, तो उद्घाटनाच्या प्रतिक्षेत आहे. तर माणिकबाग ते हिंगण्यातील पेट्रोलपंप दरम्यानच्या उड्डाणपुलाचे काम सुमारे ७० टक्के पूर्ण झाले आहे.

# सेना-मनसे एकत्र ; तर नाशकात होईल परिवर्तन

## दोन्ही पक्षातील पदाधिकाऱ्यांना विश्वास

**नाशिक : प्रतिनिधी**



राज्यात तीन दिवसापासून शिवसेना ठाकरे गट व मनसे हे दोन्ही प्रादेशिक पक्ष एकत्र येणार असल्याच्या चर्चानी उधान आणले आहेत. आता या चर्चा एकेकाळी शिवसेना व मनसेचा बालेकिल्ला असलेल्या नाशकात रंगू लागल्या आहेत. दोन्ही पक्षातील पदाधिकारी-कार्यकर्त्यांनी खासगीत बोलताना, सेना व मनसे एकत्र येणे महाराष्ट्रहिताचे असून नाशिकच्या दुष्टीने महत्वाचे ठरेल. पाच वर्षापासून सिंहस्थनगरीचा विकास खुंटला आहे. अशावेळी शहराला विकासात्मक वैभव मिळ्वून देण्यासाठी ठाकरे गट व मनसे दोन्ही एकत्र आल्यास चमत्कार होईल. असा विश्वास व्यक्त होतो आहे.

नाशिक हे शिवसेनाप्रमुख हिंदूहदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच लाडक शहर, राजाभाऊ गोडसे यांच्या रुपाने मिळालेला पहिला खासदार असो की महापालिकेतील सत्ता यावरुन ठाकरेंवरील नाशिककरांचे प्रेम दिसून येते. पुढे राज ठाकरे सेनेतून बाहेर पडल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची स्थापना करत पहिल्याच निवडणुकीत नाशिककरांनी मनसेच्या झोळीत पालिकेची सत्ता दिली.सोबतच तीन आमदारांचे बळ्ही दिले. त्यामुळे नाशिककरांवर ठाकरे घराण्याची जादू दिसून येते. २०१७ च्या मनपा व विधानसभा निवडणुकीनंतर मनसेची कमालीची पिछेहाट झाली. दुसरीकडे पक्ष फुटीनंतर ठाकरे गटाची अवस्था खराब झाली. लोकसभेत राजाभाऊ वाजे यांच्या रुपाने पक्षाला खासदार मिळाला असला तरी, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या दोन्ही उमेद्वारांचा पराभव झाला. त्यामुळे अस्तितवसाठी आगामी महापालिका निवडणूक ठाकरे गट व मनसे या दोन्ही पक्षासाठी महत्वाच्या आहेत. निवडणूकपूर्वी हे दोन्ही पक्ष एकत्र आल्यास नाशिकमध्ये परिवर्तन होऊ शकते. विश्वास द्रयींकडून केला जाऊ लागलाय. मनसेचे काही भागात हातावर मोजण्याएवढे पदाधिकारी असले तरी राज ठाकरे यांचा चेहरा ठाकरे गटाला निवडणुकीत फायदेशीर ठरु शकेल. तर ठाकरे गटाचे संघटन मनसेला संजिवनी देऊ शकेल. दरम्यान दोन्ही पक्षांच्या युतीबाबत काय होईल. याकडे शहरातील दोन्ही पक्षातील पदाधिकाऱ्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

> मुंबई महाराष्ट्राचा आत्मा असून मराठी म्हणून मुंबई वाचवण्याबरोबरच उर्वरीत महाराष्ट्रहितासाठी दोन्ही पक्षांनी एकत्र यावे, ही सर्वसामान्य शिवसैनिक म्हणून आपल्यासह अनेकांची तशी इच्छा आहे. दोन्ही पक्ष एकत्र आल्यास स्थानिक स्वराज्य संस्थाच नव्हे तर महाराष्ट्रात परिवर्तनाची नांदी होईल.
>
> **-डी.जी.सूर्यवंशी, जिल्हाप्रमुख ठाकरे गट,**



> मनसे व शिवसेना ठाकरे गट या दोन्ही पक्षांनी महाराष्ट्र हितासाठी एकत्र यावे. ही राज्यातील जनतेची इच्छा आहे, भावना आहे.
>
> **-सलीम शेख, प्रदेश उपाध्यक्ष, मनसे**

## पाणीटंचाईबाबत खा.भगरेंची जि.प.ला भेट

**नाशिक : प्रतिनिधी**

पेठ तालुक्यातील विहिरीतून पाण्यासाठी वणवण करणाऱ्या महिलांचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर काल दिंडोरी मतदार संघाचे खासदार भास्कर भगरे हे जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांची भेट घेण्यासाठी आले होते. मात्र, त्यांची काही कारणास्तव भेट झाली नाही.त्यांनी उपमुख्यकार्यकारी अधिकारी वर्षा फडोळ यांची भेट घेतली.

सध्या कडक उन्हाळा सुरू आहे.पाणी टंचाईची समस्या दिवसेंदिवस तीव्र होत असून दोन दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवर आणि बातमीत पेठ तालुक्यातील बोरीची बारी गावातील एका विहिरीवर महिला हंडे घेवून उतरत असल्याच्या व्हिडीओ व्हायरल झाला होता.महिला खोल विहीरीत उतरत जीव धोक्यात घालून पाण्यासाठी वणवण करीत असलेले दृष्य भितीदायक असून पाण्याचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा, यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेण्याचे नियोजन केले होते. मात्र, मित्तल न भेटल्याने त्यांनी फडोळ यांची भेट घेतली. ग्रामसेवक नसल्याबाबतही त्यांनी चर्चा केल्याचे समजते.

## बोरीच्या बारीचा तो व्हिडिओ खोडसाळपणातून

### राजेंद्र वाघ : विहिरीचे पाणीच वापरत नसल्याचा दावा

**नाशिक : प्रतिनिधी**

पेठ तालुक्यातील बोरीची बारी येथे सोमवारी (दि.२१) कोणीतरी त्रयस्थ व्यक्तीने एका महिलेस पाणी घेण्यासाठी विहिरीत उतरवून त्याचा व्हिडीओ काढत समाजमाध्यमांवर व्हायरल केला. वास्तविक ज्या विहिरीचा व्हिडीओ व्हायरल झाला त्या विहिरीचे पाणी पिण्यासाठी वापरलेच जात नसल्याचा अहवाल पेठ तालुक्याचे तहसीलदार तथा गट विकास अधिकारी यांच्याकडून जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद वाघ यांनी दिली.

मौजे बोरीची बारी याठिकाणी पाणीटंचाईमुळे एक महिला हंडा घेऊन विहिरीत उतरत असल्याचा व्हिडीओ सोमवारी (दि.२१) व्हायरल झाला. त्यानंतर समाजमाध्यमांवर संतप्त प्रतिक्रिया उमटू लागल्या त्यानंतर निवासी उपजिल्हाधिकारी वाघ यांच्या सूचनेप्रमाणे पेठचे तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी मौजे बोरीची बारी येथे भेट देत पाणीटंचाईबाबत पंचनामा, स्थळनिरीक्षक व आवश्यक उपाययोजनांसह अहवाल सादर केला. बोरोची बारी येथील लोकसंख्या ५५४ असुन टंचाई आराखड्यात माहे एप्रिल ते जूनच्या टप्प्यात विहिर अधिग्रहण करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे. मौजे बोरीचीबारी तालुका पेठ येथे दोन वर्षापूर्वी स्वदेश फाऊंडेशमार्फत नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्यात आली. तेथे नळाद्वारे माहे फेब्रुवारी २०२५ पर्यंत व त्यानंतर एप्रिल २०२५ च्या दुसर्या आठवडयापर्यंत पाणीपुरवठा केला जात होता. त्यानंतर दि. १७ एप्रिलपासून खाजगी टँकरद्वारे गावातील सार्वजानिक विहीरीत पाणी टाकण्यात येत होते व या विहीरीतील पाणी महिलांकडून वापरण्यात येत होते. मात्र त्यास काही ग्रामस्थांचा उपसरपंच व पोलीस पाटील यांचा विरोध दिसून येत आहे.

> आज ग्रामपंचायत मार्फत विहीर अधिग्रहणचा प्रस्ताव दाखल केला जाणार असल्याचे सांगण्यात आले. विहिर अधिग्रहण प्रस्ताव मान्यता मिळेपर्यंत ग्रामपंचायत बोरीचीबारी स्वखर्चाने पुरेसा पाणी पुरवठा करणार असून सार्वजनिक विहिरीत ग्रामस्थांच्या मागणीप्रमाणे पाणी न टाकता ग्रामस्थांच्या घरासमोरील ड्रममध्ये ठिकठिकाणी टँकरद्वारे पाणी वाटप सुरु केले आहे.
>
> **- राजेंद्र वाघ, निवासी उपजिल्हाधिकारी, नाशिक**

## रामकाल पथाच्या खोदकामाची माहिती सादर करावी

### आयुक्त खत्री : आढावा बैठकीतून विभागप्रमुखांना सूचना

**नाशिक : प्रतिनिधी**

केंद्र सरकारचा महत्वाकांक्षी रामकाल पथ प्रकल्प पंचवटीत साकारला जात असून, या प्रकल्पाच्या मार्गावर खोदकाम केले जाणार असल्याने एमएनजीएल, बीएसएनएल, स्मार्ट सिटीसह बांधकाम विभागाने त्यांच्या कामांचे नियोजन करुन त्याबाबतची माहिती सादर करण्याचे आदेश महापालिका आयुक्त मनीषा खत्री यांनी दिले.

सोमवारी (दि.२१) स्मार्ट सिटी, बांधकाम विभाग, उद्यान विभाग, विद्युत विभाग, आयटी विभाग, वाहतूक कक्ष व महावितरण या विभागांच्या अधिकाऱ्यांसमवेत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी खत्री यांनी सूचना दिल्या. बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी, शहर अभियंता संजय अग्रवाल, स्मार्ट सिटीचे सीईओ सुमंत मोरे, कृष्णकुमार झा, अनिल तडकोड, अधीक्षक अभियंता अविनाश धनाईत, मनपाचे उद्यान अधीक्षक विवेक भदाणे उपस्थित होते. अधिकाऱ्यांना सूचना देताना आयुक्तांनी म्आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर रामकालपथसाठीच्या भूमिगत कामांना संबधित विभागांनी लवकरच सुरूवात करावी. रामकालपथसाठी जास्तीत जास्त खोदकाम करावे लागणार आहे. त्यादृष्टिने संबंधित सर्व विभागांनी आपल्याला करावयाच्या कामांची माहिती लवकरात लवकर कंपनीच्या सल्लागाराला द्यावी म्हणजे पुढील काम सोपे होईल, अशा सूचना दिल्या. याशिवाय बैठकीत इंडिग्रेटेड कमांड कंट्रोल सिस्टिमचा (आयसीसी) आढावा घेण्यात आला.स्मार्ट सिटीला जीआयएस संपूर्ण डेटा लवकरात लवकर उपलब्ध करून काम सुरू करण्याचे आदेशित करण्यात आले. स्मार्ट सिटीकडून महापालिकेला सात प्रकल्प हस्तांतरित केले जाणार आहे. त्यात मुख्यत्वे गोदापार्क प्रकल्पाचा समावेश आहे. या प्रकल्पाचे ग्रिमेंट झाले असून त्याबाबत लवकरच निर्णय घेण्यात येणार आहे. हे प्रकल्प हस्तांतरण करण्याबाबत गेल्या काही दिवसांपासून बैठकांवर बैठका घेतल्या जात आहेत.

> **गेटचे काम लवकर करण्याच्या सूचना**
>
> गोदावरीला दरवर्षी येत असलेली पूरस्थिती नियंत्रणासाठी स्मार्ट सिटी कंपनीच्या वतीने होळकर पुलाखाली २२ कोटी रुपये निधीतून मॅकेनिकल गेट बसविण्याचा निर्णय घेतला आहे. स्मार्ट सिटी कंपनीने २०१९ मध्ये हा प्रकल्प सुरु केला होता. मात्र, ठेकेदाराच्या संथ कामामुळे प्रकल्प रेंगाळला आहे. अखेर स्मार्ट सिटी कंपनीने ठेकेदाराला ३१ मे २०२४ पूर्वी काम पूर्ण करण्याचा अल्टिमेटम दिल्यानंतर काम सुरू केले असले तरी हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश आयुक्त खत्री यांनी स्मार्ट सिटीला दिले. पावसाळ्यात गोदावरीला येत असलेल्या पुरामुळे लगतच्या घरांमध्ये पाणी शिरते. यामुळे पुराचे नियंत्रण करण्यासाठी होळकर पुलाखाली गेटची उभारणी केली जात आहे.

## ट्रकची ५ वाहनांना धडक; तिघांचा मृत्यू

**लोणावळा :** जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील बोरघाट परिसरातील तीव्र उतारावर नियंत्रण सुटलेल्या ट्रकने रविवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास पाच वाहनांना जोरदार धडक दिली. त्यात कारमधील बाप-लेकीसह तीन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, १४ जण जखमी झाले आहेत. त्यांच्यावर पुण्यातील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.लोणावळा पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर पांडुरंग इंगुळकर (रा. पुणे ) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. ट्रक मुंबईच्या दिशेने जात असताना खंडाळा घाटातील उतारावर ब्रेक फेल झाल्याने चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे ट्रकने समोरून येणाऱ्या पाच वाहनांना जोरदार धडक दिली. त्यात प्रिया सागर इंगुळकर (वय ३५, रा. शुक्रवार पेठ, टिळक रोड, पुणे), निलेश संजय लगड श्राव्या निलेश लगड दोन्ही रा. सदशिवपेठ, पुणे) यांचा जागीच मृत्यू झाला.

## गाळ काढताना ३० सेकंदाचा व्हिडीओ कंत्राटदाराला बंधनकारक

**मुंबई:**

पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून मुंबई महानगरातील मोठ्या व लहान नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे वेगाने सुरु आहेत. गाळ काढण्याची कामे योग्यरित्या होण्यासह त्यावर देखरेख करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेने कंत्राटांमध्ये यंदा अधिक सक्त अटी व शर्तीचा समावेश केला आहे. नाल्यांमधून गाळ काढण्याच्या कामांसाठी प्रशासनाने छायाचित्रण समवेत ३० सेकंदाचे चित्रीकरण (व्हिडिओ) बंधनकारक केले आहे. तर लहान नाल्यांमधून गाळ काढण्यापूर्वीचे आणि नंतरचे सीसीटीव्हीद्वारे चित्रीकरण करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

मुंबई महानगरातील नाल्यांमधून गाळ काढण्याची कामे ठरवलेल्या वेळेत पूर्ण करावीत, आवश्यक तेथे अतिरिक्त मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री नेमून कामांना गती द्यावी, अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे कामांची पारदर्शकता आणि गुणवत्ता तपासावी, असे निर्देश महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी यंत्रणेला दिले आहेत.

**पिंपळगाव बसवंत नगरपरिषद**
**ता.निफाड, जि. नाशिक**
संपर्क क्र. कार्यालय:०२५५०-२५००३८, अग्निशमन: ०२५५०-२५०९००, टोलफ्री : १८००२३३४००३
ई-मेल:nppimpalgaonb@gmail.com

**जाहीर निविदा सूचना (२०२५-२६ द्वितीय प्रसिद्धी)**

तमाम नोंदणीकृत ठेकेदार/मक्तेदार यांना कळविण्यात येते की, पिंपळगाव बसवंत नगरपरिषद, जि. नाशिक करिता खालील नमूद केलेल्या कामासाठी जाहीर निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा फॉर्मची किंमत (रुपये) | बयाणा रक्कम (रुपये) | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| ०१ | पिंपळगाव बसवंत नगरपरिषद कार्यालय व हद्दीतील CCTV दुरुस्ती तसेच नवीन कॅमेरे व इतर साहित्य आवश्यकतेनुसार पुरवठा करणे | ५००/- | २०००/- | १ वर्षे |

उपरोक्त नमूद कामाकरिता इच्छुक पुरवठाधारक/मक्तेदार यांनी **दिनांक: २२/०४/२०२५ ते २६/०४/२०२५** पर्यंत कार्यालयीन वेळेत आपली निविदा

**(आशिष महाजन)** नगर अभियंता (अति.) पिंपळगाव बसवंत नगरपरिषद
**(संदीप चौधरी)** मुख्याधिकारी (अति.) पिंपळगाव बसवंत नगरपरिषद
**(विशाल नाईकवाडे)** प्रशासक पिंपळगाव बसवंत नगरपरिषद



## नाशिक ॲथलेटिक्स फाउंडेशनतर्फे स्पर्धा

**नाशिक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक येथील सिंथेटिक ट्रॅकवर नाशिक ॲथलेटिक्स फाउंडेशनतर्फे दि. २६ व २७ रोजी राज्यस्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धा घेण्यात येणार आहे.

स्पर्धेसाठी वय वर्षे ६ ते १८ आणि खुला गट या वयोगटासाठी स्पर्धांमध्ये सहभागी खेळाडूंनी नोंदणी केलेली असून राज्यातील अनेक जिल्ह्यातून स्पर्धकांनी आपला सहभाग नोंदविला आहे. या स्पर्धेमध्ये जम्पिंग, थ्रोईंग, रनिंग या क्रीडा प्रकाराचा समावेश केलेला आहे, एन.ए.एफ उपाध्यक्ष-भारतीय मीडिया फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य जनरल कमिटी चेअरमन हिरालाल लोथे, यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

यावेळी आंतरराष्ट्रीय धावपटू सुप्रिया तेवितिया यांनी सहभागी खेळाडूंना मार्गदर्शन केले.न्यू ग्रेस अकादमीचे चेअरमन राजेंद्र वानखेडे यांनी मनोगत व्यक्तकेले.

सॉईल चार्जर टेक्नॉलॉजीचे चेअरमन प्रसाद मुखेकर यांनी देखील शुभेच्छा दिल्या. पत्रकार परिषदेत महाराष्ट्र राज्य जनरल कमिटी चेअरमन हिरालाल लोथे, सचिव मंगेश राऊत आणि व्यासपीठावर उपस्थित मान्यवर यांचे हस्ते स्पर्धेमध्ये सहभागी, विजयी, उत्कृष्ट खेळाडूंना देण्यात येणारे ट्रॉफी, मेडल्स, प्रमाणपत्र, बक्षिस, टी शर्ट, सायकल यांचे प्रातिनिधिक स्वरूपात अनावरण केले.

स्पर्धा यशस्वी होण्यासाठी डॉ.मुस्तफा टोपीवाला, हिरालाल लोथे, मंगेश राऊत, नलिनी कड, अश्विनी देवरे, अमित जैन, मनोहर भावनाथ, सुवर्णा देशमुख, श्री.राजेंद्र शिंदे, शैला घुले, राहुल पिंगळे, दत्ता शिंदे, पराग देशमुख, गौरव लोणारे, दीपाली निकम, प्रशांत शिंपी, पूजा लबडे, शैलेश रकिबे परिश्रम घेत आहेत.

**टायटल व्हेरीफिकेशनकामी जाहीर नोटीस**

**१) मिळकतीचे वर्णन :- मौजे आनंदवल्ली**, तालुका जिल्हा नाशिक, येथील **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील बिनशेती प्लॉट मिळकती यांसी **भुमापन क्र. व उपविभाग ६५/३/२/१/प्लॉट/१२** यांसी **क्षेत्र १८७-६८ चौ.मी.**, **भुमापन क्र. व उपविभाग ६५/३/२/१/प्लॉट/१३** यांसी **क्षेत्र १९०-१३ चौ.मी.**, **भुमापन क्र. व उपविभाग ६५/३/२/१/प्लॉट/१४** यांसी **क्षेत्र १९०-१३ चौ.मी.**, व **भुमापन क्र. व उपविभाग ६५/३/२/१/प्लॉट/१५** यांसी **क्षेत्र २२९-१३ चौ.मी.**

**२)** वर कलम १ मध्ये वर्णन केलेली प्लॉट मिळकती **मे.समिर कन्स्ट्रक्शन** तर्फे **पदमा महेश पारेख व समीर महेश पारेख** यांच्या मालकीच्या आहेत. सदर मिळकत मालकांनी सदर मिळकतीच्या टायटल सर्टिफिकेटची मागणी आमचेकडे केलेली आहे. सदर मिळकतींच्या टायटल व्हेरिफिकेशनसाठी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केलेली आहे.

**३)** वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या प्लॉट मिळकतींच्या टायटलबाबत व **मे.समिर कन्स्ट्रक्शन** तर्फे **पदमा महेश पारेख व समीर महेश पारेख** यांच्या मालकी हक्काबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१० दिवसांचे आत** आमचे ऑफिसमध्ये योग्य त्या साक्षांकित कागदपत्रानिशी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही लेखी हरकत अगर तक्रार न आल्यास सदर मिळकतीचे टायटल स्वच्छ, निर्दोष व बिनबोजाचे आहे असे गृहित धरून तसा दाखला देण्यात येईल. जाहीर नोटीसच्या मुदतीनंतर आलेल्या तक्रारी विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकतींचा विचार करण्यात येणार नाही व त्या मिळकतींच्या मालकांवर व सदर मिळकतींवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी. केवळ आमच्या ऑफीसला नोंदविलेल्या लेखी हरकतीच विचारात घेण्यात येतील.

कळावे, ही जाहिर नोटीस. दि.२१/०४/२०२५.

**नंदकिशोर हि.लाहोटी, ॲडव्होकेट**
बी-१,मेघदूत शॉपिंग सेंटर,जिल्हा न्यायालयासमोर,नाशिक.

**मौजे नाशिक येथील सर्व्हे नं.७१७/१ व सर्व्हे नं.७१८ बाबत**

**जाहीर इशारा नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर इशारा नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी **नाशिक** महानगरपालिका हद्दीतील **मौजे नाशिक** या गांवचे शिवारातील पुर्वीची शेतजमीन मिळकत यांसी **सर्व्हे नंबर ७१७/१** यांसी **क्षेत्र ४८ एकर २२ गुंठे** (जुन्या मोजमापाने) आणि **सर्व्हे नंबर ७१८** यांसी **क्षेत्र १३ एकर ११ गुंठे** (जुन्या मोजमापाने) ह्या मिळकती **देवस्थान ईनाम वर्ग - ३** च्या असून **सदरच्या मिळकती ह्या आमचे पक्षकार नर्गिस हसन शेख उर्फ नर्गिस असलम तांबे यांचे पुर्वजांना जामा मशिदीचे दिवा बत्तीकामी मिळालेल्या होत्या**. सदरच्या मिळकती ह्या देवस्थान वर्ग-३ च्या असल्याने सदर मिळकती हस्तांतरण करण्यास कायद्याने बंदी असल्याने आमचे पक्षकारांचे पुर्वजांनी सदरच्या मिळकती ह्या **आमचे पक्षकार यांचे पुर्वज सैय्यद मेहमुद वल्द सैय्यद इस्माईल मुलाने** यांनी **श्री.मल्हारी सदु विसे** यांना ८३ वर्षाच्या कराराने म्हणजेच शके १८६४ चे वैशाख शुध्द १ पासून ८३ वर्षापावेतो म्हणजेच शके १९४७ चे चैत्र अखेरपावेतो लावणीस देण्याचे कबुल करुन तसा **लावणी करारनामा** मे.सब रजिस्ट्रार यांचे कार्यालयात मल्हारी सदु विसे यांना लिहून व नोंदवुन दिलेला आहे. **सदर दिर्घ मुदतीच्या करारनाम्याची मुदत दि.२७/०४/२०२५ रोजी संपुष्टात येत आहे**. सदर करारनाम्याच्या अटी व शर्तीनूसार सदर मिळकतीवर असलेल्या तमाम धारकांना या जाहीर इशारा नोटीसीने कळविण्यात येते की, **सदरच्या मिळकतीवर असलेले बांधकाम अथवा तत्सम जडजोखीम विना हरकत काढुन घेवून सदरच्या मिळकती मुळ परिस्थितीत आमचे पक्षकारांना दि.२७/०४/२०२५ पावेतो खाली करुन द्यावी**, याची नोंद घ्यावी. अन्यथा संबंधीतांवर योग्य ती दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहीर इशारा नोटीस. नाशिक. दि.२१/०४/२०२५.

-:: आमचे मार्फत प्रसिध्द ::-

**आय.वाय.पटेल, ॲडव्होकेट**
जुना ॲडव्होकेट बार रुम नं.६,जिल्हा न्यायालय,नाशिक.

# ..तर पाणीपुरवठा मंत्र्यांच्या दालनावर हंडा मोर्चा

## लकी जाधव : आदिवासी बहुल भागात तीव्र पाणीटंचाई

**नाशिक : प्रतिनिधी**



भर उन्हाळ्यात आदिवासी बहुल भागात तीव्र पाणीटंचाई निर्माण झाली आहे. पेठ तालुक्यातील बोरीची पाडा येथील महिला हंडाभर पाण्यासाठी जीव धोक्यात घालून विहिरीत उतरत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर मुंबईसह इतर जिल्ह्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या नाशिकमधील तीव्र पाणीटंचाई तत्काळ दूर करण्यासाठी तत्काळ उपाययोजना कराव्यात अन्यथा पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या मंत्रालयातील दालनात हजारो नागरिक हंडा मोर्चा काढतील असा इशारा अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे युवा अध्यक्ष लकी जाधव यांनी दिला आहे.

### जलजीवन योजनेची श्वेतपत्रिका काढावी

जलजीवन योजनेत प्रचंड घोटाळा झाला आहे, याप्रकरणी सखोल चौकशी करून श्वेतपत्रिका काढावी, पाणीटंचाईसाठी पाणीपुरवठा मंत्र्यांसह पाणीपुरवठा अभियंतादेखील तेवढेच जबाबदार आहेत. यातील दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत

**– लकी जाधव, युवा अध्यक्ष, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद**

जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागातील गावे आणि वाड्यांना वाढत्या उन्हाबरोबरच पाणी टंचाईचा तीव्र सामना करावा लागत आहे. त्र्यंबक, इगतपुरी, पेठ, सुरगाणा तालुक्यातील अनेक गावे, पाड्यांवरील आदिवासी महिलांना हंडाभर पाण्यासाठी कित्येक किलोमीटर भटकंती करावी लागत असल्याचे विदारक चित्र गेल्या महिनाभरापासून दिसून येत आहे. मात्र टंचाई दूर करण्यासाठी शासनाकडून कुठलीही कार्यवाही होताना दिसत नाही.

केंद्र शासनाने 'हर घर नल' योजना अर्थात जलजीवन योजना राज्यात आणि देशात लागू केली. परंतु योजनेत हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाला असून जलजीवनची कामे घेणारे ठेकेदार हे राजकीय पदाधिकारी असल्याने केवळ कागदोपत्री या योजना पूर्ण करण्यात आल्या आहेत, असा आरोप लकी जाधव यांनी केला आहे. प्रत्यक्षात सर्वत्र पाणीटंचाईचे विदारक चित्र निर्माण झाले आहे. हंडाभर पाण्यासाठी आदिवासी महिलांना वणवण भटकंती करण्याची वेळ आली आहे. याबाबत अनेकदा पाठपुरावा करूनही अद्याप कुठलीही कार्यवाही होतांना दिसत नाही. पाण्यासाठी विहिरीत उतरतांना महिलेचा मृत्यू झाला तर जबाबदार कोण? असा सवालही उपस्थित होत आहे. याबाबत आठवडाभरात योग्य ती कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल, वेळप्रसंगी मुंबईचे पाणी सुद्धा रोखू असा इशारा लकी जाधव यांनी दिला आहे.

# एनडीसीए मान्सून लीग स्पर्धा

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा क्रिकेट संघटना आयोजित १६ वर्षांखालील मान्सून लीग २०२४-२५ क्रिकेट स्पर्धा यशस्वीपणे पार पडली. महात्मानगर क्रिकेट मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात एनसीएने एसजीसीए संघावर १६३ धावांनी विजय मिळवला. स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

एनसीएचे फलंदाज आर्यन गवळी ५६, सायुज्य चव्हाण ४५ व आर्य पारख ३३ धावा तर गोलंदाज गुलाम अन्सारी ४ व समकित मुथा २ बळी यांनी विजयात प्रमुख वाटा उचलला.या स्पर्धेत सहा गटात २४ सहभागी संघात एकूण ४४ सामने खेळविण्यात आले. एक दिवसीय मर्यादित ५० षटकांचे सामने या स्वरूपात ही स्पर्धा खेळवण्यात आली. अंतिम सामन्यानंतर लगेचच महात्मानगर क्रिकेट मैदानावर विजेते व उपविजेते संघ यांना जेष्ठ प्रशिक्षक शेखर घोष यांचे हस्ते ट्रॉफी प्रदान करण्यात आली. याप्रसंगी अमित पाटील, एनडीसीएचे स्पर्धा समन्वयक सर्वेश देशमुख, दोन्ही संघ व त्यांचे प्रशिक्षक, अंतिम सामन्याचे पंच व पालक उपस्थित होते.

**संक्षिप्त धावफलक व निकाल**

एन सीए संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी केली. एन सी ए - ५० षटकांत ८ बाद २३४ - आर्यन गवळी ५६, सायुज्य चव्हाण ४५ व आर्य पारख ३३ धावा. युवराज पंडित ३,अर्णव कोटकर २ तर नैतिक घाटे व कृष्णा हेम्बाडे प्रत्येकी १ बळी विरुद्ध एस जी सी ए - २८.५ षटकांत सर्वबाद ७१ - नैतिक घाटे ३८ धावा. गुलाममोहीयुद्दिन अन्सारी ४ , समकित मुथा व लक्ष्य पटेल प्रत्येकी २, तर आयुष शहाणे व प्रिन्स पटेल प्रत्येकी १ बळी. या स्पर्धेत फलंदाजीत ए व्ही सी एच्या दर्शन पाटीलने ३ डावांत सर्वाधिक एकूण २६२ तर एन सी एच्या सायुज्य चव्हाणने ४ डावांत २५७ धावा केल्या.

गोलंदाजीत एसजीसीएच्या देवांश गवळीने ६ डावात १६ बळी घेत पहिले स्थान मिळवले.

पान १ वरून

## ख्रिश्चन धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांचे निधन

पुनर्विवाह करणाऱ्या घटस्फोटित कॅथोलिकांना धार्मिक मान्यता दिली. त्यांनी अशा लोकांना सहभोजनाचा अधिकार दिला, ज्यामुळे सामाजिक बहिष्कार संपला. सहभोजन ही एक प्रथा आहे ज्यामध्ये येशूच्या शेवटच्या रात्रीच्या जेवणाची आठवण म्हणून ब्रेड, वाइन सेवन केले जाते. याला प्रभूभोजन किंवा युकेरिस्ट असेही म्हणतात. त्यांनी एप्रिल २०१४ मध्ये पहिल्यांदाच चर्चमध्ये मुलांवरील लैंगिक शोषणाची कबुली दिली आणि सार्वजनिकरित्या माफीही मागितली. त्यांनी चर्चच्या पुजारींनी केलेल्या या गुन्ह्याला नैतिक मूल्यांचा ऱ्हास म्हटले. आतापर्यंत कोणत्याही पोपकडून या विषयावर कोणतीही प्रतिक्रिया न मिळाल्याबद्दल व्हॅटिकनवर टीका होत होती. गेल्यावर्षी २७ सप्टेंबर रोजी बेल्जियमच्या भेटीदरम्यान त्यांनी कॅथोलिक चर्चना बाल लैंगिक शोषणाबद्दल माफी मागण्यास सांगितले. त्यांनी ब्रुसेल्समधील पाद्रींकडून लैंगिक शोषण झालेल्या १५ पीडितांनाही भेटले.

## सकारात्मक दृष्टिकोन ठेवायचा आहे

एकनाथ शिंदे यांचे नाव न घेताल लगावला. जेव्हा आम्ही काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेससोबत आघाडी स्थापन केली, तेव्हा आम्ही एकमेकांवर टीका करत होतो. पण एकत्र यायचे ठरल्यावर आम्ही भविष्यकाळाचा विचार केला. २०१४ साली भारतीय जनता पक्षाने आमच्याशी युती तोडली. दोघांनी एकमेकांविरुद्ध प्रचंड टीका केली. परत आम्ही एकत्र आलो, तेव्हा आम्ही भूतकाळात पाहिले नाही. आम्हाला एकत्र यायचे होते आणि आम्ही आलो. आम्ही निवडणूक लढलो. भूतकाळात डोकावलो नाही. उत्तम राजकारण हे भूतकाळात न डोकवण्याचे असते, असे संजय राऊत यांनी म्हटले.

## युतीबाबत आता चर्चा नको

देशपांडेंनी काही सवाल देखील उपस्थित केले आहेत. तर दुसरीकडे उद्धव ठाकरेंनी कोणत्याही अटी टाकल्या नसल्याचे संजय राऊतांनी सांतिगले. उद्धव, राज ठाकरेंच्या युतीच्या चर्चेनंतर शिंदेंच्या शिवसेनेच्या नेत्यांनी देखील प्रतिक्रिया दिल्या आहेत. राज ठाकरेंना अटी-शर्थींवर नमवणे सोप्प नसल्याचे सामंत यांनी म्हटले आहे.

## बीसीसआयचा नऊ खेळाडूंना डच्चू

वेगवान गोलंदाजीचा करार दिला होता. पण यावेळी ते झाले नाही, ज्यामुळे या खेळाडूंना बीसीसीआयच्या यादीतूनही वगळण्यात आले आहे.

**केंद्रीय करार यादी**

ग्रेड ए+: रोहित शर्मा, विराट कोहली, जसप्रीत बुमराह आणि रवींद्र जडेजा. ग्रेड ए : मोहम्मद सिराज, केएल राहुल, शुभमन गिल, हार्दिक पंड्या, मोहम्मद शमी, ऋषभ पंत. ग्रेड बी : सूर्यकुमार यादव, कुलदीप यादव, अक्षर पटेल, यशस्वी जैस्वाल आणि श्रेयस अय्यर. ग्रेड सी : रिंकू सिंग, टिळक वर्मा, ऋतुराज गायकवाड, शिवम दुबे, रवी बिश्नोई, वॉशिंग्टन सुंदर, मुकेश कुमार, संजू सॅमसन, अर्शदीप सिंग, प्रसीध कृष्णा, रजत पाटीदार, ध्रुव जुरेल, सरफराज खान, नितीश कुमार रेड्डी, इशान किशन, अभिषेक शर्मा, अभिषेक शर्मा, अभिषेक शर्मा, अभिषेक शर्मा.

## महिलेची हत्या करून संशयिताची आत्महत्या

तेथून संशयित दुचाकी किंवा चारचाकी वाहनाने फरार झाला असावा, असा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. यासंदर्भात मयत शिल्पा पवार हिचा दीर गुलाब पवार याने मुसळगाव एमआयडीसी पोलिसात अज्ञात व्यक्तीविरोधात फिर्याद दिली आहे. तर महेंद्र रणशवरे यांच्या आत्महत्येप्रकरणी सुभाष रणशेवरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वावी पोलिसात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## अभय कुरुंदकरला जन्मठेप

झाल्यानंतर त्यांची पहिली पोस्टिंग पुणे आणि त्यानंतर सांगली याठिकाणी झाली. २०१५ साली अश्विनी यांची बदली नवी मुंबईतील कळंबोली पोलीस ठाण्यात झाली. मात्र त्या हजर झाल्या नाहीत. त्या हजर का झाल्या नाहीत? या आशयाचे पत्र पोलीस खात्याने पाठवले. त्यावेळी अश्विनीच्या घरातील लोकांना त्या गायब झाल्याचे लक्षात आले.

## आराखडा दहा दिवसात सादर करा

यांच्याबरोबरच अस्तित्वातील रस्त्यांच्या रुंदीकरणाची कामे तातडीने सुरु करावीत. विमानतळ, समृद्धी महामार्ग यांना जोडणाऱ्या मार्गांची कामे युद्धपातळीवर सुरु करा. तसेच शहरातील आवश्यक रस्त्यांची कामे देखील महापालिकेमार्फत नगर नियोजन अंतर्गत घेण्याच्या सूचना त्यांनी केल्या. देशातील शहरांना विकास केंद्र म्हणून प्रस्थापित करण्यासाठी शहरांचा सर्जनशील पुनर्विकास, शहरांच्या पाणी पुरवठा आणि स्वच्छतेच्या प्रस्तावांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाने शहरी आव्हान निधी स्थापन केला आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी जाहीर केलेल्या शहरी आव्हान निधी कार्यक्रमांतर्गत नाशिक शहरातील वाहतूक समस्येचा समावेश करून नागरिकांचा प्रवास सुखकर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.


# गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट अॅण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

---

स्विगी फूड कंपनीसाठी संपूर्ण नाशिक शहराकरिता डिलिव्हरी बॉय पाहिजे. कॉल करा **-अतिक सर** ९८३४१०९३३७

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-**९८६०१३६५३६

### Name changed

I HAVE CHANGE MY OLD NAME KACCHI TOFFIQ TO NEW NAME **TOHFIK AYUB KACHHI.**BY AFFIDAVIT -NO.- 7373-DT.-21/04/2025.

---

My Old Name TABASSUM BANO AHMED SAHEB KOKNI has been changed to My New Name **TABASSUM AHMED SAHAB KOKNI** as per Aadhar Card.

---

My Old Name AHMED RAZA KOKNI has been changed to My New Name **AHMED RAZA ABDUL KADIR KOKNI** as per Aadhar Card.

### जमीन विकणे आहे

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-**८७८८०९२४१५

### महिला व पुरूष पाहिजेत

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१

**एन.एन.असोसिएटस्**, तिसरा मजला, आय.डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी. रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

### विकणे आहे

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क-** ७२०८४९८५२३

---क

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

**जाहिरात छोटी; किमया मोठी !**


## बारामती एमआयडीसीत स्क्रॅप गोडाऊनला आग

**बारामती :** बारामती एमआयडीसीत एका स्क्रॅप मटेरीअलच्या गोडावूनला आग लागल्याची घटना सोमवारी (दि २१) दुपारी घडली. अचानक लागलेल्या या आगीने काही वेळातच रौद्ररुप धारण केले. त्यामुळे आग धुमसत असल्याचे चित्र होते. आगीची तीव्रता मोठी असल्याने सर्वत्र धुराचे साम्राज्य निर्माण झाले होते. भडकलेल्या आगीचे लोट पाहून अनेकांच्या काळजात धडकी भरली. एमआयडीसीतील अग्नीशामक दलाच्या वाहनांनी तातडीने पोहचत आग आटोक्यात आणण्याचे शर्थीचे प्रयत्न सुरुच ठेवले होते. मात्र, आगीची तीव्रता मोठी असल्याने आग धुमसतच होती. आगीचे कारण समजू शकलेले नाही. तसेच या आगीत कोणतीही जीवीतहानी झालेली नसल्याचे प्राथमिक वृत्त आहे. मात्र, स्क्रॅप मटेरीलचे मोठ्या प्रमाणात जळाल्याने लाखों रुपयांचे मोठे नुकसान झाले आहे. आग विझवण्यात अग्निशमन दलाला आता यश आले आहे. एमआयडीसीतील भारत फोर्ज कंपनीच्या पाठीमागील बाजुस हे गोडावून आहे.

**ग्रुप ग्रामपंचायत आहेरवाडी ता. येवला जि. नाशिक**

**जाहीर निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६**

शासन निर्णय क्र. निविदा -२०२१/प्र.क्र.७८/बांधकाम-४ (या शासननिर्णया नुसार)

ग्रुप ग्रामपंचायत आहेरवाडी ता. येवला जि. नाशिक येथे होणाऱ्या कामासाठी लिफाफा बंद दरपत्रकद्वारे निविदा मागवत आहे. सदरच्या तांत्रिक लिफाफामध्ये जिल्हा परिषद नोंदणी, वस्तू व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र व पॅन कार्ड सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे व तसेच आर्थिक लिफाफामध्ये दरपत्रक सादर करण्यात यावे. सदरचा लिफाफा २२/०४/२०२५ सकाळी ९.०० वा. पासून ते दिनांक २८/०४/२०२५ सायंकाळी ५.०० वा. (सार्वजनिक सुट्टी सोडून) पर्यंतच ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्यात यावे व सदर चे लिफाफे दिनांक २९/०४/२०२५ सकाळी ११.०० वा. ग्रामपंचायत कार्यालयात येथे उघडण्यात येतील, लिफाफे उघडण्यात येत असतांना कंत्राटदार स्वतः हजर असणे आवश्यक आहे अन्यथा त्या नंतर सदरच्या निविदा संबधी तक्रार करता येणार. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रुप ग्रामपंचायत आहेरवाडी ता. येवला जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे व अंदाजपत्रके ग्रामपंचायत मध्ये बघण्यास मिळतील.

**कामाचे नाव** :--1) PROVIDING R.O FILTER UNIT TO VILAGE PREIMISES AT HADAPSAWARGAON TAL YEOLA DIST NASHIK EST EMT. 299720/- 2) PROVIDING R.O FILTER UNIT TO VILAGE PREIMISES AT JAYDARE TAL YEOLA DIST NASHIK EST EMT. 299720/-

**सरपंच** **ग्रामपंचायत अधिकारी**

**ग्रुप ग्रामपंचायत, आहेरवाडी, ता.येवला, जि.नाशिक**

**ग्रामपंचायत कुशेगाव ता. इगतपुरी जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सुचना क्र.०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत कुशेगाव ता. इगतपुरी जि. नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून ग्रामपंचायत कुशेगाव. ता. इगतपुरी जि. नाशिक येथे खालीलप्रमाणे ई निविदेद्वारे दरपत्रके मागवत आहे.१) विविध प्रकारचे बांधकाम साहित्य पुरवठा करणे २) विविध प्रकारचे पाणीपुरवठा साहित्य पुरवठा करणे. ३) विविध प्रकारचे विद्युत साहित्य पुरवठा करणे. वरील साहित्य पुरविणेसाठी ई-निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावरून दि.२२/०४/२०२५ ते दि.२८/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. इ निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती वर नमुद संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**सही/- ग्रामपंचायत अधिकारी सही/-सरपंच**
**ग्रामपंचायत कुशेगाव ता. इगतपुरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत वाडीवऱ्हे ता. इगतपुरी जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र.०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत वाडीवऱ्हे ता. इगतपुरी जि. नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून ग्रामपंचायत वाडीवऱ्हे. ता. इगतपुरी जि. नाशिक येथे खालीलप्रमाणे ई निविदेद्वारे दरपत्रके मागवत आहे. १) विविध प्रकारचे पाणीपुरवठा साहित्य पुरवठा करणे. २) विविध प्रकारचे विद्युत साहित्य पुरवठा करणे. वरील साहित्य पुरविणेसाठी ई निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावरून दि.२१/०४/२०२५ ते दि.२८/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. ई निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती वर नमुद संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**सही/- ग्रामपंचायत अधिकारी सही/-प्रशासक**
**ग्रामपंचायत वाडीवऱ्हे ता. इगतपुरी जि. नाशिक**

**ग्रामपंचायत शिंपी टाकळी. ता.निफाड, जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत शिंपी टाकळी. ता.निफाड, जि. नाशिक येथे १५ वित्त अयोग योजने अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीत शेड बांधणे व ग्रामपंचायत पाणीपुरवठ्यासाठी पंपिंग मशीनरी बसविणे या कामासाठी ई-निविदा मागवत आहे. ई-निविदा दिनांक २१/०४/२०२५ पासून शासनाच्या www.mahatender.gov.in प्रसारित करणयात येत आहे. अधिक माहितीसाठी वरील वेबसाईटवर उपलब्ध असून नोंदणीकृत ठेकेदारांनी ई- निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे, रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत शिंपी टाकळी ता.निफाड, जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /- ग्रामपंचायत अधिकारी** **सही/- प्रशासक**
**ग्रामपंचायत शिंपी टाकळी, ता.निफाड जि. नाशिक**

**NMC NOTICE U/S 23 A**

| | | |
|---|---|---|
| Name of the Owners | : | Gajra Associates Partnership Firm |
| Name of Architect | : | Ar. Sumit M. Kumath |
| Structural Engineer | : | Mr. Mitesh V. Mutha |
| Location | : | Survey No. 206/3/1/2/3/Plot/2 ( CTS No.1773/P) Pathardi-2 Shiwar, Dhongade Mala, Nr. Warkari Chowk, Gaulane Road, Pathardi, Nashik- 422 010 |
| Building Permission No | : | LND/ BP / B2 / 226 / 2024, dt.28/02/2024. |
| Allowed F.S.I. | : | 2.5 |
| No. Of Tenements | : | 21 No's of Residential Units (Sanction Plans Are Available On Site) |

**जाहीर नोटीस** नि. ६ नुसार प्रोसेस जमा

**श्री. जनार्दन भाऊसाहेब कुंदे**
**श्री. दिलीप शंकर शिंदे**
**ॲडव्होकेट**

दि. कि. चौ. अर्ज नं. १०/२०२५

**पिंपळगाव (ब) येथील मे. दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात...**

**१. श्रीमती गंगुबाई रामचंद्र हिरे** वय: ७३, धंदा: शेती व घरकाम, **२. श्रीमती. भारती राजेश हिरे,** वय: ५०, धंदा: शेती व घरकाम, **३. कु. आसावरी राजेश हिरे** वय:२०, धंदा : शिक्षण नं. १ ते ३ रा. पालखेड, ता. निफाड, जि.नाशिक ह.मु. रा. आदर्श घरकुल सोसायटी, बिल्डींग नं. १, बी-विंग, रूम नं. २८, २ मजला, सरदार नगर-४, रावळी, मॅटर्निटी हॉस्पिटल जवळ, सायन कोळीवाडा, मुंबई-४०००३७ **अर्जदार**

**विरुद्ध**

**कोणीही नाही** **सामनेवाले**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसेने कळविण्यात येते की, ज्याअर्थी सदर अर्जातील अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ यांचे सासरे व अर्जदार नं. ३ यांचे आजोबा नामे **रामचंद्र तुकाराम हिरे** हे **दिनांक १९/०५/१९९७** रोजी **मौजे पालखेड**, ता. निफाड, जि. नाशिक मयत झालेले आहे. तसेच अर्जदार नं. १ यांचा मुलगा व अर्जदार नं. २ यांचे पती व अर्जदार नं. ३ यांचे यांचे वडील नामे **राजेश रामचंद्र हिरे** हे **दिनांक २२/०६/२०१८** रोजी मुंबई येथे मयत झालेले आहे. त्यांना अर्जदार यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांनी शेतजमिनीचे रेकॉर्ड ऑफ राईटला वारस नोंदीसाठी अर्जदार नं. १ ते ३ हे मयत नामे **रामचंद्र तुकाराम हिरे** व मयत नामे **राजेश रामचंद्र हिरे** यांचे कायदेशीर वारस आहेत, असा जाहीर ठराव करून मिळाणेसाठी व तसा वारस दाखला **(हेअरशिप सर्टिफिकेट)** मिळणेसाठी मे. न्यायालयात सदरचा दि. कि. चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जाबाबत कोणाचे काही म्हणणे असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून **एक** महिन्याचे आत हरकत घ्यावी अगर **दि.२६/०६/२०२५** रोजी **सकाळी १०:३० वाजता** किंवा त्यापूर्वी उपरोक्त न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत हजर राहुन योग्य त्या कागदपत्रांसह लेखी म्हणणे/हरकत दाखल करावी, मुदतीत कोणाचे म्हणणे/हरकत अगर तक्रार न आल्यास मे. न्यायालय अर्जदारांचा योग्य तो पुरावा घेऊन पुढील आदेश/हुकुम करतील. त्यानंतर कोणाचेही काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस. आज **१७/०४/२०२५** रोजी मे. न्यायालयाचे हुकुमावरून शिक्क्यानिशी व सहीनिशी दिली असे.

**सही/- कामगिरी लिपिक** (शिक्का) **सही/- सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायाधीश क, स्तर, पिंपळगाव (ब), जि. नाशिक** **दिवाणी न्यायाधीश क, स्तर पिंपळगाव (ब), जि. नाशिक**

**श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था**
**मर्या. डुबेरे, शाखा-नाशिकरोड, ता. जि.नाशिक.**

**गहाण घेणेच्या मिळकतीबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या गहाण घ्यावयाच्या मिळकतीच्या संबंधाने जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

१) मिळकतीचे वर्णन - अ) मौजे सावतामाळीनगर, ता. सिन्नर, जि. नाशिक येथील शेतजमिन मिळकत गट नं. ४२ यांसी क्षेत्र हे.०-७५ आर. पो. ख. हे. ०-०८ आर. आकार रु. ०-६५ पैसे. यापैकी सुरेश रघुनाथ कुसाळकर यांचे मालकीचे खाते नं. १२८ वरील क्षेत्र हे. ०-३५ आर. पो. ख. हे. ०-०८ आर. आकार रु. ०-३० आर. ही शेतजमिन मिळकत. ब) मौजे देवळाली १, ता. जि. नाशिक येथील बिनशेती प्लॉट व त्यावर असलेल्या इमारतीमधील फ्लॅट मिळकत यांसी सर्व्हे नं. ३१/१क/१ मधील प्लॉट नं. १ यांसी क्षेत्र १२९०.३७ चौ. मी. आकार रु. ८१२.९३ पैसे. या प्लॉट मिळकतीवर असलेली शुभलक्ष्मी को. ऑप. हौसिंग सोसायटी या नावाने ओळखल्या जाणा-या इमारतीमधील दुस-या मजल्यावरील फ्लॅट नं. १० यांसी क्षेत्र ५४९.०० चौ. फुट ही ललिता राजु धनवडे यांचे मालकीची मिळकत, यांसी चतु:सिमा रे. ऑ. रा. प्रमाणे.

२) कर्जदाराचे नांव :- श्री. निलेश राजु धनवडे
३) संमती देणार :- सौ. ललिता राजु धनवडे, श्री. सुरेश रघुनाथ कुसाळकर
४) कर्जाचा प्रकार :- जमिन गृहतारण
५) पतसंस्थेचे नांव :- श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे नागरी सहकारी पतसंस्था मर्या. डुबेरे, शाखा नाशिकरोड, ता. जि. नाशिक.
६) नोटीसचा उदेश :- टायटल व्हेरिफिकेशन

७) वर कलम २ मध्ये नमूद केलेल्या कर्जदार यांनी वर कलम ५ यांत नमूद पतसंस्थेकडे वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत तारण ठेवून कर्जाची मागणी केलेली आहे. सदर कर्जासाठी वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत या मिळकतीचे मालक यांचे संमतीने पतसंस्थेकडे गहाण देण्याचे मान्य व कबुल केले असून सदर कर्जास उपरोक्त नमूद मिळकत तारण देण्यास मिळकतीचे मालक यांनी संमती दिलेली आहे.

८) वर कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या मालकी, टायटल बाबत अगर मिळकत मालक यांचे मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत अगर तक्रार असल्यास तसेच सदरची मिळकत इतर कोणाकडे गहाण, दान, लिन, लिज, बक्षिसपत्र, मुखत्यारपत्र, करार, मृत्युपत्र, अन्नवस्त्र व वित्तीय संस्थेचा बोजा, साठेखत, विसारपावती, विकसन करारनामा, जामिनकी, कोर्ट, दावा इ. कारणाने बोजा असल्यास अगर कोणाचाही काही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ५ (पाच) दिवसाचे आंत आमचे कार्यालयांत तसेच पतसंस्थेचे कार्यालयांत लेखी साक्षांकित पुराव्यासह हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे असे समजून कर्ज देणेकामी तारण/गहाण घेतली जाईल व कर्ज वितरण करण्यात येईल. सदर मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा तसेच परस्पर वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी. सदर जाहीर नोटीस कर्जदार यांचे सांगणेवरुन प्रसिध्द करणेकामी पतसंस्थेमार्फत जाहीर नोटीस,

स्थळ-सिन्नर,दिनांक-२१/०४/२०२५

**श्री. प्रदीप लक्ष्मर वारूंगसे (ॲडव्होकेट)**
**ऑफिस- लहामगे बिल्डींग, सिन्नर न्यायालयासमोर, सिन्नर, जि.नाशिक**

## कर्जतमध्ये महिलांचा हंडा मोर्चा

**कर्जत :** कर्जतमधील नाना मास्तरनगर परिसरातील पाणी समस्या गेली अनेक वर्षे नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहणारी ठरत आहे. वेळेवर पाणी न मिळणे, पाणी कमी दाबाने येणे आणि पुरेसे पाणी न मिळणे यामुळे नागरिक प्रचंड त्रस्त झाले आहेत. अनेकदा तक्रारी करूनही नगरपालिकेकडून याकडे वारंवार दुर्लक्ष झाल्याने अखेर या संतप्त नागरिकांनी सोमवारी (ता. २१) आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. संतप्त महिला हंडे घेऊनच नगरपालिकेत गेल्याने प्रशासनात गोंधळ उडाला होता. हंडामोर्चा काढत महिलांनी जलद आणि ठोस उपाययोजनांची मागणी करीत प्रशासनाला जाब विचारला.

**ग्रामपंचायत म्हसुर्ली ता. इगतपुरी जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सुचना क्र.०१/२०२५-२६ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत म्हसुर्ली ता. इगतपुरी जि. नाशिक येथे महाराष्ट्र शासनाच्या योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत पुरवठादार यांच्याकडून ग्रामपंचायत म्हसुर्ली. ता. इगतपुरी जि. नाशिक येथे खालील प्रमाणे ई निविदेद्वारे दरपत्रके मागवत आहे. १) विविध प्रकारचे बांधकाम साहित्य पुरवठा करणे, २) विविध प्रकारचे पाणीपुरवठा साहित्य पुरवठा करणे. ३) विविध प्रकारचे विद्युत साहित्य पुरवठा करणे. वरील साहित्य पुरविणेसाठी ई-निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविण्यात येत आहे. सदर इ निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in/ या संकेतस्थळावरून दि.२२/०४/२०२५ ते दि.२८/०४/२०२५ पर्यंत खरेदी व दाखल करता येईल. ई-निविदा संबंधीची सविस्तर माहिती अटी व शर्ती वर नमुद संकेतस्थळावर पाहण्यासाठी उपलब्ध आहेत.

**सही/- ग्रामपंचायत अधिकारी** **सही/-प्रशासक**
**ग्रामपंचायत म्हसुर्ली ता. इगतपुरी जि. नाशिक**

**जाहीर निवेदन**

सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, **कै. देविदास सदाशिव पाटील**, रा. गुलमोहर हौ.सो एस. आर. नं ६,१ मोतीवाला कॉलेज, गंगापूर, नाशिक येथील रहिवासी असून सरकारी कर्मचारी होते. ते **दिनांक २७/०४/२०२१** रोजी मयत झालेले असून त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

| अ.नं | वारसांची नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| १ | अमोल देविदास पाटील | ४८ | मुलगा |
| २ | पंकज देविदास पाटील | ४४ | मुलगा |
| ३ | सुयोग देविदास पाटील | ४१ | मुलगा |

हे वारस असून यांच्या व्यतिरिक्त दुसरे कोणीही वारस नाही, तरी कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी मा. तहसिलदार साहेब, नाशिक यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत लेखी खुलासा करावा. अन्यथा मा. तहसिलदार नाशिक यांचेकडून वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येतील. याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार, नाशिकरिता**

**ग्रामपंचायत मरळगोई बु. ता.निफाड जि. नाशिक**

**जाहीर ई- निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२०२६ (प्रथम प्रसारण)**

ग्रामपंचायत मरळगोई बु. ता.निफाड जि. नाशिक येथे १५ वित्त अयोग योजने अंतर्गत ग्रामपंचायत हद्दीत पेव्हरब्लॉक बसविणे कामी ई-निविदा मागवत आहे. ई-निविदा दिनांक २१/०४/२०२५ रोजी शासनाच्या www.mahatender.gov.in प्रसारित करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी वरील वेबसाईट वर उपलब्ध असून ठेकेदारांनी/पुरवठादारांनी ई-निविदा भरण्याबाबतची कार्यवाही करावी. निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार ग्रामपंचायत मरळगोई बु., ता.निफाड जि. नाशिक यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहे.

**सही /- ग्रामपंचायत अधिकारी** **सही/- प्रशासक**
**ग्रामपंचायत मरळगोई बु., ता.निफाड जि. नाशिक**

**घोटी पोलीस ठाणे नाशिक ग्रामीण उपविभाग नाशिक**

फोन व फॅक्स नं- ०२५५३-२२०५४४
ई मेल आय डी- ghoti.pstn@gmail.com
घोटी पोलीस ठाणे जावक क्र- १२३२/२०२५ दि-०८/०४/२०२५

**जाहीर निवेदन**

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, घोटी पोलीस ठाणे आवारात मागील काही वर्षापासून विविध कंपन्यांच्या पोलीस ठाणे अभिलेखावरील गुन्ह्यातील तसेच बेवारस जप्त मोटरसायकल पडून आहेत. सदर मोटरसायकल ताब्यात घेण्यासाठी मोटरसायकलचे कोणीही मालक अद्याप पावेतो पोलीस ठाणेस आलेले नाहीत. तरी ज्या नागरिकांची मोटरसायकल घोटी पोलीस ठाणे येथील अभिलेखावरील गुन्ह्यांतील तसेच अपघातातील वाहनांमध्ये जप्त असेल त्यांनी आपले वाहनाची खात्री करुन वाहन ज्यांचे मालकीचे असेल, त्यांनी मोटरसायकलचे व चारचाकी वाहनांचे कागदपत्रांसह घोटी पोलीस ठाणे येथे संपर्क साधून पुढील ०७ दिवसांचे आत घेवुन जावी. विहीत मुदतीपर्यंत संपर्क न साधल्यास सदर मोटरसायकलचा लिलावाची कायदेशीर प्रक्रिया करण्यात येईल.

**कळावे, दि-०८/०४/२०२५**

**पोलीस निरीक्षक**
**घोटी पोलीस स्टेशन**

**जाहीर नोटीस** नि. ६ नुसार प्रोसेस जमा

**ॲड. रुपाली रमेश पाठक (पंडित), सटाणा, जि.नाशिक**

**जा.क्र.९४२/२०२५ दि.१७/०४/२०२५ वारस प्रमाणपत्र अर्ज क्रमांक.७१/२०२५**

**सटाणा येथील मा. दिवाणी न्यायाधिश क. स्तर यांचे न्यायालयात......**

**१) श्री.ज्ञानेश्वर शामराव पवार**, वय ३५ वर्षे,
**२) सौ.केदाबाई दशरथ सोनवणे**, वय ४७ वर्षे,
**३) सौ. अनिता चैत्राम माळी**, वय ३५ वर्षे,
सर्व धंदा-शेती सर्व रा. वनोली, ता. बागलाण, जि.नाशिक **अर्जदार**

**विरुध्द**

**कोणीही नाही** **सा.वाला**

ज्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार नं. १ ते ३ यांची आई नामे **जिजाबाई शामराव पवार** ही **दिनांक ०८/०८/२०२३** रोजी मयत झालेली असून त्यांचे मृत्यूनंतर अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे कथन करुन अर्जदारांनी मे. कोर्टाकडून लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेकामी प्रस्तुतचा अर्ज मे. कोर्टात दाखल केला आहे. त्याअर्थी, प्रस्तुत अर्जातील अर्जदार हे मयत **जिजाबाई शामराव पवार** त्यांचे मृत्यूनंतर कायदेशीर वारस आहेत/नाहीत याबाबत कोणाची हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्दीपासून **३०** दिवसांचे आत अगर **दिनांक ९/५/२०२५** रोजी स्वत: अगर वकीलांमार्फत हजर होऊन आपले लेखी म्हणणे दाखल करावे. वरील मुदतीत कोणाची हरकत अगर तक्रार न आल्यास मे. कोर्ट अर्जदारांचा योग्य तो पुढील पुरावा घेऊन आदेश करेल. मग त्यानंतर कोणाचे काहीही म्हणणे ऐकले जाणार नाही. आज **दिनांक ९/०४/२०२५** रोजी माझी सही व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

**कामगिरी लिपिक** (शिक्का) **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक** **दिवाणी न्यायालय, सटाणा, नाशिक**

**टायटल व्हेरिफिकेशन कामी जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की...

**मिळकतीचे वर्णन** - तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका इगतपुरी पैकी **मौजे वाडीवऱ्हे** या गावाचे शिवारातील बिनशेती प्लॉट मिळकत यांसी भूमापन क्रमांक व उपविभाग **३०७/अ/३०७/ब/१५/प्लॉट नं/१३ यांसी क्षेत्र ९८.०० चौ.मी** आणि भूमापन क्रमांक व उपविभाग **३०७/अ/३०७/ब/१६/प्लॉट नं/१४ यांसी क्षेत्र ९८.०० चौ.मी** ह्या भूखंड मिळकती

२) वर कलम १ यात वर्णन केलेल्या प्लॉट मिळकती ह्या **दिपाली प्रदीप कडनोर उर्फ दिपाली बाळू मते** यांच्या खरेदी मालकीच्या मिळकती असून मिळकतीचे रेकोर्ड ऑफ राईटसला सदरहू मालकांचे नाव मालक व कब्जेदार सदरी दाखल आहेत. सबब सदरहू मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशन करणेकामी प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

३) सबब कलम १ मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कुठलाही, कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध अथवा कोणताही दस्तऐवज अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास अथवा कोर्ट वाद असल्यास त्यांनी सदरहू नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खालील पत्यावर समक्ष येऊन पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात, तोंडी किवा परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या नोटीस हरकतीची दखल घेतली जाणार नाही. तसेच मुदतीत हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल व मिळकत टायटल क्लिअर आहे, असे सर्टिफिकेट देण्यात येईल व मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत मिळकतीवर व मिळकत मालकांवर बंधनकारक राहणार नाही.सदरची नोटीस मिळकत मालकांचे सांगणेवरून प्रसिद्ध करण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी. कळावे, ही टायटल व्हेरिफिकेशनकामी जाहीर नोटीस नाशिक, दिनांक- २१/०४/२०२५

**सही/-विधिज्ञ. सागर सतीश शेजवळ**
**कार्यालय: बीजे-१६, बेसमेंट, ठक्कर बाजार वाणिज्य संकुल, नवीन बस स्थानक (सी.बी.एस),नाशिक ४२२००१**
**दूरध्वनी-(०२५३) २३१०९०५ भ्रमणध्वनी- ९४२३९६१८३३**

## महत्त्वाचे



### पांडे विद्यालयातील विद्यार्थ्यांचे चेहडी ग्रामस्थांनी केले कौतुक

**नाशिकरोड :** साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या चेहडी येथील एस.के. पांडे विदयालय व ज्युनिअर कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा म्हणजे एनएमएमएस या स्पर्धा परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केल्याबद्दल ग्रामस्थ पालकांनी या विद्यार्थ्यांची चेहडी शिवापासून गावातील हनुमान मदिरापर्यंत सजविलेल्या ट्रॅक्टर मधून सवाद्य भव्य शोभायात्रा काढून त्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक वृंदांचा भगवे फेटे बांधून हृद्य गौरव करण्यात आला. एनएमएमएस ही शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी असते. संपूर्ण भारतात प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेण्यासाठी २००७ पासून शिक्षण मंत्रालय भारत सरकारने आयोजित केली आहे. भारतातील एक लाख विदयार्थ्यांची या परीक्षेतून निवड केली जाते. गुणवत्ता यादीत येणाऱ्या विदयार्थ्यांस इयत्ता नववी ते बारावीपर्यंत १२ हजार रुपये दरवर्षी मिळतात. तर जे विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये येत नाही अशा मराठा- कुणबी जातीच्या विद्यार्थ्यांना छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे म्हणजेच सारथी या संस्थेमार्फत इयत्ता नववी ते बारावी पर्यंत दरवर्षी ९६०० रू.मिळतात.ही शिष्यवृत्ती ही फक्त महाराष्ट्र राज्यासाठीच असते. पुण्याच्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे ही परीक्षा घेतली जाते. पांडे विद्यालयाने एनएमएमएस परीक्षेत सातत्याने चांगली कामगिरी करून उज्ज्वल यशाचा आलेख चढता ठेवला आहे. यावर्षी तब्बल ४१ विद्यार्थ्यांना यश मिळाले आहे. पैकी २६ विद्यार्थी एनएमएमएस तर १५ विदयार्थी सारथीच्या गुणवत्ता यादीत चमकले आहे. या गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांचा दोन सजवलेल्या ट्रॅक्टर मधून डीजेच्या ठेक्यात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. चौका चौकात त्यांचे औक्षणही करण्यात आले. माईक वरून त्यांची नावेही पुकारली जात होती. गावातील हनुमान मंदिरात प्राचार्य साहेबराव निळे व परिक्षा प्रमुख विनोद पानसरे सह गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. याकामी अनिल सातपुते, सोमनाथ ताजनपुरे, संदीप कमानकर, मीनाक्षी ताजनपुरे यांचे सहकार्य लाभले. मोहन पाळदे, गणेश ताजनपुरे, बाळासाहेब ताजनपुरे आदींनी विशेष पुढाकार घेतला होता.




### मविप्रच्या केबीटी महाविद्यालयात 'टेक फेस्ट'

**नाशिक :** मॅड फॉर कॅड, कोड रिले, रोबो रेस, ब्रिज इट, माइंड स्पार्क, इन्नोटेक एक्स्पो तसेच प्रोजेक्ट कॉम्पिटिशन अशा विविध स्पर्धांनी 'केबीटी टेक फेस्ट २०२५'मध्ये चांगलीच रंगत आणली. या स्पर्धांसाठी महाविद्यालयाकडून दोन लाखांपर्यंतची आकर्षक बक्षिसेदेखील ठेवण्यात आली होती. गंगापूर रोडवरील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या अ‍ॅड. बाबुराव गणपतराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महिंद्रा अँड महिंद्रा कंपनीच्या क्वालिटी विभागाचे प्रॉडक्शन मॅनेजर व केबीटी महाविद्यालयाचे २००७ च्या बॅचचे माजी विद्यार्थी अनिरुद्ध राजुरकर, मविप्र संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. देवणे, उपप्राचार्य डॉ. एस. जे. कोकाटे, रजिस्ट्रार एस. जे. शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी विविध विभागांतर्फे विद्यार्थ्यांसाठी विविध शाखांशी निगडित टेक्निकल स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी टेक्निकल स्किल वापरून अनेकविध गुण कौशल्यांचे सादरीकरण करून सर्वांचे लक्ष वेधले. मविप्र संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे यांनी महाविद्यालयाला नुकतेच प्राप्त झालेले एनबीए मानांकन तसेच महाविद्यालयात सुरू झालेल्या रोबोटिक्स अँड ऑटोमेशनसारख्या नवीन शाखा तसेच वाढीव जागांसाठी विद्यापीठाकडून मिळालेल्या परवानगीबद्दल महाविद्यालयीन कर्मचारी इत्यादी सर्वांचे अभिनंदन केले.



## गोविंदपुरी गाव झाले टँकरमुक्त

**नाशिक :** केंद्र शासनाच्या महत्वाकांक्षी जलजीवन मिशन योजनेअंतर्गत नाशिक तालुक्यातील गंगा म्हाळुंगी ग्रामपंचायती अंतर्गत येणाऱ्या गोविंदपुरी गावातील पाणीटंचाईचा प्रश्न अखेर संपुष्टात आला आहे. मागील सात वर्षांपासून या गावात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र जलजीवन मिशन योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे दिनांक ०७ पासून गावात नळाद्वारे नियमित पाणीपुरवठा सुरू करण्यात आला असून, या बदलामुळे गाव टँकरमुक्त बनले आहे. गोविंदपुरी हे सुमारे ४०० लोकसंख्येचे गाव असून, त्याची भौगोलिक रचना जमीन सपाटीपासून तब्बल १०५ मीटर उंचावर आहे. त्यामुळे या भागात भौगोलिक मर्यादेमुळे पाणी पोहचवणे हे मोठे तांत्रिक आव्हान होते. यासाठी तीन फेज वीजपुरवठ्याची आवश्यकता होती, परंतु यासाठी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध नव्हती. ही अडचण लक्षात घेऊन पंचायत समिती नाशिकच्या गटविकास अधिकारी डॉ. सोनिया नाकाडे यांनी विशेष पुढाकार घेत डॉ. नाकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती स्तरावरील १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून विशेष तरतूद करून १०० अश्वशक्तीचा विद्युत रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) गावात बसवण्यात आला. या महत्त्वपूर्ण यंत्रणेमुळे जल जीवन मिशन योजनेंतर्गत पाणीपुरवठा यंत्रणा सक्षम करण्यात आली. या रोहित्राच्या साहाय्याने १५ अश्वशक्तीचा जलपंप कार्यान्वित करण्यात आला आणि शेवटी गावात नळाद्वारे सातत्यपूर्ण पाणीपुरवठा सुरू होऊ शकला. या योजनेची अंमलबजावणी केवळ तांत्रिकदृष्ट्या नव्हे तर व्यवस्थापनदृष्ट्याही एक उत्कृष्ट उदाहरण ठरली आहे. ग्रामपंचायतीच्या सहकार्याने व लोकसहभागातून या उपक्रमात गती प्राप्त झाली. स्थानिक ग्रामस्थांनीही पाणी टंचाईपासून मुक्त होण्यासाठी प्रशासनास सहकार्य केले. परिणामी, गोविंदपुरीसारख्या उंचावरील गावातही शाश्वत जलसंपदा निर्माण होऊन 'हर घर नल से जल' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरले आहे. यासाठी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपकार्यकारी अभियंता विनोद देसले यांनी योजना पूर्ण करण्यासाठी सर्व यंत्रणांशी समन्वय साधला असून सरपंच भारती मनोहर खोडे,ग्रामपंचायत अधिकारी गंगाराम लहानु गायकवाड मक्तेदार अभिषेक पाटील व महावितरणचे अधिकारी व कर्मचारी आदींनी याकामी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात ८२ टँकरद्वारे पाणीपुरवठा

## येवला तालुक्यात सर्वाधिक टंचाई

**नाशिक : प्रतिनिधी**

**जिल्हयात पाणी टंचाई दिवसेंदिवस तीव्र होत आहे. जिल्हयाच्या ग्रामीण भागात एप्रिल महिन्याच्या मध्यात भीषण पाणी टंचाई जाणवत असल्याचे चित्र आहे. जिल्हयातील ८२ हजार ४५१ लोकवस्तीला ४९ टँकरद्वारे ८२ फेऱ्यांच्या माध्यमातून तहान भागवली जात आहे.**

प्रशासनाकडून जिल्हयातील ९ तालुक्यांसाठी ७ शासकीय व ४२ खासगी टँकरद्वारे ८० टँकर फेऱ्या मंजूर केल्या आहेत.

मात्र ८२ टँकरच्या फेऱ्यांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. सर्वाधिक पाणीटंचाई येवला तालुक्यात जाणवत असून, तालुक्यातील ३१ गावे व ४१ वस्त्यांवर २९ टँकरद्वारे ५१ फेऱ्यांच्या माध्यमातून पाणीपुरवठा होत आहे. एप्रिल महिन्यात सातत्याने टँकरच्या मागणीत वाढ होत असल्याने मे महिन्यात पाणीटंचाईची तीव्रता वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

जिल्ह्यात एकूण धरण समूहात ३५ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षीच या कालावधीत २९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे पाणी जपून वापरण्याचे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे. एप्रिल महिन्यात ही परिस्थिती आहे. मे महिन्यात काय होईल? असा प्रश्न नागरिकांना भेडसावत आहे.

| तालुका | गाव | टँकर | फेऱ्या |
|---|---|---|---|
| चांदवड | २ | २ | २ |
| देवळा | ४ | २ | २ |
| इगतपुरी | ७ | १ | २ |
| मालेगांव | १७ | ७ | १३ |
| पेठ | २ | २ | २ |
| सुरगाणा | ३ | ३ | ७ |
| सिन्नर | ८ | ३ | ३ |
| येवला | ७२ | २९ | ५१ |
| एकूण | ११५ | ४९ | ८२ |




### धरण समूहात ३५.२४ टक्के पाणीसाठा

जिल्ह्याच्या धरणसाठ्यांत उन्हामुळे होणाऱ्या बाष्पीभवनामुळे दिवसेंदिवस घट होत आहे. पंधरा दिवसांपूर्वी ४७ टक्क्यांवर असलेला पाणीसाठा आता ३५.२४ टक्क्यांवर आला आहे. तर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात ५६.१८ टक्के पाणीसाठा आहे.

### १६ विहिरींचे अधिग्रहण

पाणी टंचाई असलेल्या गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी जिल्हयात १६ विहीरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे. यात गावांसाठी २ तर टँकरसाठी १४ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

# दिंडोरी रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ घरफोडी

## सोन्या चांदीच्या दागिन्यांसह रोख रकमेवर डल्ला

**पंचवटी : वार्ताहर**

दिंडोरी रोडवरील रिलायन्स पेट्रोल पंपाजवळ बंद फ्लॅटचे कुलूप तोडून घरफोडी करण्यात आली असून यात सोन्या चांदीच्या दागिन्यांसह रोख रकमेवर डल्ला मारला आहे.याबाबत म्हसरूळ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कुलदिप शेषराव खांडेकर (३६), रा. रिलायन्स पेट्रोल पंपा जवळ, दिंडोरी रोड, म्हसरुळ यांनी म्हसरूळ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी त्यांच्या अकोला या गावी गेलेले असतांना दि.१२ एप्रिल रोजी सायंकाळी ७ ते दि.१९ एप्रिल २०२५ रोजीचे सांयकाळी ७ वाजेच्या दरम्यान रिलायन्स पेट्रोल पंपा जवळ, दिंडोरी रोड, म्हसरुळ येथे अज्ञात चोरटयाने बंद फ्लॅटच्या मुख्य दरवाजाचे कुलुप तोडुन आत प्रवेश करत बेडरुम मध्ये ठेवलेल्या लोखंडी कपाटातील ५५ हजार रुपये किमतीच्या तिन सोन्याच्या अंगठया प्रत्येकी वजन ५ ग्रॅम,३ ग्रॅम, २: ५ ग्रॅम, ११ हजार रूपये किमतीचे सोन्याचे २१ मणी एकुण वजन अंदाजे ७ ग्रॅम, ६ हजार रुपये किमतीची एक सोन्याची बुध्दाची मुर्ती वजन १.५८० मिलीग्रॅम, २० हजार रूपये किमतीची सोन्याच्या कानातील ई रिंग रिंगा एक जोड ५.१७९ मिली ग्रॅम,१५ हजार रूपये किमतीचे सोन्याच्या लहान मुलीच्या कानातील कर्णफुले एक जोड व एक जोड रिंग एकुण ३.५ ग्रॅम , १० हजार रूपये किमतीच्या चांदीच्या चैनपट्टया चार जोड, ४ हजार रुपये किमतीच्या दोन चांदीच्या कमरपट्ट्या, ८०० रुपये चांदीचे दोन नग लहान मुलीचे हातातील चांदीचे कडे व ५ हजार रोख असे १ लाख २६ हजार ८०० मुद्देमाल गेला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक मद्रुपकर करत आहेत.

# खोट्या कागदपत्रांच्या आधारे सुमारे तीन कोटींची फसवणूक

## अंबड पोलिसात गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सायली टॉवर्स प्रा. लि. हॉटेलच्या लिव्ह अ‍ॅन्ड लायसन करारनाम्यात बनावट दस्तऐवज सादर करून तब्बल २ कोटी ९३ लाख ८ हजार ५८ रुपये इतकी आर्थिक फसवणूक केल्याचा गंभीर प्रकार अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आला आहे. याप्रकरणी तीन आरोपींविरोधात गंभीर स्वरूपाचे फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

फिर्यादी समीर सुरेश नहार (वय ४५, रा. सुमीत बंगला, वनराज सोसायटी, रविंद्र शाळेजवळ, द्वारका, नाशिक) यांचे मालकीचे सायली टॉवर्स प्रा. लि. आणि सुरेश प्लाझा हॉटेल, मौजे कामटवाडे, नाशिक येथे असून त्यांनी दि. ०१ ऑगस्ट २०१९ रोजी हे हॉटेल 'माय प्रेफर्ड ट्रान्सफॉर्मेशन अँड हॉस्पिटॅलिटी प्रा. लि.' या कंपनीला पाच वर्षांच्या कालावधीसाठी लिव्ह अ‍ॅन्ड लायसन करारनाम्याने दिले होते. या कंपनीचे संचालक राकेशकुमार प्रुस्ती, अनुज तेजपाल आणि अनुराग पारिख असल्याचे नमूद करण्यात आले आहे. करारनाम्याच्या अटी आणि शर्तीचे पालन न करता व फिर्यादीची परवानगी न घेता बनावट दस्तऐवज तयार करण्यात आले. या दस्तऐवजावर फिर्यादीची बनावट सही करण्यात आली व त्याचा फोटो त्यांच्या व्हॉट्सअ‍ॅप क्रमांकावर पाठवून खरे असल्याचे भासवले. या बनावट दस्तावेजांच्या आधारे विविध आर्थिक व्यवहार करण्यात आले व फिर्यादीचा विश्वासघात करून तब्बल २.९३ कोटी रुपयांची फसवणूक करण्यात आली.

हा प्रकार उघडकीस आल्यानंतर समीर नहार यांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपी राकेशकुमार प्रुस्ती, अनुज तेजपाल आणि अनुराग पारिख (पूर्ण पत्ता नामहीत नाही) यांच्याविरोधात अंबड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा पुढील तपास अंबड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली मदतनीस पोलीस उपनिरीक्षक सविता उंडे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) शिरसाठ करत आणि महिला पोलिस उपनिरीक्षक सविता उंडे करीत आहेत.

## खासगी सावकार राणेवर तिसरा गुन्हा

# गहाण ठेवलेली इनोव्हा बळकावली

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

आर्थिक कोंडीत आडकलेल्या उपेंद्र नगर येथील एका तरुण चालकाने तात्पुरत्या वापरासाठी ओळखीच्या व्यक्तीद्वारे इनोव्हा गाडी गहाण दिली. परंतु, ठरलेली रक्कम देऊनही संबंधित अवैधरीत्या सावकारी करणारा सावकार गाडी परत देण्यास टाळाटाळ केली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

गाडी चालक प्रवीण मुरलीधर खैरनार (वय ३२), रा. रूम नं. १२, रिंकी संकुल, उपेंद्रनगर, सिडको, नाशिक, मूळ रा. लासलगाव, ता. निफाड, हे खासगी वाहतूक सेवा देत होते. जानेवारी २०२४ मध्ये त्यांनी इनोव्हा आय.डी.एफ.सी. बँकेकडून कर्ज घेऊन खरेदी केली होती. परंतु काही महिन्यांतच त्यांच्यावर आर्थिक ताण वाढला. त्यामुळे संभाजी नगर येथील सादिक नावाच्या (पूर्ण माहिती अज्ञात) ओळखीच्या व्यक्तीमार्फत सिडकोतील खुटवडनगर येथे खाजगी सावकारी करणारा विवेक उर्फ मुन्ना राणे (रा. वावरे प्लाझा, खुटवडनगर, नाशिक) याच्याकडे ५,२०,००० रुपयांच्या गहाणखतावर दि. ३१ ऑगस्ट २०२४ रोजी इनोव्हा दिली. यापैकी केवळ ४ लाख रुपये त्यांनी तात्काळ घेतले. उर्वरित रक्कम घेण्यासाठी प्रवीण यांनी पुन्हा १ लाख ५० हजार रुपये विवेक राणेला वेळोवेळी रोख स्वरूपात दिले. त्यानंतर गाडी मालक खैरनार यांनी आपली गहाण ठेवलेली गाडी परत मागितल्यावर सावकार विवेक राणे हा टाळाटाळ करू लागला. गाडी बाहेरगावी आहे. येईल तेव्हा देतो. अशी एक ना अनेक कारणे सांगून उडवाउडवीची उत्तरे देत गाडी परत करण्यास नकार दिला. नंतर त्याने फोन देखील स्वीकारणे बंद केले. आहे. चार महिने गाडीशिवाय राहिल्यामुळे प्रविण यांचा उत्पन्नाचा स्रोतच बंद झाला. गाडीवरील महिन्याचा ४२ हजार ,४२१ रुपयांचा हप्ता भरता न आल्याने बँकेचे हप्ते थकित झाले आहेत. तक्रारदार प्रवीण खैरनार यांनी अंबड पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीवरून विवेक राणे यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# माजी खा.हुसैन दलवाई आज नाशिक दौऱ्यावर



**नाशिक : प्रतिनिधी**

**नाशिक :** काँग्रेसचे माजी खासदार हुसेन दलवाई आज मंगळवार दि.२२ रोजी नाशिक दौऱ्यावर येणार असून, सात पीर दर्गा जागेची पाहणी करणार आहेत.

काठे गल्ली द्वारका, नाशिक येथील सात पीर दर्गा नाशिक महापालिकेकडून बुलडोझरने उद्ध्वस्त करण्यात आला. त्यामुळे बरेच वादंग निर्माण झाले आहे. याप्रकरणी नेमके काय घडले? हे जाऊन पाहणार आहेत व तेथील लोकांच्या भावना समजून घेणार आहेत. या दौऱ्यासाठी बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

# धोकादायक इमारतीत विद्यार्थी गिरवतात धडे

## मनसेचे जिल्हा परिषद प्रशासनाला निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांच्या इमारती सद्य स्थितीत धोकादायक स्थितीत आहे. एक दीड महिन्यांवर पावसाळा आला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी या इमारतींची १५ जूनपूर्वी दुरूस्ती करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे करण्यात आली आहे. यावर येत्या दोन-तीन दिवसात संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले जातील, असे आश्वासन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अर्जुन गुंडे यांनी दिले.सोमवारी (दि. २१) मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने जिल्हा परिषदेत येऊन गुंडे यांची भेट घेतली.जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये गोरगरीबांची मुले शिकायला येतात. मात्र , खाजगी शाळांची तुलना करता जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये सोयी सुविधांचा अभाव आहे. ज्या ठिकाणी बसून मुले ज्ञानाचे धडे गिरवितात, त्या इमारतींची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.



अशा धोकादायक इमारत असलेल्या शाळांची पाहणी करण्यात यावी. संबंधित इमातींची दुरूस्ती १५ जूनपूर्वी करण्यात यावी. तसेच स्वच्छतागृह, वीज, पाणी या सुविधा पुरविण्यासाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्यात यावी, अशा मागण्या शिष्टमंडळाने यावेळी केल्या. यावर अर्जुन गुंडे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून मार्ग काढू, असे आश्वासन दिले. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, रतनकुमार इचम, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, उपजिल्हाध्यक्ष खंडेराव मेढे, संदीप किर्वे, त्र्यंबकेश्वर तालुकाध्यक्ष नवनाथ कोठुळे आदी उपस्थित होते.

# महावितरणाचा सर्वसामान्यांना जोरदार झटका

## अचानक वीज बिलात वाढ करून अतिरिक्त सुरक्षा बिलाचा चटका

**नाशिक :** ''महावितरणाचा सर्वसामान्यांना जोरदार झटका बसला असून अचानक इंधन समायोजनाच्या नावाखाली वीज बिलात प्रति युनिट सरासरी ६० पैसे वाढ करून अतिरिक्त सुरक्षा बिलाचा चटका दिला असल्याने सदर वाढीव वीजबिल कमी करण्यात यावे व अतिरिक्त सुरक्षा ठेव बील रद्द करावे, अशी मागणी नाशिक जिल्हा ग्राहक पंचायतचे उपाध्यक्ष सुरेश पाटील यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

पाटील म्हणाले की, सर्वसामान्य वीजग्राहकांना १ एप्रिलपासून वीज दरात वाढ करण्यात आली असून प्रतियुनिट ६० पैसे जादा आकारण्यात येत असल्याने प्रत्येक ग्राहकाच्या बिलात २५ ते १०० रुपयांची वाढ होणार आहे. महावितरणच्या या निर्णयामुळे घरगुती ग्राहकांपासून व्यावसायिक आणि औद्योगिक ग्राहकांपर्यंत सर्वांनाच आर्थिक भार सहन करावा लागणार आहे. ही वाढ मार्चच्या वीज वापरावर लागू झाली असली, तरी येत्या काही महिन्यांतही त्याचा परिणाम कायम राहण्याची शक्यता आहे. वीज कनेक्शन घेताना सुरक्षा ठेव म्हणून काही रक्कम घेतली जाते. नंतर अतिरिक्त सुरक्षा ठेव कशी काय घेतली जाते. या विषयी वीज वितरण कंपनीच्या धोरणाबद्दल ग्राहकांच्या मनात संभ्रम निर्माण झाला आहे.

महावितरणने वीज दरवाढीसाठी इंधन समायोजन शुल्क (एफएसी) लागू केले आहे.वीज खरेदीच्या खर्चाची भरपाई करण्यासाठी आता ग्राहकांकडून हे शुल्क वसूल केले जात आहे. महावितरणने यासाठी ३० मार्च २०२० च्या नियामक आयोगाच्या आदेशाचा दाखला दिला आहे. या शुल्कामुळे मार्च महिन्यातील वीज वापरावर थेट परिणाम झाला असून, ग्राहकांना जास्त बिल भरावे लागत आहे. घरगुती ग्राहकांना प्रतियुनिट ६० पैसे जादा द्यावे लागतील, तर व्यावसायिक ग्राहकांना ४० ते ६० पैसे, कृषी क्षेत्राला १५ ते ३० पैसे, पथदिवे वीज योजनांना ३० ते ३५ पैसे,पाणीपुरवठा योजनांना ३० ते ३५ पैसे, ईव्ही चार्जिंग स्टेशनांना ४० पैसे आणि औद्योगिक ग्राहकांना ३५ ते ४० पैसे अतिरिक्त शुल्क आकारले आहे. यामुळे प्रत्येक ग्राहकाच्या मासिक खर्चात लक्षणीय वाढ होणार आहे. विशेषत:मध्यमवर्गीय आणि कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना हा आर्थिक ताण जाणवणार आहे. जरी ही वाढ मार्चच्या वापरासाठी लागू असली, तरी महावितरणच्या महागड्या वीज खरेदीमुळे हे शुल्क येत्या काही महिन्यांतही कायम राहण्याची शक्यता आहे. यामुळे ग्राहकांवरील आर्थिक भार वाढतच जाणार आहे. स्वस्त वीज पुरवठ्याची अपेक्षा असताना ही दरवाढ सर्वसामान्यांसाठी निराशाजनक आहे. याचा परिणाम केवळ घरगुती वापरावरच नव्हे, तर व्यवसाय, शेती आणि इतर क्षेत्रांवरही होणार आहे, ज्यामुळे महागाईचा दबाव आणखी वाढण्याची भीती आहे. महावितरण ने यासंदर्भात योग्य ती ग्राहकहिताची कार्यवाही करण्यासाठी वाढीव बिल कमी करून अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बिल रद्द करावे, अशी मागणी नाशिक जिल्हा ग्राहक पंचायतीचे उपाध्यक्ष सुरेश पाटील,सेक्रेटरी विलास देवळे, अनिल नांदोडे,कृष्णा गडकरी, सुभाष तिडके यांनी पत्रकाद्वारे केली आहे.

# जिल्ह्यात ३९६ ग्रामपंचायती क्षयरोग मुक्त

## राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरणात नाशिक अव्वल

**नाशिक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत जिल्हा पातळीवरुन विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून सन २०२३ पासून जिल्ह्यात क्षयरोग मुक्त ग्रामपंचायत उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील १३८४ पैकी ७२ ग्रामपंचायतींना सिल्व्हर, ३२४ ग्रामपंचायतींना ब्रांझ अशा एकूण ३९६ गावे क्षयरोगमुक्त घोषित केले आहेत. क्षयरोगमुक्त ग्रामपंचायतींत नाशिक अव्वल आले आहे.

नाशिक जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रामपंचायती सन २०२५ मध्ये क्षयरोगमुक्त ग्रामपंचायती म्हणून घोषित होण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे नियोजन करून क्षयरोगाचे दुरीकरण करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजेंद्र बागूल, डॉ.दीपक लोणे, डॉ. युवराज देवरे आणि जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रवींद्र चौधरी यांच्या नियोजनाखाली जिल्ह्यात क्षयरोग मुक्ततेसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

> क्षयरोग हा एक गंभीर संसर्गजन्य रोग असून, तो जीवाणूमुळे होतो. योग्य निदान, वेळेवर उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांद्वारे आपण क्षयरोगाचा समूळ नायनाट करू शकतो. योग्य माहिती, वेळीच तपासणी आणि पूर्ण उपचाराने हा आजार हद्दपार करू शकतो.
> – **डॉ. सुधाकर मोरे,** जिल्हा आरोग्य अधिकारी, नाशिक.

जिल्ह्यात २०२५ अखेर देशातून क्षयरोगाचे दुरीकरण करण्याचे ध्येय लक्षात घेऊन समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी दि. ७ डिसेंबर २०२४ ते २४ मार्च २०२५ पर्यंत जिल्ह्यात १०० दिवसीय प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान राबविण्यात आले. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या हस्ते ७ डिसेंबर २०२४ रोजी या कार्यक्रमाचे जिल्हास्तरीय उदघाटन करून संपूर्ण आरोग्य विभाग या १०० दिवसीय टीबी मुक्त भारत अभियानात काम करीत असल्याची माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रवींद्र चौधरी यांनी दिली.

नाशिक जिल्ह्यातील १५ तालुकांतर्गत असलेल्या क्षयरोग केंद्रातून ३०० थुंकी नमुने गोळा करण्याचे उद्दिष्ट आहे. जानेवारी महिन्यात ४०५ म्हणजे १११ टक्के , फेब्रुवारी महिन्यात ३१९ म्हणजे १०६ टक्के , तर मार्च महिन्यात ३२४ म्हणजे १०८ टक्के अशी थुंकी नमुने जमा करण्याचे उद्दिष्ट साध्य झाले आहे.

# निर्भय पार्टी प्रकरणात पाच जणांना अटक

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

निर्भय पार्टीचे जितेंद्र भावे व त्यांच्या सहकाऱ्यांनी पोस्ट केलेल्या व्हिडिओ आणि त्यावर करण्यात आलेल्या अश्लिल व आक्षेपार्ह कमेंट्सच्या संदर्भात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यात सायबर पोलिसांनी यापूर्वी तीन संशयित आरोपींविरोधात गुन्हा दाखल करुन त्यांना अटक केली होती. त्यानंतर याच प्रकरणात हव्या असलेल्या दोन संशयीताविरोधात कारवाई करुन त्यांना अटक करण्यात आली. यापूर्वी या प्रकरणी हेमंत बाळासाहेब दुसाने (वय ४६ रा. पीर बाबा चौक, सिडको, नाशिक),राजेंद्र खरोटे (वय ४८, रा. बालाजी हाइट्स, कोणार्क नगर, नाशिक) आणि जगदीश दिगंबर भापकर (वय ४८ व्यवसाय - चालक, रा. वाल्मीक नगर, पंचवटी) या तिघांनाही पोलिसांनी अटक केली. त्यापाठोपाठ रविवारी प्रसाद निवृत्ती घोटेकर (रा. खेडलेझुंगे) आणि रवी अशोक शेळके (वय ३७) रा. काळकोरे, ता. चांदवड) या दोघांना अटक केली. या दोघांना कोर्टात हजर करण्यात आले असता २३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. व्हिडिओ व्हायरल करणारे आणि अश्लील, आक्षेपार्ह टिप्पणी करणारे इतर आरोपी सध्या पोलिसांच्या शोधात आहेत. सोशल मीडियावर गैरवर्तन करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

## महत्त्वाचे



### खा. भास्कर भगरेंचा येवला शहरात सेनापती तात्या टोपेंना अभिवादन

**येवला :** खासदार भास्कर भगरे यांनी येवला शहरातील विविध ठिकाणी दौरा करून थोर स्वातंत्र्य सेनानी तात्यासाहेब टोपे यांची पुण्यतिथी निमित्ताने त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल. याप्रसंगी माजी आमदार नरेंद्र दराडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पक्षाचे युवा नेते शाहू शिंदे, शहराध्यक्ष योगेश सोनवणे, तसेच पदाधिकारी उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते ॲड.माणिकराव शिंदे यांच्या पत्नी सौ .उषाताई शिंदे यांची नाशिक जिल्हा सहकारी बोर्ड येथे बिनविरोध निवड झाली याबद्दल त्यांच्या निवासस्थानी भेट घेत सौ. उषाताई शिंदे यांचा खासदार भगरे यांनी सत्कार केला. येवला रेल्वे स्थानकाला त्यांनी भेट देत तेथे उपस्थित प्रवाशांशी चर्चा केली. येवला उपजिल्हा रुग्णालय येथे भेट देऊन तेथे उपचार घेत असलेल्या रुग्णांची चर्चा केली. त्यानंतर कोर्ट रोड येथे सुरू असलेल्या सेनापती तात्या टोपे यांच्या स्मारकाची पाहणी केली. सात वर्षापासून या स्मारकाचे काम सुरू आहे. कामाची पाहणी केल्यावर त्यांनी नाराजी व्यक्त केली. लवकरच या कामासंदर्भात केंद्रातील मंत्री तसेच संबंधित अधिकाऱ्यांची चर्चा करून या प्रोजेक्टला पूर्णत्वास नेण्यासाठी सर्वांगीण प्रयत्न करेल असे आश्वासन भगरे दिले. दौऱ्याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे युवकचे प्रदेश उपाध्यक्ष शाहू शिंदे, शहराध्यक्ष योगेश सोनवणे, वाल्मीक सोपे, पंकज माळी, अन्सार शेख, निसार शेख, राणी शिंदे, नानासाहेब शिंदे, प्रीतम पटणी, बाळासाहेब मांजरे उपस्थित होते.

### वाकद येथे आजपासून यात्रोत्सव

**लासलगाव :** निफाड तालुक्यातील वाकद (शिरवाडे) येथील कालिकामाता यात्रोत्सवास मंगळवारपासून (दि. २२ एप्रिल) सुरुवात होत आहे. यानिमित्त मंदिरावर आकर्षक रोषणाई करण्यात आली असून परिसराची साफसफाई करण्यात आली आहे. यानिमित्त पहाटे चासनळी (ता. कोपरगाव) येथून कावड यात्रा निघणार आहे. सकाळी सात वाजता वाकद गावातून कावड व देवी मातेच्या दागिन्यांची मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर सोनाली गायकवाड व बाबासाहेब गायकवाड यांच्या हस्ते अभिषेक पूजा होणार आहे. बुधवारी (दि. २३ एप्रिल) सायंकाळी ५ वाजता कुस्त्यांची दंगल होणार आहे. गुरुवारी रात्री ९ वाजता भीमा नामा लोकनाट्य तमाशा मंडळाचे सादरीकरण होणार आहे. यात्रेसाठी खेळणी, राहट पाळणे, प्रसाद फुले यांची दुकानेही मोठ्या प्रमाणात येणार आहे. यात्रा यशस्वी होण्यासाठी राहुल राहुल बडवर, अरुण बडवर, रामेश्वर वाघचौरे, गणेश गायकवाड, दिगंबर गायकवाड, प्रमोद बडवर, मधुकर बडवर, रवी गायकवाड, आनंदा वाकचौरे, ज्ञानेश्वर बडवर, बाबुराव आनप परिश्रम घेत आहे.

### आरोग्य विभागातील उमेदवारांना नियुक्ती नाही

**नाशिक :** नाशिक जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागातील आरोग्य सेवकांच्या ५० टक्के पदभरतीचा प्रश्न अनेक महिन्यांपासून रखडलेला आहे. विशेष म्हणजे १२ मार्च रोजी ग्रामविकास विभागाने ''तात्काळ नियुक्ती'' देण्यास सांगितले असताना ही अद्याप उमेदवारांना नियुक्ती नाही. उमेदवारांची कागदपत्र तपासणी प्रक्रिया २० मार्च रोजी पूर्ण होऊनही प्रशासनाकडून उमेदवारांना भ्रामक आश्वासने दिली जात आहेत. महिन्यापासून उमेदवारांना फक्त आश्वासने दिली जात आहेत. त्यामुळे उमेदवार प्रचंड मानसिक तणावात आहेत. काही दिवसांआधी एका उमेदवाराने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला. याबाबत काही कार्यवाही झाली नाहीतर उमेदवारांनी जिल्हा परिषद आवारातच उपोषणासाचा इशारा दिला आहे.जिल्ह्यातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी आरोग्य सेवकांची पदे भरणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक पदे रिक्त असल्याने आरोग्य विभागात मनुष्यबळाची कमतरता जाणवत आहे. त्यातच आरोग्य सेवक ५० टक्के पदभरतीची प्रक्रिया रखडल्याने तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे.

### डॉ. हेडगेवार पतसंस्थेच्या चेअरमनपदी पिचा

**घोटी :** इगतपुरी तालुक्यातील अर्थवाहिनी असलेल्या तसेच शंभर कोटी ठेवीचा ऐतिहासिक टप्पा गाठणाऱ्या घोटी येथील डॉ हेडगेवार पतसंस्थेच्या चेअरमनपदी सुनील पिचा यांची तर व्हाईस चेअरमनपदी सुरेश दुर्गुडे यांची निवड करण्यात आली. मावळते चेअरमन गोरख वालझाडे व व्हाईस चेअरमन विद्या शहाणे यांनी आवर्तन पद्धतीने पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या या पदांसाठी आज संचालक मंडळाच्या बैठकीत ही निवड झाली. डॉक्टर हेडगेवार पतसंस्थेच्या चेअरमन व व्हाईस चेअरमन पदासाठी आज निवडणूक घेण्यासाठी आलेल्या नवनिर्वाचित संचालक मंडळाच्या बैठकीस अध्यासी अधिकारी म्हणून इगतपुरीच्या सहायक उपनिबंधक अर्चना सौंदाने या होत्या. यावेळी चेअरमन पदासाठी सुनील सुखलाल पीचा यांचा तर व्हाईस चेअरमन पदासाठी सुरेश शंकर दुर्गुडे यांचा प्रत्येकी एकमेव अर्ज दाखल झाल्याने ही निवड बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आले. यावेळी हेमंत सुराणा गोरख वालझाडे, विद्या शहाने, मोहन बबेरवाल, दिलीप भन्साळी, किरण फलटणकर,राजेंद्र भंडारी,संपत म्हसने,योगेश हाके,बन्सीलाल अंदोरे, मंजिरी जाधव, व्यवस्थापक रितेश काजळे व कर्मचारी होते. यावेळी सुरेश पिचा, मधुकर जाधव, नंदकुमार वालझाडे, मोहन भगत, सुनील नहाटा, संदीप शहाणे आदींनी निवडीचे स्वागत केले.

### दिक्षी येथे युवकाची आत्महत्या


**दिक्षी :** निफाड तालुक्यातील दिक्षी येथे २३ वर्षीय युवकाने दिनांक



२१ रोजी पहाटे घराचे अँगलला स्कार्प बांधुन आत्महत्या केल्याची घटना घडली. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की आज सोमवार दिनांक २१ एप्रिल रोजी पहाटे चारचा सुमारास मयत युवक नामे राहूल विश्वनाथ चारोस्कर (२३) राहणार इंदिरानगर दिक्षी ता निफाड याने त्याच्या चालू असलेल्या घराच्या कामाच्या ठिकाणी घराच्या छताला असलेल्या अँगलला स्कार्प बांधुन स्कार्पच्या साह्याने गळफास घेऊन आत्महत्या केली आत्महत्येचे कारण समजले नाही याबाबत पोलीस पाटील विजय तुकाराम गहिले मारूती मंदिराजवळ यांनी पोलीस ठाण्यात खबर दिल्यावरून पोलीसांनी आकस्मित मृत्युची नोंद केली आहे.

## निधन वार्ता

### जिजाबाई पोटे



**लासलगाव :** रुई ता.निफाड येथील जिजाबाई तुकाराम पोटे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात पती, तीन मुली, एक मुलगा सुन, नातवंड असा परिवार आहे. त्या म्हाडाचे माजी संचालक बाबासाहेब पोटे यांच्या मातोश्री होत.



### सनी ग्रोव्हर

**नाशिक :** येथील सनी दीपक ग्रोव्हर (वय ४२) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात वडील, २ भाऊ, पत्नी व २ मुली आहेत.

# येवल्यात पाणीटंचाईचा आढावा

## योग्य नियोजन करण्याच्या भुजबळांच्या सुचना

**येवला : प्रतिनिधी**

येवला शहर व तालुक्यातील कुणीही पिण्याच्या पाण्यापासून वंचित राहणार नाही तसेच आगामी पिण्याच्या पाण्याचे आवर्तन मिळेपर्यंत उपलब्ध पाण्याचे सुयोग्य नियोजन करावे अशा सूचना माजी मंत्री आमदार छगन भुजबळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या .



**येवला : येथील संपर्क कार्यालयात माजी मंत्री आमदार छगन भुजबळ यांनी पाणी टंचाई संदर्भात आढावा बैठक घेवुन मार्गदर्शन केले. यावेळी अधिकारी तसेच पदाधिकारी उपस्थित होते.**

**(छाया : विलास पगारे)**

येवला शहर व तालुक्यातील पाणी टंचाईच्या पार्श्वभूमीवर आज येवला संपर्क कार्यालयात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती सदर बैठकीला प्रांतअधिकारी बाबासाहेब गाढवे, येवला नगरपालिकेचे मुख्याधिकारी तुषार आहेर, नायब तहसीलदार पंकज मगर, गटविकास अधिकारी संदीप वायाळ, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राधाकिसन सोनवणे, वसंत पवार, माजी नगराध्यक्ष हुसेनभाई शेख, मोहन शेलार, माजी नगरसेवक दत्ता निकम, दीपक लोणारी, मकरंद सोनवणे, अमजद शेख, मुस्ताक शेख, मलिक मेंबर, सुनील पैठणकर, भाऊसाहेब धनवटे, आदीसह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी आमदार मार्गदर्शन करताना छगन भुजबळ म्हणाले की, सध्या ज्या गावांना पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू आहे त्यासोबतच नवीन मागणी असलेल्या गावांची तातडीने पाहणी करून या ठिकाणी देखील पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरू करण्यात यावे. येवला नगरपालिका क्षेत्रात पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्यात याव्यात. साठवण तलावाच्या परिसरातून अवैध उपसा होता कामा नये यासाठी परिसरातील विहिरी अधिग्रहित करण्यात याव्यात त्याचबरोबर या परिसरात अवैध स्वरूपात उपसा होणाऱ्या विहिरींचे विजेचे कनेक्शन तात्काळ बंद करण्यात यावे. पुढील पिण्याच्या पाण्याचे आवर्तन २० मे च्या दरम्यान नियोजित असल्याने त्या अगोदर उपलब्ध असलेल्या पाण्याचे योग्य नियोजन करण्यात येऊन पिण्याच्या पाण्यापासून कोणीही वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच टंचाईच्या पार्श्वभूमीवर बांधकामांना काही काळासाठी स्थगिती देण्यात यावी. तसेच येवला शहराचा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी येसगाव योजना अतिशय महत्वाची असून ही योजना मार्गी लागण्यासाठी पाठपुरावा करावा अशा सूचना आमदार छगन भुजबळ यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या आहेत.



**अभोणा : धोंडेगाव (नाशिक) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकडून माहिती घेतांना लीना बनसोड व अधिकारी.**

(छाया : पद्मभूषण शहा)

### धोंडेगाव आश्रमशाळेत आयबीटी रूमचे बनसोडांच्या हस्ते उद्घाटन

**अभोणा : प्रतिनिधी**

रचना ट्रस्ट संचलित अनुदानित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा धोंडेगाव ( नाशिक ) आश्रमशाळेत आदिवासी विकास विभागातर्फे आयुक्त लीना बनसोड (भाप्रसे ) यांच्या हस्ते आयबीटी रुमचे उदघाटन करण्यात आले.

तेव्हा विद्यार्थी प्रेझेंटेशन, आयबीटी, थ्रीडी प्रिंटर, इलेक्ट्रॉनिक, ऊर्जा, पर्यावरण, अभियांत्रिकी, शेती, पशुपालन, गृह व आरोग्य याविषयी आयुक्त बनसोड यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारुन माहिती घेतली. दोन तास विद्यार्थ्यांशी हितगुज साधत मार्गदर्शन केले.

येथील एकूण कामकाज व प्रगतीबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. त्याप्रसंगी आदिवासी विभागाचे शिक्षण विस्तार अधिकारी, संस्थेचे सेक्रेटरी आर्चिस नेर्लिकर, ट्रस्टी निरंजन ओक, समन्वयक डॉ. हेमंत कोतवाल, शाळेचे निरीक्षक वसंत एकबोटे, संस्थेचे सीइओ नरेंद्र बर्वे आदी उपस्थित होते. सूत्रसंचलन मिलिंद चोथे यांनी तर प्रस्ताविक वसंत एकबोटे यांनी केले. सुनिल जाधव यांनी आभार मानले.

# महामार्ग सहापदरीकरणाचे काम संथगतीने

## अपघातात वाढ; माजी सरपंच धांडे यांचा आरोप

**मुकणे : प्रतिनिधी**

नाशिक-मुंबई महामार्गावर गोंदे ते पिंप्री सदो या महामार्गाचे सहापदरीकरण काम सुरू होऊन काही महिने लोटले असले तरी गोंदे ते पुढे माणिकखांब दरम्यानचे काम अगदी संथ गतीने होत असल्याने अपघातांच्या संख्येमध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. दीड-दोन महिन्यांवर पावसाळा येऊन ठेपला आहे. त्यातच सदर कामाचा वेग मंदावला असल्याने अपघात रोखणे अवघड होणार आहे.

समृद्धी महामार्गाला जाण्यासाठी नाशिक मुंबई महामार्गावरील गोंदे ते पिंप्री सदो दरम्यानच्या रस्त्याच्या सहापदरीकरणाच्या कामाला सुरुवात झाली. मात्र कामाच्या सुरवातीलाच गोंदे औद्योगिक वसाहतीदरम्यान गोंदे फाट्यावरील फ्लायओव्हरमधील रस्ता क्रॉस करण्यासाठी रुंदी वाढवावी यासाठी गोंदेकरांनी कामबंद केले. खासदार राजाभाऊ वाजे, आमदार हिरामण खोसकर व ॲड. संदीप गुळवेंच्या मध्यस्थीने महामार्ग प्राधिकरणाने मागणी मान्य केली. मात्र सद्यस्थितीत हे



काम बंदच असल्याने औद्योगिक वसाहतीमधील व महामार्गावरील इतर वाहनधारकांबरोबरच स्थानिकांनाही येथे कामाच्या पसाऱ्यामुळे वाहने चालवताना कसरत करावी लागत आहे. काम करणारी यंत्रणा मात्र यावर कुठलीही कार्यवाही करतांना दिसत नाही.

गोंदेऔद्योगिक वसाहतीपासून पुढे पाडळी फाट्यापर्यंत व त्यापुढेही रस्ता दुतर्फा खोदून ठेवल्याने अपघातांच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. पाडळी फाट्यावरील भुयारी मार्गाच्या दोन्ही बाजूने व सर्विस रोडवरही मोठ्या प्रमाणात खोदाई केली असल्याने येथे जाणीवपूर्वक महामार्ग प्राधिकरण काम करण्यास विलंब करीत असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांमधून होत आहे.

महामार्गाचे काम करणाऱ्या यंत्रणेने महामार्गालगत जवळच कळसुबाई रोडजवळच कामासाठी कंपनी उभारली असून येथे खडी, डबर, डांबर प्लांट व क्रेशरसाठी यंत्रणा तयार केली आहे. तरीही पाडळी फाट्यावरील कामास दिरंगाई होत असल्याने नागरिक व वाहनधारकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. दरम्यान कंपनीने येथे खडी क्रेशरसाठी यंत्रणा उभारली आहे. मात्र या कंपनीलगतच पाडळी देशमुख, शेणवड खुर्द, मुंढेगाव व मुकणे या गावांचे गायरान असून जर खडीक्रेशर उभारले तर या तीनही गावच्या गायकुरणातील चाऱ्यावर त्याची धुळ उडून चाऱ्याचा प्रश्न उदभवणार आहे. क्रेशरसाठी संबंधीत गावांचा ग्रामसभांचा ठराव घेतला का..? असा प्रश्न पाडळी देशमुखचे माजी सरपंच तथा इगतपुरी तालुका खरेदी-विक्री संघाचे माजी उपाध्यक्ष जयराम धांडे यांनी केला आहे. गेल्या ७-८ महिन्यांपासून इगतपुरी तालुक्यातील जवळपास सगळ्याच ग्रामपंचायतींची मुदत संपल्यापासून येथे प्रशासकीय अधिकारी नेमल्याने ग्रामसभेच्या ठरावाचा प्रश्न उदभवला आहे.

संबंधीत ग्रामपंचायतीच्या ठरावाबाबत इगतपुरी पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांनी याबाबत शहानिशा करून योग्य ती कार्यवाही करण्याची गरज आहे. यावर योग्य ती कार्यवाही न झाल्यास याबाबत विभागीय आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन पुढचे पाऊल उचलले जाईल, अशा इशारा धांडे यांनी दिला आहे.

### चांदवड तालुक्यातील ९० सरपंचपदाचे आरक्षण जाहीर

**चांदवड : वार्ताहर**

आगामी पाच वर्षांसाठी चांदवड तालुक्यातील ९० ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण सोमवारी (दि. २१) येथील नवीन मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात तहसीलदार मंदार कुलकर्णी यांच्या हस्ते जाहीर करण्यात आले.

या आरक्षण सोडतीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्गासाठी ग्रामपंचायतनिहाय सरपंचपदे आरक्षित करण्यात आली. तहसीलदार मंदार कुलकर्णी यांनी दिलेल्या माहितीनुसार, आरक्षण निश्चित करण्यात आले आहे: अनुसूचित जाती: सोग्रस, सुतारखेडे, भडाणे, देवरगाव, दहयाणे आणि धोडबे.

अनुसूचित जमाती: शिंगवे, तळवाडे, भोयेगाव, सोनीसांगवी, हिरापूर, दिघवद, वाहेगांवसाळ, डोगरगांव, उसवाड, चिंचोले, कातरवाडी आणि दहिवद.

नागरिकांचा मागास प्रवर्ग: मंगरुळ, भुत्याणे, कानडगांव, कुंदलगांव, राजदेरवाडी, वाघदडी, खेलदरी, निमगव्हाण, कोकणखेडे, बहादुरी, गोहरण, नांदुरटेक, मेसनखेडे खु., पाथरशेबे, आडगाव, तळेगांवरोही, दुगाव, राहुड, वाद, साळसाणे, भयाळे, निबाळे, खडकजांब आणि वडाळीभोई.

सर्वसाधारण: कानमंडाळे, डोणगांव, न्हनावे, परसुल, बोराळे, शिंदे, शेलु, कळमदरे, चिखलांबे, तिसगांव, दुधखेडे, धोडगव्हाण, निमोण, भाटगाव, रायपुर, वडबारे, वाकी खु., शिवरे, हट्टी, पारेगांव, वडगांवपंगु, शिरुर, खडकओझर, रेडगांव, पन्हाळे, पाटे, मालसाणे, विटावे, हरणुल, हिवरखेडे, नारायणगाव, शिरसाणे, आसरखेडे, काळखोडे, पुरी, गंगावे, वाकी बु., वडनेरभैरव, जोपुळ, पिंपळणारे, दहेगांव म., ऊधुळ, गणुर, अहिरखेडे, काजीसांगवी, बोपाणे, दरेगांव आणि पिंपळद. याव्यतिरिक्त, महिलांसाठी स्वतंत्र सरपंचपदाचे आरक्षण गुरुवारी (दि. २४) दुपारी १२ वाजता उपविभागीय अधिकारी कैलास कडलग यांच्या अध्यक्षतेखाली मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीत काढले जाणार आहे. या आरक्षणामुळे निवडणुकीचे महत्त्व वाढले असून, गावाच्या विकासासाठी योग्य नेतृत्व निवडण्याची संधी मतदारांना मिळणार आहे.

### पारेगाव फाट्यावर सबमर्सिबल मोटार रिवाइंडिंग दुकानावर डल्ला

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील वणी-धोडंबे रस्त्यावरील पारेगाव फाटा येथे असलेल्या सप्तशृंगी सबमर्सिबल या मोटार रिवाइंडिंगच्या दुकानात अज्ञात चोरट्यांनी चोरी केली.

चोरट्यांनी दुकानाचे मागील बाजूचे पत्रे उचकटून आत प्रवेश करत तब्बल २ लाख ८८ हजार ५९९ रुपयांचे सबमर्सिबल साहित्य लंपास केले. याप्रकरणी वडनेरभैरव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुकानमालक शरद विनायक शिंदे (रा. बोराळे, ता. चांदवड) यांनी यासंदर्भात वडनेरभैरव पोलिसात तक्रार दाखल केली आहे. अज्ञात चोरट्यांनी शुक्रवार, १८ एप्रिल रोजी रात्रीच्या सुमारास त्यांच्या दुकानात प्रवेश करून १ लाख २८ हजार ५९९ रुपये किमतीची १२८ किलो वजनाची तांब्याची सबमर्सिबल वायर, ८० हजार रुपये किमतीचे ८० किलो वजनाचे पितळी बुश, ८० हजार रुपये किमतीचे तांब्याचे सबमर्सिबल साहित्य आणि १०० किलो तांब्याची वायर असा एकूण २ लाख ८८ हजार ५९९ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. वडनेरभैरव पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुद्ध चोरीचा गुन्हा नोंदवला असून, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनकर मुंडे या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# सोळा तास अभ्यास करून डॉ. आंबेडकरांना अभिवादन

**येवला : प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्ताने तसेच संविधान अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून येवला येथील अनुभव शिक्षण प्रशिक्षण सामाजिक संशोधन बहुउद्देशीय संस्था तथा सलग अठरा तास अध्ययन अभिवादन उपक्रम समिती येवला यांच्या वतीने सलग सोळा तास अभ्यास करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.



शहरातील विपश्यना हॉल येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हिरामण मेश्राम हे हा उपक्रम राबवितात. दहा वर्षांपासून हा उपक्रम संस्थेचे संयोजक हिरामण मेश्राम, नितीन संसारे, प्रविण खंडागळे, विनोद त्रिभुवन, संस्थेच्या अध्यक्षा लिना मेश्राम आदी राबवतात.

या उपक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थी विद्यार्थिनी व वाचक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. समारोप कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी विकास वाहुळ होते. या उपक्रमाचे कौतुक सर्वच मान्यवरांनी व्यक्त करीत असे उपक्रम मोठ्या संख्येने राबवीण्याची गरज विषद केली. कालकथित मुकेश निकम यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ धर्मांतर घोषणा वर्धापनदिनानिमित्त दरवर्षी १३ ऑक्टोंबर रोजी मोफत चहापान वाटपाचे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना संस्थेच्या वतीने मानपत्र देऊन गौरविण्यात आले. राजरत्न वाहुळ यांनी मानपत्राचे वाचन केले. मानपत्र वितरण येत्या बौद्ध पौर्णिमेला प्रत्यक्ष वितरीत करण्यात येणार आहे. सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. आयोजन हिरामन मेश्राम, माजी आदिवासी संशोधन अधिकारी शांताराम महाले, विक्रांत कुकडे, कॉ. भगवान चित्ते, शरद शेजवळ, दिपक लाठे, शरद शेजवळ, आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्तविक हिरामण मेश्राम यांनी, सुत्रसंचलन नितीन संसारे यांनी केले तर आभार विनोद त्रिभुवन यांनी मानले. यावेळी बाबुलाल पडवळ, विमलताई पडवळ, सचिन संसारे, अशोक पगारे, रुपाली खंडागळे, पृथ्वी खंडागळे, सिध्दांत संसारे, ऋषिकेश वाघ, आदींसह मोठ्या संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी, पदाधिकारी उपस्थित होते.

# निफाड तालुक्यातील ११७ सरंपचपदाचे आरक्षण निश्चित

## ११७ पैकी अगोदर ३२ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाचे आरक्षण जाहीर असून ते कायम आहे

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

निफाड तालुक्यातील ५ मार्च २०२५ ते ४ मार्च २०३० या कालावधीत मुदत संपणाऱ्या सर्व ११७ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यासाठी तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.२१) दुपारी मध्यवर्ती प्रशासकीय इमारत येथे बैठक झाली.

५ मार्च २०२० ते ४ मार्च २०२५ या कालावधीतीतील मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीकरिता सरपंच आरक्षण काढण्यात आले. तालुक्यातील ३२ ग्रामपंचायतीच्या निवडणुका या आरक्षणानुसार झालेल्या नाहीत. त्यामुळे ते आरक्षण कायम ठेऊन उर्वरित ग्रामपंचायतीचे आरक्षण काढण्यात आले. महिलांसाठीचे सरपंच आरक्षण सोडत बुधवारी (दि.२३) दुपारी काढण्यात येणार आहे.

या पुर्वीच्या ३२ ग्रामपंचायतीच्य आरक्षण सोडत कायम ठेवण्यात आली आहे ती गावे खालील प्रमाणे : डोंगरगाव : अनु. जमाती, चितेगाव : अनु.जमाती, पोचोरे बु. -शिवापूर : अनु. जमाती, कानळद : अनु. जमाती स्त्री. कुंभारी : अनु. जमाती स्त्री, पंचकेश्वर : अनु. जमाती स्त्री, पाचोरे खु.: अनु. जमाती स्त्री, देवपूर : ना.मा.प्र., शिवरे : ना.मा.प्र., मौजे सुकेणे : ना.मा.प्र., श्रीरामनगर : ना.मा.प्र., कुंदेवाडी : ना.मा.प्र., सारोळेथडी : ना.मा.प्र. स्त्री, तामसवाडी, वऱ्हेदारणा : सर्वसाधारण, लालपाडी/चेहडी खु. : सर्वसाधारण, मरळगोई बु/गोळेगाव सर्वसाधारण, धारणगाव खडक : सर्वसाधारण, तळवाडे : सर्वसाधारण, जिव्हाळे : सर्वसाधारण, पाचोरेवणी-सर्वसाधारण, मरळगोई खु. : सर्वसाधारण, विष्णूनगर : सर्वसाधारण, शिंपीटाकळी, नारायणटेंभी, सारोळे खुर्द, वेळापूर, कुरुडगाव, हनुमान नगर, थेरगाव, गोरठाण, दडोरी तास : सर्वसाधारण स्त्री.

अनुसुचित जातीसाठी राखीव : कसबे सुकेने, नांदगाव, दिक्षी, ओणे, रुई (धानोरे), खडक माळेगाव (खानगाव नजीक), वावी, पिंप्री.

अनुसुचित जमातीसाठी राखीव : गोंदेगाव, देवगाव (महादेव नगर), नैताळे (रामपूर), दावचवाडी, खेडे, भेंडाळी, विंचूर (विठ्ठलवाडी), धारणगाव वीर

नागरीकांचा मागास प्रवर्ग : रानवड, भुसे, अंतरवेली, नारायणगाव, नांदूर खुर्द, दात्याने, खानगाव थडी, चापडगाव, साकोरे, गोंडेगाव, कोकणगाव, शिरवाडे वणी, थेटाळे, आहेरगाव, चाटोरी, खेडलेझुंगे, वनसगाव, बोकडदरे, चांदोरी (नागपूर), शिंगवे, पिंपळस, भरवस (मानोरी), सुभाषनगर, लोणवाडी (चिठ्ठीद्वारे )

सर्वसाधारण जागेसाठी सरपंच पदासाठी निश्चित करण्यात आलेली गावे : नांदूरमधमेश्वर, कोठुरे, ब्राह्मणगाव वनस, वडाळी नजीक, सोनेवाडी खुर्द, मांजरगाव, सोनेवाडी बुद्रुक, जळगाव, वाकद, सुंदरपुर, उंबरखेड, सावरगाव, निमगाव वाकडा, पालखेड, काथरगाव, कारसुळ, रेडगाव बुद्रुक, करंजगाव, तारूखेडले, कोळगाव, नांदुर्डी, शिवडी, औरंगपूर/ श्रीरामपूर, ब्राह्मणगाव विंचूर, सोनगाव, टाकळी विंचूर, रसलपुर, बेहेड, मुखेड, शिरवाडे वाकद, शिरसगाव, सायखेडा, रौळस, पिंपळगाव निपाणी, उगाव, दारणा सांगवी, गाजरवाडी) वाहेगाव/ दहेगाव, पिंपळगाव नजीक, महाजनपुर, म्हाळसाकोरे, लासलगाव, रामनगर, करंजी खुर्द /ब्राह्मणवाडी, कोटमगाव.

# सिन्नरला ११४ ग्रा.पं.च्या सरपंचपदाची आरक्षण सोडत जाहीर

## ८ ग्रामपंचायती अनुसूचित जाती, १५ अनुसूचित जमाती, ३१ नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव; ६० सरपंचपद खुले

**सिन्नर : प्रतिनिधी**

**तालुक्यात होऊ घातलेल्या ११४ ग्रामपंचायतीच्या निवडणुकांसाठी सरपंचपदाच्या आरक्षणाची सोडत येथील अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात काढण्यात आली. तहसीलदार सुरेंद्र देशमुख, नायब तहसीलदार सागर मुंदडा, अव्वल कारकुल गोरक्षनाथ पवार यांच्या उपस्थितीत सरपंचपदाचे आरक्षण सोडत काढण्यात आले. त्यात ८ ग्रामपंचायती अनुसूचित जाती, १५ अनुसूचित जमाती, ३१ नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी राखीव झाल्या तर ६० सरपंचपद खुले राहणार आहे. येत्या गुरुवारी(दि. २४) रोजी महिला आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. त्यानंतर सरपंचपदाचे खरे चित्र स्पष्ट होईल.**

सिन्नर तालुक्यात ११४ ग्रामपंचायत असून २०२५ ते २०३० या कालावधीत निवडणुका होणार्या ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण काढण्यासाठी नगरपरिषदेच्या नाट्यगृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. २०११ च्या जनगणनेनुसार त्याचप्रमाणे १९९५ ते २०२५ या गत सहा पंचवार्षिक निवडणुकांमध्ये असलेले आरक्षण विचारात घेऊन ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार आरक्षणाची सोडत जाहीर करण्यात आली. प्रारंभ गेल्या सहा पंचवार्षिक निवडणुकांमध्ये अनुसूचित जातींचे आरक्षण असलेल्या ३९ ग्रामपंचायती वगळून उर्वरित एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या टक्केवारीनुसार उतरत्या क्रमाने ८ ग्रामपंचायती अनुसूचित जातीसाठी राखीव करण्यात आल्या. त्यात मनेगाव, कहांडळवाडी, मानोरी, उजनी, आडवाडी, पंचाळे, सांगवी, डुबेरे या अनुसूचित जातीसाठी राखीव झाल्या.

त्यानंतर अनुसूचित जमातीसाठी यापूर्वी आरक्षीत असलेल्या ६८ ग्रामपंचायती वगळून लोकसंख्येच्या प्रमाणात १५ ग्रामपंचायतीचे आरक्षण काढण्यात आले. नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी ३१ ग्रामपंचायतींचे आरक्षण काढण्यात येणार होते. पैकी यापूर्वी ना.मा. प्र. साठी आरक्षीत नसलेल्या २८ ग्रामपंचायतींना थेट आरक्षण देण्यात आले तर उर्वरित धुळवाड, वडांगळी, कुंदेवाडी व भाटवाडी या चार ग्रामपंचायतींपैकी तीन ग्रामपंचायतींचे चिठ्ठी पध्दतीने ना. मा. प्र. ची चिठ्ठी काढण्यात आली. हर्षिता राहुल जाधव या चिमुरडीने चिठ्ठी काढली. त्यात धुळवाड, वडांगळी व भाटवाडी या ग्रामपंचायींची नावे निघाल्याने या ना. मा. प्र. साठी आरक्षीत करण्यात आल्या. उर्वरित ६० ग्रामपंचायती सर्वसाधारणसाठी खुल्या राहिल्या.



सिन्नर तालुक्यातील सरपंच आरक्षण सोडत प्रसंगी तहसीलदार सुरेंद्र देशमुख, नायब तहसीलदार सागर मुंदडा.

### गुरुवारी जाहीर होणार महिला आरक्षण सोडत

गुरुवारी(दि. २४) रोजी दुपारी १२ वाजता अण्णाभाऊ साठे सभागृहात उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महिला आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. एकूण ग्रामपंचायतींच्या ५० टक्के जागा या महिलांसाठी आरक्षीत असणार आहे. त्यामुळे या सोडतीनंतर महिला सरपंचपदासाठी कोणत्या ग्रामपंचायती आरक्षीत होतात याकडे सर्वांच्या नजरा असणार आहे. महिला सोडतीनंतरच सरपंचपदाचे खरे चित्र स्पष्ट होईल.

### सरपंच आरक्षण पुढीलप्रमाणे

**अनुसूचित जाती-** मनेगाव, कहांडळवाडी, मानोरी, उजनी, आडवाडी, पंचाळे, सांगवी, डुबेर.

**अनुसूचित जमाती-** खोपडी बुद्रूक, पाथरे बुद्रूक, पाडळी, धारणगाव, डुबेरेवाडी(कृष्णनगर), दोडी बुद्रूक, दातली, खंबाळे, भरतपूर, कारवाडी, खडांगळी, पांगरी खुर्द, शहा, देवपूर, दत्तनगर

**नागरिकांचा मागास प्रवर्ग-** औंढेवाडी, जामगाव, धोंडबार, हिवरे, गुळवंच, निमगाव-सिन्नर, हिवरगाव, पाथरे खुर्द, रामपूर, शिवाजीनगर, दापूर, टेंभूरवाडी (आशापूर), धोंडवीरनगर, ठाणगाव, जोगलटेंभी, पांगरी बुद्रूक, फुलेनगर, बेलू, पांढुर्ली, आगासखिंड, सावतामाळीनगर, के. पा. नगर, चोंढी, सायाळे, मलढोण, कोळगावमाळ, सोनांबे, चंद्रपूर, धुळवड, वडांगळी, भाटवाडी

**सर्वसाधारण(खुले)-** कुंदेवाडी, आटकवडे, कणकोरी, कासारवाडी, कीर्तांगळी, कोनांबे, कोमलवाडी, गोंदे, घोटेवाडी, घोरवड, चापडगाव, चास, चिंचोली, जायगाव, दहीवाडी, दुशिंगपूर, देशवंडी, दोडी खुर्द, नळवाडी, नांदूरशिंगोटे, नायगाव, निमगाव-देवपूर, निहाळे, पाटपिंप्री, पाटोळे, पास्ते, पिंपळगाव, पिंपळे, फर्दापूर, बारागावपिंप्री, बोरखिंड, ब्राम्हणवाडे, भोकणी, महळ खुर्द, महळ बुद्रूक, माळेगाव, मिठसागरे, मिरगाव, मुसळगाव, मेंढी, मोह, यशवंतनगर (पिंपरवाडी), रामनगर(रामोशीवाडी), वडगाव-पिंगळा, वडगाव-सिन्नर, वडझीरे, वारेगाव, वावी, विंचूरदळवी, शास्त्रीनगर, शिवडे, श्रीरामपूर, सरदवाडी, सुरेगाव, सुळेवाडी (सुंदरपूर), सोनगिरी, सोनारी, सोनेवाडी, सोमठाणे, हरसुले.

## महत्त्वाचे



### सिन्नरला आज साती आसरा देवीची यात्रा

**सिन्नर :** शहरातील आडवा फाटा परिसरात कडवा कॉलनीजवळ असलेल्या श्री साती आसरा देवीचा यात्रोत्सव आज (दि.२२) होत असून, यात्रोत्सवानिमित्त विविध धार्मिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंदिरास रंगरंगोटी करुन विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. सकाळी ७ ते ९ वा. अभिषेक व देवीची महापूजा, ९ ते १ यावेळीत देवीच्या रथाची भव्य मिरवणूक काढण्यात येईल. दु. १ ते ५ यावेळेत श्री सत्यनारायण पूजन व त्यानंतर सायं. ५ ते १० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच रात्री ८ ते ११ देवीच्या गाण्यांचा कार्यक्रम तसेच चित्रपट दाखविण्यात येईल. भाविकांनी यात्रोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन साती आसरा देवी मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

### धादवड हॉस्पिटलमधून ८० हजारांची चोरी

**सिन्नर :** येथील खडकपुरा भागातील अंजली विष्णू हॉस्पीटमधील डॉक्टरांच्या केबीनमधील ड्रावरमधून ८० हजार रुपयांची रक्कम चोरीस गेली आहे. संचालक डॉ. विष्णू धादवड यांनी पोलिसांत तक्रार दिली आहे. संशयित नीलेश संजय हजारे (रा. श्रीरामपूर) याच्यावर चोरीबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार धनाजी जाधव पुढील तपास करत आहेत.

### पिकअपच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**सिन्नर :** सिन्नर-शिर्डी महामार्गावर पांगरीजवळील गुरुसावली हॉटेलसमोर पिकअपने (एम.एच.१७ बी.वाय.७५२३) होंडा दुचाकीला (एम.एच.१५, ई.व्ही. ९०४६) पाठीमागून धडक दिली. यात दुचाकीस्वार तुषार दिलीप शिंदे हा गंभीर जखमी झाला. याबाबत देवराम शिंदे यांनी पोलिसांत फिर्याद दिली आहे. पिकअप चालक राहुल राजेंद्र सरोदे (२४, रा. गणोरे, ता. अकोले) याच्या विरोधात अपघाताचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. हवालदार गोडे पुढील तपास करत आहेत.

### शहा येथे दोन गटात हाणामारी

**सिन्नर :** तालुक्यातील शहा येथे कांदळकर व गोराणे या दोन कुटुंबात जोरदार मारामारी झाली. यात १७ जणांविरोधात दंगा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कोमल कांदळकर घरात एकटी असताना संशयित सौरभ गोराणे यांच्यासह १२ जण घरात घुसून मारहाण केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. तर वैशाली गोराणे यांनी या अगोदर झालेल्या वादाची वावी पोलिस ठाण्यात दिलेली तक्रार मागे घेण्यास सांगताना आपल्याला व साक्षिदारांना मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पाच जणांविरोधात तक्रार दिली आहे. दोन्ही गटांनी परस्परविरोधी तक्रारी दिल्याने वावी पोलिसांनी १७ जणांविरोधा दंगा केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा अधिक तपास उपनिरीक्षक सोनवणे करीत आहेत.

### कारच्या धडकेत पादचारी ठार

**सिन्नर :** नाशिक-पुणे महामार्गावर नांदूरशिंगोटे येथे मारुती सुझुकी इको कारने (एम.एच.१२ एच.व्ही.०९८७) रस्ता ओलांडताना पांडुरंग नारायण सानप (५२, रा. गुळवंच) यांना जोराची धडक दिली. त्यात ते ठार झाले. याबाबत राहुल सानप यांनी कार चालकाविरोधात तक्रार दिली आहे. कार चालक प्रतिक संतोष नाईक (३६, रा. महेश सोसायटी, बिबवेवाडी, जि. पुणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार गोरे अधिक तपास करत आहेत.

### सिन्नर-शिर्डी मार्गावर मृतदेह

**सिन्नर :** सिन्नर-शिर्डी मार्गावर के.जी.एफ हॉटेलसमोर गुलाब वाल्मिक बच्छाव (५८, रा. एकनाथनगर, राहुरी, जि. अहिल्यानगर) हे रस्त्यावर बेशुध्द अवस्थेत आढळून आले. उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात आणले असताना डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. याबाबत पोलिसांनी आकस्मिक मृत्यू अशी नोंद केली आहे.



### सजन सांगळे यांची निवड

**सिन्नर :** भारतीय जनता पक्षाच्या सिन्नर शहर मंडल अध्यक्षपदी सजन सांगळे यांची निवड करण्यात आली. सध्या महाराष्ट्रातील सर्व जिल्हा, तालुका व शहर मंडल अध्यक्ष नियुक्ती व निवड प्रक्रिया सुरू असून त्याचाच एक भाग म्हणून सिन्नर शहराध्यक्ष निवडी संदर्भात त्र्यंबकेश्वरचे नवनिर्वाचित तालुकाध्यक्ष तथा सिन्नर शहर मंडल अध्यक्ष निवड प्रक्रिया प्रमुख सुयोग वाडेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड प्रक्रियेत शहर मंडल अध्यक्षपदी सजन सांगळे यांची निवड करण्यात आली. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सांगळे यांच्या निवडीबद्दल शुभेच्छांचा वर्षाव करत त्यांचा उत्साह वाढवला. पद ही शोभेची वस्तू नसून ती मोठी जबाबदारी असते असे भान ठेवण्याचा सल्ला ज्येष्ठ नेते भाऊसाहेब शिंदे यांनी दिला. काटेरी मुकुटाला न्याय द्या अशी भावना जयंत आव्हाड यांनी व्यक्त केली. रुसवे फुगवे काढण्यासाठी प्रयत्नशील रहा व मार्गक्रमण करा अशी सूचना बाळासाहेब हांडे यांनी दिली. अपेक्षेपेक्षाही चांगले काम करून दाखवायचा संकल्प सांगळे यांनी निवडीनंतर बोलताना व्यक्त केला. यावेळी जयंत आव्हाड, भाऊसाहेब शिंदे, बाळासाहेब हांडे, सुभाष करपे, संदीप गुजराती, मीराताई सानप, ज्ञानेश्वर कुऱ्हाडे, डॉ. दीपक श्रीमाली, विनोद आंबोले, प्रिया लहामगे, गणेश क्षीरसागर, रूपाली काळे, शरद काळे, ओमकार सानप, नानासाहेब बाबर, चव्हाण, पगार, आनंदा सानप, सुरेश गुंजाळ, रामचंद्र रोडे, सर्जेराव पाटील, वैभव कासार, संकेत सानप आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### संदीप भालेराव यांची निवड



**सिन्नर :** माणुसकी सोशल व ग्राहक संरक्षण फाउंडेशन संचलित ग्राहक (उपभोक्ता) संरक्षण समितीच्या सिन्नर तालुकाध्यक्षपदी संदीप काशिनाथ भालेराव यांची नियुक्ती करण्यात आली. समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष दादाभाऊ केदारे यांच्या हस्ते भालेराव यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. भालेराव यांच्या निवडीचे समितीचे कायदेशीर सल्लागार एस.एस. साबणे, अनिल वैद्य, अशोक आव्हाड, राष्ट्रीय उपाध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय सचिव डॉ. अविनाश झोटींग, राष्ट्रीय महिला उपाध्यक्षा रोहिणी जाधव, ॲड. प्रेरणा कुलकर्णी, ॲड. महेश ढाके आदींसह राष्ट्रीय, राज्य व जिल्हा पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले.



# ओंकार संगीत विद्यालयात विद्यार्थी गुणगौरव सोहळा

**सिन्नर : प्रतिनिधी**

ओंकार संगीत विद्यालयातील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा कामगार कल्याण केंद्र कमल नगर येथे नुकताच संपन्न झाला.

रोटरी क्लब ऑफ गोंदेश्वरचे संस्थापक अध्यक्ष सतीश नेहे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात व्यासपिठावर सिल्व्हर लोटस स्कूलचे संस्थापक अध्यक्ष दिलीप बिन्नर, आपली आपुलकी बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष खंडेराव डावरे, नवजीवन डे स्कूलच्या प्राचार्या श्रीम. वृषाली लोंढे, सामाजिक कार्यकर्त्या सौ. मेघा पावसे आदी उपस्थित होते. ओंकार संगीत प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संगीत विशारद भारत मांडे व सौ. कविता मांडे यांच्या हस्ते उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. नोव्हेंबर-डिसेंबर २०२४ या सत्रात अखिल भारतीय गांधर्व मंडळाच्या संगीत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाणपत्र वितरण व गुणवंत २४ विद्यार्थ्यांना सतीश नेहे साहेब सौजन्याने सन्मानचिन्ह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात आले.

कु. गायत्री मांडे हीने संगीत अलंकार पदवी मिळवून नाशिक केंद्रातून प्रथम क्रमांक मिळवला व कु. संचिता मांडे व हिने संगीत विशारद ही पदवी प्राप्त केल्याबद्दल यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

तसेच ओंकार मांडे, तृषा नाईकवाडी,गार्गी जोशी, दिप्ती घुगे, सात्विक लांडे, सार्थक उगले, अर्पिता जगताप, मानसी कापडणीस, सोहम गुंजाळ, वेदांत कडलग ,अर्णव डावरे,सोहम शिंदे,अक्षरा निमळे, गायत्री कदम,स्वरा उगले, सृष्टी शिंदे, अद्वैत भाबड, वेद मोरे, विनायक अंकली, कार्तिक बोडके, वैष्णवी खैरनार, चिन्मय रत्नाकर या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्हे देवून गौरविण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी मनोगतातून ओंकार संगीत विद्यालयाचे कार्य व भारत मांडे यांची विद्यार्थ्यांच्या प्रती असलेली तळमळ या विषयी कौतुक करून विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल अभिनंदन केले. मांडे सरांच्या मार्गदर्शनामुळे आज समाजात चांगली पिढी घडत आहे व सिन्नर शहराचे भाग्य आहे की मांडे सरांनी एवढे मोठे संगीत विद्यालय उभे केले आणि पुढील भविष्यात सिन्नर शहराला नाही तर महाराष्ट्राला संगीताचा कलाकार याच विद्यालयातून मिळेल अस प्रतिपादन सतीश नेहे यांनी अध्यक्षस्थानावरुन बोलताना केले. सुत्रसंचलन विजय निर्मळ यांनी केले. या कार्यक्रमास बहुसंख्य विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते.

# कृषी विद्यापीठ तंत्रज्ञान शेतकरीभिमुख असावे : ना.माणिकराव कोकाटे

## पुण्यात महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची ११८ वी बैठक

**सिन्नर : प्रतिनिधी**

राज्यातील कृषी विद्यापीठांनी विकसित केलेले तंत्रज्ञान शेतकरीभिमुख असावे. विद्यापीठांच्या संशोधनाचा शेतकरी हा केंद्रबिंदू असावा अशी अपेक्षा राज्याचे कृषीमंत्री तथा कृषी परिषदेचे अध्यक्ष ॲड. माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केली.

पुणे येथे महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची ११८ वी बैठक नुकतीच संपन्न झाली. यावेळी अध्यक्षस्थानावरुन ना. कोकाटे बोलत होते. व्यासपिठावर कृषी परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, राज्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सुरज मंढरे, कृषी परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे, उपसचिव सौ. प्रतिभा पाटील, कृषी विभागाचे विस्तार व प्रशिक्षण संचालक रफिक नायकवाडी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठाचे कुलगुरु डॉ. इंद्रमणी, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरु तथा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरु डॉ. शरद गडाख, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. संजय भावे, स्वीय सहाय्यक संतोष पाटील आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ना. कोकाटे यांनी कृषी शिक्षण राज्यातील सर्वसामान्य विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिक आधारित सुलभ पध्दतीने देण्यात यावे अशा अपेक्षा व्यक्त केल्या. तसेच कृषी विद्यापीठातील नवनविन तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार जलद गतीने व्हावा अशा सूचना दिल्या.

कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांनी शिक्षण संशोधन आणि विस्तार शिक्षण व साधन सामुग्री विकास या विषयी मार्गदर्शन केले. कृषी परिषदेचे उपाध्यक्ष तुषार पवार, महासंचालक रावसाहेब भागडे यांनीही मनोगत व्यक्त केले. कृषी परिषदेचे सहसंचालक डॉ. वैभव शिंदे यांनी कृषी परिषदेच्या ११७ व्या बैठकीचे इतिवृत्त सादर करुन कार्यपुर्ती अहवाल सभागृहास अवगत करुन दिला. त्यानंतर मागील बैठकीनंतर निर्गमित झालेले शासन निर्णय, शासन आदेश, शासन परिपत्रक यांचे वाचन करण्यात आले. या बैठकीत कृषी परिषदेचे अशासकीय सदस्य मोरेश्वर वानखेडे, प्रा. जर्नादन कातकडे, प्रविण देशमुख, गणेश शिंदे, विनायक काशिद यांनी विद्यापीठांच्या विविध बाबींवरील चर्चेमध्ये सहभाग घेऊन आपले मत व्यक्त केले. बैठकीस चारही कृषी विद्यापीठाचे सर्व संचालक, कुलसचिव, विद्यापीठ अभियंता व नियंत्रक उपस्थित होते.

### बैठकीत ३४ प्रस्ताव सादर

राज्याचे कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कृषी परिषेच्या ११८ व्या बैठकीत ३४ प्रस्ताव सादर करण्यात आले. शिक्षण विभागाचे प्रभारी संचालक डॉ. यशवंत साळे यांनी चार प्रस्ताव सादर केले. संशोधन विभागाचे प्रभारी संचालक डॉ. किशोर शिंदे यांनी आठ प्रस्ताव तर विस्तार शिक्षण व साधन सामुग्री विकास विभागाचे संचालक डॉ. धिरजकुमार कदम यांनी त्यांच्या विभागाचे २२ प्रस्ताव सादर केले.

# ठाणगावच्या डोंगरावर ५० हेक्टरवर ५१ हजार झाडे लावणार

## आयकर आयुक्त भरत आंधळेंचा पुढाकार; वनविभाग, संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा उपक्रम

**ठाणगाव : वार्ताहर**

ठाणगावचे भूमिपुत्र तथा सहाय्यक आयकर आयुक्त भरत आंधळे यांच्या पुढाकारातून वनविभाग, संयुक्त वन व्यवस्थापन समितीच्यावतीने ठाणगाव परिसरातील बेलटेकडी डोंगरावर ५० हेक्टर क्षेत्रात ५१ हजार झाडे लावण्यात येणार असून ग्रामस्थांच्या श्रमदानातून व विविध अस्थापनांच्या सीएसआर फंडातून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

ठाणगाव परिसर डोंगररांगांनी नटलेला आहे, तथापि काही समाजकंटकांकडून गेल्या काही दिवसांत डोंगरांवरील वाळलेले गवत पेटवून देण्याचे उपद्व्याप सुरु असल्याने येथील वनसंपदा नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याने परिसराला बकालपण आले आहे. गावचे भुमिपुत्र असलेल्या आयकर आयुक्त आंधळे यांनी यासंदर्भात ग्रामस्थांमध्ये जनजागृती करुन पर्यावरणाचे महत्व पटवून दिले. त्यानंतर ग्रामस्थांनी ग्रामसभा घेऊन वनसंपदेचे जतन करण्याचा चंग बांधला. सिन्नरचे वनपरिक्षेत्र अधिकारी हर्षल पारेकर यांनी ठाणगांव मधील कंम्पा नं.५९८ गट क्रमांक १५८६ बेलटेकडी येथे राखीव वनातील डोंगरावर ग्रामस्थांच्या श्रमदानातुन, वनविभाग व संयुक्त वन व्यवस्थापन समिती यांच्या सहभागातुन ५० हेक्टर जागेत ५१००० वृक्ष लावणेबाबत ग्रामसभा व संयुक्त वन व्यवस्थापन समिती यांनी ठराव करुन पश्चिम भाग, नाशिकचे उप वनसंरक्षक उमेश वावरे यांच्याकडे सादर केला. वावरे यांनी त्यास मंजुरी दिली असून लवकरच या कामाला सुरुवात होणार आहे.

पावसाळ्यापुर्वी संयुक्त वन व्यवस्थापन समिती व ठाणगाव ग्रामस्थांच्यावतीने श्रमदानातून तसेच सी.एस.आर. फंडातुन पुर्व पावसाळी कामे व रोपवन कामे करण्यात येणार आहे. वनक्षेत्रात कामे करतांना अस्तित्वात असलेल्या जैवविविधता तसेच इतर बाबींचे नुकसान होणार नाही याची दक्षता घ्यावयाची आहे.

श्रमदानातुन केलेल्या रोपवनावर संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा कोणताही हक्क राहणार नाही. मात्र रोपवन संरक्षणाची जबाबदारी संयुक्त वन व्यवस्थापन समितीची राहील.

कोणत्याही प्रकारची वृक्षतोड करता येणार नाही. तसेच वन्यजीवास कोणत्याही प्रकारची बांधा होणार नाही असे कोणतेही कृत्य करता येणार नाही. आवश्यकतेनुसार रोपवनास सिंचनाची व्यवस्था करण्यात येईल.

# पिण्याच्या पाण्यासाठी उपाययोजना करा : आ. काळे

**वावी : वार्ताहर**

कोपरगाव मतदार संघात मागील वर्षी चांगल्या प्रकारचे पर्जन्यमान झाले असले तरी मतदार संघातील काही गावात नागरीकांच्या व पशुधनाच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेली आहे. हि टंचाई दूर करून नागरीकांना व जनावरांना पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणार नाही यासाठी योग्य उपाययोजना करा अशा सूचना आ.आशुतोष काळे यांनी प्रशासनाला केल्या.



कोपरगाव तहसील कार्यालयात आ.आशुतोष काळे यांनी टंचाई आढावा बैठक घेवून विविध विभागाचा आढावा घेतांना प्रशासकीय अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलतांना आ.आशुतोष काळे यांनी सांगितले की, मतदार संघात मागील वर्षी चांगल्या प्रकारचे पर्जन्यमान झाल्यामुळे मतदार संघात पाणी टंचाई जाणवणार नाही अशी परिस्थिती होती. परंतु फेब्रुवारी महिन्यापासूनच मोठ्या प्रमाणात उन्हाळ्याच्या झळा जाणवू लागल्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली असली तरी नागरीकांना पाणी टंचाईची झळ बसू देणार नाही. सातत्याने पाणी टंचाईच्या झळा सोसणाऱ्या जिरायती भागातील जवळके, शहापूर, बहादराबाद, बहादरपूर वगळता बहुतांश गावांमध्ये निळवंडेचे पाणी पोहोचले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची टंचाई भासत नाही. पालखेड कालव्याच्या लाभक्षेत्रातील उक्कडगाव, शिरसगाव, तिळवणी, सावळगाव, आपेगाव या गावांना ओव्हरफ्लोचे पाणी मिळाले मात्र त्यानंतर पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी पाणी न दिल्यामुळे या गावांमध्ये पाणी टंचाई जाणवत आहे. त्याबाबत जलसंपदा मंत्र्यांकडे पालखेड डाव्या कालव्याच्या अधिकाऱ्यांची तक्रार करणार आहे.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, नगरपरिषद मुख्याधिकारी सुहास जगताप, नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, गटविकास अधिकारी संदीप दळवी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विकास घोलप, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अशोक लोहारे, गोदावरी डाव्या कालव्याचे उपविभागीय अभियंता संदीप पाटील, उजव्या तट कालव्याचे उपविभागीय अभियंता संभाजीराव पाटील, वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता धनंजय धांडे, डी.डी. पाटील, पशु संवर्धन अधिकारी डॉ. श्रद्धा काटे, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनराव काळे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष चारुदत्त सिनगर, पद्मविभुषण डॉ. शरदचंद्रजी पवार नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन देवेंद्र रोहमारे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदास केकाण, विष्णु शिंदे, वाल्मिक कोळपे, राजेंद्र खिलारी, देवचंद कडेकर, महेंद्र काळे, संतोष चवंडके, विविध ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिन्नर शहरात वर्दळीच्या ठिकाणी वाहतूक पोलिसांची गरज

**सिन्नर : प्रतिनिधी**

शहरातील वर्दळीच्या ठिकाणी वाहतुक कोंडीची समस्या गंभीर बनली असून पादचारी नागरिकांना त्याचा त्रास असह्य होत आहे. वर्दळीच्या ठिकाणी वाहतुक पोलिसाची नेमणूक करुन वाहतूक कोंडीची समस्या सोडवावी, अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी शहराध्यक्ष नामदेव कोतवाल यांनी केली आहे.

शहराची आजची लोकसंख्या ही एक लाखांहून अधिक गेली आहे. माळेगांव व मुसळगाव औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या बाहेरील कामगारांची संख्या मोठी आहे. त्यामुळे शहराच्या इतर अनेक सुविधांवर ताण पडत असल्याने शहरातील सातही दिवस रस्ते हे तुडुंब वाहत आहे. त्यामुळे दैनंदिन नागरी जीवनातील समस्या दिवसेंदिवस वाढत असून, शहरातील प्रमुख ठिकाण वाहतुकीची कोंडी असह्य झालेली आहे. नाशिक वेस, नवापूल, भिकुसा कोपरा, गणेश पेठ या शहरातील गजबजलेल्या व वदर्ळीच्या ठिकाणी वाहतूक व्यवस्था व रस्त्याने पादचाऱ्यांना विशेषतः ज्येष्ठ नागरिकांना जाणे-येणे हे अतिशय कठीण बनले आहे. तसेच वाहतूक कोंडीची समस्या ही दिवसेंदिवस वाढत असल्याने रस्त्याच्या दुतर्फा बसलेल्या व वाहतुकीला अडथळा ठरणाऱ्या विक्रेत्यांना व हातगाडीवाल्यांना शिस्त लावण्यासाठी कठोर पावले उचलण्याची गरज आहे. या शहरातील असह्य होणाऱ्या वाहतूक कोंडीतून नागरिकांना वावरणे सुसह्य होण्यासाठी शहरातील वाहतूक कोंडी होणाऱ्या प्रमुख ठिकाणी वाहतूक पोलीस नेमण्यात यावा.



येवल्यात पाणीटंचाईचा आढावा पान ६

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



धोंडेगाव आश्रमशाळेत आयबीटी रूमचे बनसोडांच्या हस्ते उद्घाटन पान नं. ६

■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५


## महत्त्वाचे

### मद्याच्या नशेत कामगाराची गळफास घेऊन आत्महत्या

**सिडको : विशेष प्रतिनिधी**



अंबड पोलिस ठाण्याच्या हद्दीतील स्वामी विवेकानंद नगरात राहणाऱ्या एका कंपनी कामगाराने मद्याच्या नशेत पहाटेच्या सुमारास राहत्या घरात गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, स्वामी विवेकानंद नगरातील जगदीश साळुंखे (वय ५० रा. राणेनगर सिडको नाशिक हे गोंदे एमआयडीसीतील एका कंपनीत नोकरीला होते. त्यांना मद्य पिण्याची सवय होती नेहमीच मद्याच्या नशेत असल्यामुळे पती पत्नीमध्ये नेहमीच भांडणे होत होती. काल रात्रीदेखील पती-पत्नीमध्ये वाद झाला. यावेळी जगदीशने त्याच्या पत्नीला रात्री घरातून हाकलून दिले होत.त्यानंतर जगदीश साळुंखे हे घरी एकटेच असताना पहाटेच्या सुमारास घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. याबाबत अंबड पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तर दुसऱ्या घटनेत पंचवटीतील नागचौक भागात राहणा-या ३२ वर्षीय युवकाने गळफास लावून घेत आत्महत्या केली. सदर तरूणाच्या आत्महत्येचे कारण समजू शकले नाही. याप्रकरणी पंचवटी पोलीस ठाण्यात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. अक्षय कैलास आंबरे (३२ रा. साई मंदिरामागे, जोशीवाडा) असे मृत युवकाचे नाव आहे. आंबरे याने शनिवारी (दि.१९) रात्री अज्ञात कारणातून आपल्या राहत्या घरात पंख्यास साडी बांधून गळफास लावून घेतला होता. ही बाब निदर्शनास येताच कुटुंबीयांनी त्यांना तत्काळ जिल्हा रूग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय सूत्रांनी तपासून मृत घोषित केले. अधिक तपास हवालदार गांगुर्डे करीत आहेत.



### कुस्त्यांच्या स्पर्धेत सार्थक नागरे विजेता

**नाशिकरोड : वार्ताहर**

श्री पाच बंगला म्हसोबा महाराज देवस्थानच्या कुस्त्यांचा फडात मानाची कुस्ती पिंपळगाव बहुला येथील सार्थक नागरे विरुद्ध बंटी राजपूत रावतमाळ यांच्यामध्ये झाली. अखेर सार्थक नागरे या राष्ट्रीय खेळाडूने ही कुस्ती जिंकली. १५०० रुपयांचा चषक व २००० रूपये रोख असे बक्षीस त्यांना देण्यात आले. हा चषक मंदिराचे संस्थापक अध्यक्ष स्व. लक्ष्मणराव कदम यांच्या स्मरणार्थ ठेवण्यात आला होता. या फडात महिला कुस्तीपटूंनीही आपली उत्तम कामगिरी बजावली. स्व.पार्वताबाई लक्ष्मण कदम स्मरणार्थ महिला चषकाची कुस्ती चिंचोलीच्या पायल झाडे आणि भरवीरची अक्षया धनकर यांच्यात झाली. दोघींनीही डावपेच दाखवत प्रेक्षकांना खुश केले अखेर ही कुस्ती बरोबरीत सोडविण्यात आली. पायल झाडेला चषक आणि अक्षया धनकरला पाचशे रुपये रोख इनाम देण्यात आला. चिंचोली, भगूर आणि भरवीर येथील या युवती मल्ल होत्या. २० रुपयांपासून ३००० रूपया पर्यंतच्या व भव्य चषक अशा १०० च्या वर मल्लांच्या कुस्त्या पार पडल्या. पोलिस खात्यातील पुण्याहून आलेले मल्ल पो.नि. दशरथ हटकर, रतन सांगळे, आयोजक दशरथ कदम, अशोक जाधव, अविनाश फडोळ, संदीप शहाणे, संदीप निकम, संदीप कदम, मनोज्ञ कदम, वामनराव झाडे, खंडेराव मेढे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून आखाड्याचे विधीवत पूजन करण्यात आले. संदीप शहाणे, संदीप निकम व दशरथ कदम यांनी पंच म्हणून काम केले. तर अविनाश फडोळ व खंडेराव मेढे यांनी उत्तम समलोचन केले.

# उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशाला मनपाचा ठेंगा

## वादग्रस्त तेराशे कोटींच्या सांडपाणी निविदेला गती

**नाशिक : प्रतिनिधी**



**नाशिक महापालिकेच्या तिजोरीत खडखडाट असताना पाच मलनिस्सारण प्रकल्प उभारण्याचे काम मनपाने हाती घेतले असून, त्यासाठी तेराशे कोटी रुपये खर्च येईल. पैसे नसल्याने पीपीपीएफ तत्वावर हे प्रकल्प उभारले जाणार आहेत. दरम्यान, वादग्रस्त तेराशे कोटींच्या मलनिस्सारण प्रकल्पाचा वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे महापालिका प्रशासनाला दिले होते. मात्र पालिकेने चक्क उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशाला एकप्रकारे ठेंगा दाखवत सांडपाणी निविदा प्रक्रिया राबवण्यासाठी जणू बुलेट ट्रेनची गती दिली आहे. या कामाकडे संशयाने पाहिले जात असतानाही एवढी तत्परता पालिका प्रशासन कशासाठी घेते आहे? असा सवाल केला जाऊ लागला आहे.**

सर्वात प्रथम याविरोधात शिवसेना महानगरप्रमुख प्रवीण तिदमे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे तक्रार केली होती. त्यानंतरया वादग्रस्त तेराशे कोटी मलनिस्सारण प्रकल्प योजनेचा सविस्तर वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले होते. विशिष्ट ठेकेदाराला लाभ पोहचवण्यासाठी हा खटाटोप सुरु असल्याची जोरदार चर्चा मनपा वर्तुळात सुरू आहे. निविदेला कोणताही अडथळा येऊ नये म्हणून मनपा प्रशासनाने घाईत निविदा प्रक्रिया राबवली.

मागील आठवड्यात १९ एप्रिलला निविदा भरण्याची अंतिम मुदत होती. तर सोमवारी (दि.२१) निविदा खोलली जाणार



होती. ही घाई मात्र मनपात चर्चेचा विषय ठरत आहे.सुरुवातीला ही निविदा जागतिक स्तरावरील होती. मात्र, नंतर त्यातील नियमांमध्ये आंतरराष्ट्रीय कंपन्या बसूच शकत नाही. जॉइंट व्हेंचरदेखील यात सहभागी होऊ शकत नाही अशी अट ही जाणीवपूर्वक टाकल्याचा आरोप तिदमे यांनी केला आहे. या प्रक्रिया रद्द करावी अशी मागणी त्यांनी केली.

त्यानुसार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या सर्व प्रकरणाची सविस्तर माहिती व वस्तुनिष्ठ अहवाला सादर करण्याचे आदेश मनपा आयुक्त खत्री यांना दिले. परंतु अजूनही अहवाल सादर करण्यात आला नाही. एकप्रकारे विशिष्ट

> दहा दिवसांपूर्वी चौकशीचे पत्र प्राप्त झाले. अहवाल तयार करायचे काम सुरू असून प्रक्रियेला स्थगिती दिलेली नसून ती सुरू आहे.
>
> **– रवींद्र धारणकर,** अधीक्षक अभियंता मनपा

ठेकेदारासाठी मनपा प्रशासन कार्यरत असल्याचा आरोप होत असून उपमुख्यमंत्री शिंदे यांचे देखील आदेश डावलले जात असल्याची जोरदार चर्चा पालिका वर्तुळात आहे. निविदा काढताना ती विशिष्ट ठेकेदाराला मिळेल अशा पद्धतीने नियोजन केल्याचा संशय आहे. या कामाच्या निविदा २४ फेब्रुवारी रोजी जाहीर करण्यात आल्या आणि २८ फेब्रुवारी रोजी बोलीपूर्व बैठक बोलावण्यात आली. ज्या ठेकेदाराची तयारी आहे, त्याला पुरेसा वेळ मिळावा आणि ज्यांना तयारी करायची आहे, त्यांना कमी वेळ मिळावा हा हेतू असल्याचे दिसून येत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला.

# जिल्ह्यातील ३७९ जागा प्रवर्गासाठी राखीव

## सरपंचपदासाठी दिंडोरीत आठ जागांवर आरक्षण

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ८१० आणि अनुसूचित क्षेत्रातील ५७७ अशा एकूण १,३८७ ग्रामपंचायत सरपंच पदाच्या सोडतीचा कार्यक्रम सोमवारी (दि. २१) राबविण्यात आला. त्यातील ८१० ग्रामपंचायती या अनुसूचित क्षेत्रा बाहेरील (पेसा क्षेत्र वगळून) असून, तेथील तब्बल ३७९ जागा या एस.सी., एस.टी. आणि ना.म.प्र या वर्गांसाठी राखीव झाल्या आहेत. महिला ग्रामपंचायतीच्या महिला आरक्षणाचा कार्यक्रम येत्या दोन दिवसांत राबविण्यात येणार आहे. यातील किमान ४०५ जागा महिलांसाठी आरक्षित होतील.

सरपंचपदासाठी सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी सुमारे १,३८७ जागा असून, त्यांची सोडत सोमवारी (दि. २१) काढण्यात आली. यामध्ये ७०४ जागा महिला सरपंचपदासाठी राखीव आहे. जिल्ह्यातील नाशिक, देवळा, नांदगाव, दिंडोरी, मालेगाव आणि येवला येथील ३७९ जागांचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

| प्रवर्गनिहाय सरपंचांच्या जागा | |
|---|---|
| अनूसुचित जाती | ५४ |
| अनूसुचित जमाती | १०७ |
| नागरिकांचा मागास प्रवर्ग | २१८ |
| सर्वसाधारण प्रवर्ग | ४३१ |
| एकूण जागा | ८१० |

बिगर अनूसुचित क्षेत्राबाहेरील ग्रामपंचायतींमधील सरपंचाच्या जागा आरक्षणनिहाय अंतिम केल्या. या जागांमध्ये जिल्ह्यातील ८१० गावांचा समावेश आहे. त्या गावांमध्येही आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. सर्वच तालुक्यांमधील ग्रामपंचायतमध्ये महिला आरक्षण बाकी असल्याने आता २३ व २४ एप्रिल रोजी महिला सरपंचांची पदे राखीव करण्यासाठी सोडत काढण्यात येणार आहे. शासनाच्या नियमानुसार ५० टक्के पदे ही महिलांकरीता राखीव असल्याने कोणत्या ग्रामपंचायतीत महिला आरक्षण असेल हे त्याच वेळेस स्पष्ट होईल.





# जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना सेवा उत्कृष्टता पुरस्कार प्रदान

**नाशिक : प्रतिनिधी**

नागरी सेवा दिनानिमित्त नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना 'पंतप्रधान नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२३' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आणि नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासातील उल्लेखनीय योगदानासाठी शर्मा यांना हा पुरस्कार 'जिल्ह्यांचा समग्र विकास' श्रेणीत मिळाला.

१७ व्या नागरी सेवा दिनानिमित्त विज्ञान भवन येथे केंद्रीय कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्ती वेतन मंत्रालयाच्या अंतर्गत प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागामार्फत या पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली नाशिक जिल्ह्याने आयुष्मान भारत, पंतप्रधान आवास योजना, जल जीवन मिशन, उज्वला योजना, मुद्रा योजना, पोषण आहार योजना, स्वनिधी योजना आणि पीएम विश्वकर्मा योजना यासह केंद्र सरकारच्या १२ प्रमुख योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीत राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला. केंद्र सरकारच्या सर्वेक्षणात नाशिकच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेत

### महाराष्ट्र परिचय केंद्राला भेट

'पंतप्रधान नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२३' ने सन्मानित झाल्यानंतर . जलज शर्मा यांनी महाराष्ट्र परिचय केंद्राला भेट दिली. या वेळी महाराष्ट्र परिचय केंद्राच्या उपसंचालक अमरज्योत कोर अरोरा यांनी शर्मा यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

शर्मा यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पंतप्रधान नागरी सेवा सर्वोत्कृष्टता पुरस्कार २०२३ मध्ये करंडक, मानपत्र आणि २० लाख रुपये प्रोत्साहन निधी असे पुरस्काराचे स्वरुप असून, हा निधी नाशिक जिल्ह्यातील लोककल्याणकारी प्रकल्प आणि योजनांच्या अंमलबजावणीसाठी उपयोगात आणण्यात येईल. जिल्हाधिकारी शर्मा म्हणाले, हा पुरस्कार नाशिकच्या जनतेचा आणि प्रशासकीय यंत्रणेच्या सामूहिक प्रयत्नांचा सन्मान आहे. श्री. शर्मा यांनी केंद्र सरकारच्या योजनांना स्थानिक गरजांशी समन्वय साधून प्रभावीपणे राबवण्यावर भर दिला असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्र व राज्य शासनाचे आभार मानले.

# एक आठवड्यात सीएनजी पुरवठा पूर्ववत

## अधिकाऱ्यांचे आश्वासन; २६ चा संप स्थगित

**नाशिक : प्रतिनिधी**

सीएनजी तुडवड्याबाबत तोडगा काढण्यासाठी झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली असून, जिल्हाभरात सीएनजीचा पुरवठा एक आठवड्यात सुरळीत करण्यात येईल. प्रत्येक सीएनजीला पंपाला दिवसाला चार टँकरचा पुरवठा करण्यात येईल, असे आश्वासन कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिले. त्यानंतर जिल्हा पेट्रोल डीलर्स असोसिएशन असोसिएशनकडून सीएनजी विक्री बंद आंदोलन एक महिन्यासाठी स्थगित करण्यात आले.

शहरात गेल्या काही दिवसांपासून असलेल्या सीएनजीच्या तुडवड्याबाबत सोमवार दि.२१ रोजी एमजीएनएल अधिकारी व जिल्हा पेट्रोल डीलर्स असोसिएशन यांची बैठक झाली.बैठकीत पुरवठा करण्यात येणाऱ्या तांत्रिक अडचणी याबाबत चर्चा झाली.

एलएनजी सप्लायमध्ये ट्रान्सपोर्टमार्फत अडचण निर्माण होत असल्यामुळे तुटवडा होत आहे. नव्याने ५ लॉरीचे टेंडर करून हा सप्लाय वाढवत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. सर्व पूर्ववत होण्यासाठी एक आठवडा



वेळ लागेल असे स्पष्ट केले. येत्या सहा महिन्यांत नाशिक शहर हे मुंबई डेपोशी थेट पाइपलाइनच्या माध्यमातून जोडण्याचे काम अंतिम टप्प्यात असून, येत्या सहा महिन्यांत पूर्ण होऊन सीएनजी तुटवड्याचा प्रश्न कायमचा सुटणार असल्याचे आश्वासन जिल्हा पेट्रोल डीलर्स वेल्फेअर असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांना देण्यात आले. पुरवठ्याबाबत एक महिन्यानंतर बैठक घेऊन त्यात किती सुधारणा झाली याबाबत आढावा घेण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आले. बैठकीसाठी महानगर गॅस लिमिटेडचे सुजित रुईकर माणिक कदम, संदीप श्रीवास्तव, फामपेडा उपाध्यक्ष भूषण भोसले, फामपेडा सचिव सुदर्शन पाटील तसेच नाशिक जिल्हा पेट्रोल डीलर वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष विजय ठाकरे, उपाध्यक्ष तेहसीन खान, सेक्रेटरी अमोल बनकर, साहेबराव महाले अमोल आढाव, रवी ठाकरे, शाम दुसाने व इतर पदाधिकारी उपस्थित होते. डीलर्स तसेच ऑइल कंपनी बीपीसीएलचे अंग ताशी शेर्पा, एचपीसीएलचे प्रथमेश सोनवणे, आयओसीएलचे देवेंद्र पाटील उपस्थित होते.

### एमजीएनएलचे आश्वासन

नाशिक शहरात महानगर गॅसचे ४ पंप सोडून जे उर्वरित ४ पंप ऑनलाईन आहेत त्यांना किमान सकाळी ६ ते संध्याकाळी १० पर्यंत नियमित पुरवठा एमएनजीलमार्फत देण्यात येईल. सुमारे ३१ पंप नाशिक शहर व ग्रामीणमध्ये सुरू आहेत त्यांना गाडी मार्फत पुरवठा होत असल्याने पंपांना देखील रोजचा किमान ३००० किलो सीएनजी नियमितपणे पुरवठा करण्यात कंपनी प्रयत्नशील असणार आहे.

# अतिरिक्त आयुक्तांचे खाते वाटप

## करिष्मा नायरांकडे महत्वाचे विभाग

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक महापालिकेत काही दिवसांपूर्वी शासनाने तिसरे अतिरिक्त आयुक्तपद मंजूर करुन आयएएस करिष्मा नायर यांची अतिरिक्त आयुक्त म्हणून नियुक्ती केली. सोमवारी मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी अतिरिक्त आयुक्तांच्या कामांची विभागणी केली. यापूर्वी सेवा व शहर अशा दोन विभागांत दोघा अतिरिक्त आयुक्तांकडे विविध खात्यांचा कारभार होता.मात्र आता आयुक्तांनी विभागांचे वाटप करुन त्यांना क्रमांक दिला आहे. यात पहिला क्रमांक करिष्मा नायर यांना देण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्यांच्याकडे महत्वाचे विभाग सोपवण्यात आल्याने नायर यांचा करिष्मा दिसून आला.

अतिरिक्त आयुक्त नायर या थेट आयएस असल्याने त्यांना क्रमांक एक देण्यात आला असून त्यांच्याकडे घनकचरा व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान, प्रकल्प विभाग, पर्यावरण, शिक्षण, उद्यान, जाहिरात व कर परवाने विभाग देण्यात आले आहेत. अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांना दुसरा क्रमांक देण्यात आला असून त्यांच्याकडे बांधकाम, सार्वजनिक वाहतूक, समाजकल्याण, सुरक्षा, मिळकतकत, कर आकारणे, पशुसंवर्धन, जनसंपर्क व कामगार कल्याण असे नऊ विभाग देण्यात आले. तर स्मिता झगडे यांना अतिक्रमण व अग्निशमन हे विभाग देण्यात आले. मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी तीन अतिरिक्त आयुक्त असल्याने शहर व सेवा ऐवजी आता त्यांना क्रमांक देत खाते व कामाची विभागणी केली आहे. अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांना पहिला,चौधरी यांना दुसरा व स्मिता झगडे यांना तिसरा क्रमांक देण्यात आला. आयुक्तांनी स्वत:कडे सामान्य प्रशासन, पाणीपुरवठा व मलनिस्सारण, विद्युत यांत्रिकी, गुणवत्ता नियंत्रण, लेखा परीक्षण व नगर नियोजन हे महत्वाचे विभाग ठेवले आहे. याआधी अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी (प्रशासन) व अतिरिक्त आयुक्त स्मिता झगडे यांच्याकडे (सेवा) अशी खात्यांची विभागणी होती. परंतु मनपासाठी तिसरे अतिरिक्त आयुक्तपद शासनाने मंजूर केले असून करिष्मा नायर मनपात रुजू झाल्या. त्यामुळे आता तीन अतिरिक्त आयुक्त असल्याने शहर व सेवा ऐवजी त्यांना एक,दोन,तीन असे क्रमांक देत कामाची विभागणी करण्यात आली.

# केवायसी अपडेट बाबत रेशन दुकानदारांना नोटिसा

**नाशिक : प्रतिनिधी**

रेशन दुकानदारांच्या केवायसी अपडेट प्रकरणाबाबत प्रशासनाने गंभीर पाऊले उचलण्यास सुरुवात केली. जिल्हातील ६५ रेशन दुकानदारांना याबाबत नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. सोमवारी या रेशन दुकानदारांची तिसरी सुनावणी घेण्यात आली.



जिल्ह्यातील रेशन दुकानदारांच्या माध्यमातून रेशन कार्डधारकांचा केवायसी करण्याचा उपक्रम राज्य शासनाच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमात जिल्हा प्रशासनाने हाती घेतला होता. मात्र जिल्ह्यातील ६५ ते ७० रेशन दुकानदारांचे केवायसी हे ३० ते ४० टक्क्यांपर्यंत झालेले असल्याने तहसीलदार कैलास पवार यांनी दुकानदारांना नोटिसा बजावल्या होत्या.या नोटिशींनंतर मागील दोन बैठकांमध्ये त्यांना केवायसीला गती देण्याच्या सूचना दिल्या होत्या. सोमवारच्या सुनावणी प्रसंगी रेशन दुकानदारांनी केवायसी ८० टक्के पूर्ण केल्याचे पुरावे देत माहिती सादर केली. हे प्रमाण ९० टक्क्यांच्यावर नेण्याच्या सूचना तहसीलदार कैलास पवार यांनी रेशन दुकानदारांना दिल्या.

# आंतरजातीय विवाह अनुदानाचा संसाराला हातभार!

## ४७८ दाम्पत्यांच्या खात्यावर रक्कम जमा; 'समाजकल्याण'ची कार्यवाही

**नाशिक : प्रतिनिधी**

**जातीजातीतील तेढ कमी व्हावा, यासाठी शासनपातळीवर विविध योजना राबविण्यात येतात.सवर्ण आणि मागासवर्ग प्रवर्गातील विवाह करणाऱ्यांना योजनेतंर्गत ५० हजार रूपये आर्थिक मदत दिली जाते.गेल्या तीन वर्षापासून प्रलंबित अनुदान समाज कल्याण विभागास प्राप्त झाले असून पीएफएमएस प्रणालीद्वारे ४७८ लाभार्थ्याच्या खात्यावर अनुदानाची रक्कम वितरित करण्यात आली आहे.अशी माहिती जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी हर्षदा बडगुजर यांनी दिली.**

समाजकल्याण विभागामार्फत आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन देण्यासाठी आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात आले.आर्थिक वर्ष २०२४ -२५ साठी पीएफ एमएस प्रणालीवर २३९ लाख रूपयांचा निधी प्राप्त झाला होता. २८ फेब्रुवारीला प्रत्येक लाभार्थ्याला ५० हजारांप्रमाणे एकूण ४७८ लाभार्थ्यांना थेट त्यांच्या संयुक्त बँक खात्यावर निधी वर्ग करण्यात आला आहे.

या योजनेतंर्गत सन २०२२-



२३ मधील १०९, सन २०२३-२४ मधील २४६ आणि सन २०२४ -२५ मधील १२५ लाभार्थ्यांचा समावेश असून, समाजामध्ये जातीय सलोखा आणि समता वाढीस लागावी या हेतूने ही योजना राबविण्यात येते.

समाजकल्याण विभागाच्या या उपक्रमामुळे आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी केंद्र व राज्य सरकार जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडे निधी वर्ग करते.२०१० पर्यत अशा जोडप्यांना १५ हजार रूपये अर्थसहाय्य केले जात होते. त्यानंतर त्यात वाढ होऊन ५० हजार रूपये करण्यात आले आहे. केंद्र व राज्य सरकारकडून एकत्रित निधी आल्यावर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाकडून धनादेश देऊन जोडप्यांना आर्थिक मदत केली जाते.

### ४८५ पैकी ४७८ लाभार्थ्यांना अनुदान वितरित

जिल्हा परिषदेकडे ऑगस्ट २०२३ मध्ये शासनाकडून २९ लाख रूपयांचा निधी प्राप्त झाला होता.त्यातून ५८ जोडप्यांना लाभ देण्यात आला होता.सन २०२२– २३ यामध्ये १०९ ,२०२३–२४ मध्ये २४६ आणि २०२४–२५ जानेवारीपर्यंत १३० असे एकूण ४८५ प्रस्ताव प्रलंबित होते. आर्थिक वर्ष २०२४ –२५ साठी पीएफएमएस प्रणालीवर २३९ लाख रूपयांचा निधी प्राप्त झाला होता.एकूण ४७८ लाभार्थ्यांना निधी वर्ग करण्यात आला आहे.४७८ लाभार्थ्यांना दोन कोटी ३९ लाख पीएफएमएस प्रणालीद्वारे वितरित करण्यात आले.

### असा करावा अर्ज

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागात अर्ज संपूर्ण माहितीसह भरावा.

**आवश्यक कागदपत्रे :** जातीचे प्रमाणपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, विवाह नोंदणी प्रमाणपत्र, डोमेसाईल (अधिवास) प्रमाणपत्र लागतात. समाजकल्याण विभागाकडे आलेल्या प्रस्तावाची छाननी केली जाते.कागदपत्रे तपासली जातात. जोडप्यांकडून संयुक्त बँक खाते, पासबुक, ओळखपत्र आदींची पडताळणी केली जाते.कागदपत्रांची सत्यता तपासल्यानंतर निधी खात्यावर पीएफएमएस प्रणालीद्वारे जमा होतो.



« सलग पाचव्या दिवशी शेअर बाजार तेजीत
« पान ३

# नाशिक आज गांवकरी



« देशांतर्गत तीन विमान कंपन्यांना १५०० कोटींची कर नोटीस « पान ३

■ नाशिक, मंगळवार, दि. २२ एप्रिल २०२५

## महत्त्वाचे



### आमदार सीमा हिरेंची दिव्यांगांना मदत

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

पाटीलनगर, त्रिमूर्ती चौक येथे राहणारे दिव्यांग भावंडे गणेश मधुकर भोई (वय ३४) आणि यशवंत मधुकर भोई (वय ३३) यांनी आमदार सीमा हिरे यांच्या जनसंपर्क कार्यालयात येऊन आभार व्यक्त केले. सीमा हिरेंमुळे आम्हाला शासनाच्या दिव्यांग अर्थसहाय्य योजनेचा लाभ मिळाला, आता आमचे स्वप्न आहे स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचे, असा विश्वास त्यांनी या वेळी बोलून दाखवला. भोई बंधूंनी काही महिन्यांपूर्वी शासनाच्या दिव्यांग अर्थसहाय्य योजनेअंतर्गत अर्ज केला होता. आमदार हिरे यांच्या योजनाप्रमुख सुभाष जगताप यांच्या मार्गदर्शनाने व सहकार्याने या योजनेतून त्यांना प्रत्येकी रु. ३०००/- मासिक अनुदान सुरू झाले आहे. या भेटीदरम्यान दोघांनीच एक भावनिक गोष्ट शेअर केली - कपिल शर्मा शो सारख्या राष्ट्रीय टेलिव्हिजनवर त्यांनी भाग घेतला असून, रितेश देशमुख व विवेक ओबेरॉय यांच्यासोबत नृत्य व विनोद सादर केल्याचे व्हिडिओ देखील त्यांनी उपस्थितांना दाखवले. या क्षणाने वातावरणात उत्साहाचे व कौतुकाचे स्वर भरले. यावेळी भाजप नेते महेश हिरे, सिडको भाजप मंडल अध्यक्ष डॉ. वैभव महाले, डॉ. विनय मोगल, परमानंद पाटील, महिला मोर्चा सरचिटणीस रश्मी हिरे बेंडाळे, सुभाष जगताप आदी उपस्थित होते.

# मनपावर थकबाकीचा ५६४ कोटींचा डोंगर

## थकबाकीदारांना नोटिसा; बोजा चढवून लिलाव करण्याच्या सूचना

**नाशिक : प्रतिनिधी**

**महापालिकेने गेल्या आर्थिक वर्षात ऐतिहासिक अडीचशे कोटींची रेकॉर्डब्रेक मालमत्ता कराची वसुली केली. एकीकडे कर विभागाने ही कामगिरी केली असताना दुसरीकडे मात्र थकबाकीचा आकडा कमी होण्याचे नाव घेत नसून थकबाकी ५६४ कोटींच्या घरात पोहोचली आहे. मालमत्ताधारकांनी थकबाकी भरण्यासाठी महापालिका प्रशासनाने एप्रिल ते जून या तीन महिन्यांत करसवलत योजना आणली आहे. आतापर्यंत करसवलत योजनेतून अवघे १३ कोटी ४९ हजार ५४९ रुपयांचा भरणा नागरिकांनी केला आहे. थकबाकीचा महाकाय डोंगर पार करण्याचे आव्हान मनपासमोर आहे.**

पंचवटी विभागात सर्वाधिक १६५ कोटी थकबाकी असून, त्याखालोखाल नाशिक पूर्वत ११६ कोटींची थकबाकी आहे. इतर विभागाची थकबाकी नव्वद कोटींच्या आत आहे. मालमत्ता



कर वेळेवर भरावा म्हणून मनपा प्रशासनाने एप्रिल ते जून या कालावधीत सवलत मोहीम हाती घेतली आहे. विशेष म्हणजे गेल्या वर्षी करसवलत योजनेमुळे १२० कोटींचा भरणा झाला. परंतु त्यानंतर कर भरणा थंडावला. त्यावर पर्याय म्हणून राज्य शासनाच्या सूचनेनूसार मनपाने अभय योजना आणली. ऑक्टोबर २०२४ ते जानेवारी या कालावधीत थकबाकी भरल्यास मूळ रकमेवरील शास्तीवर तब्बल ९५ टक्के सूट देण्यात आली. त्यानंतर ८५ टक्के सूट दिली गेली. यामुळे तिजोरीत ११६ कोटींचा मालमत्ता कर जमा झाला. या योजनेनंतरही महापालिकेची थकबाकी असल्याचे पाहून आता प्रशासनाने तब्बल

**विभागनिहाय थकबाकी**

| विभाग | थकबाकी |
|---|---|
| सातपूर | ५७ कोटी |
| नाशिक पश्चिम | ६१ कोटी |
| नाशिक पूर्व | ११६ कोटी |
| पंचवटी | १६३ कोटी |
| नविन नाशिक | ९० कोटी |
| नाशिकरोड | ९८ कोटी |

> थकबाकी भरून महापालिकेला सहकार्य करावे, मालमत्ताकराचे ५६४ कोटींची वसुली शिल्लक आहे. थकबाकी भरण्यास टाळाटाळ करणाऱ्यांवर प्रशासन कायदेशीर कारवाई करेल. कारवाई टाळण्यासाठी पालिकेला सहकार्य करावे.
> **–अजित निकत,** उपायुक्त कर संकलन विभाग मनपा

दोन लाख थकबाकीदारांना नोटिसा धाडल्या. एप्रिल ते जून या तीन महिन्यांत आठ, पाच व तीन टक्के अशी सवलत दिली असून याचा फायदा होईल. अशी अपेक्षा प्रशासनाला आहे. थकबाकीचा डोंगर साडेपाचशे कोटींच्या पुढे असल्याने मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी थकबाकीदारांना नोटिसा बजविण्याचे आदेश दिले. सहकार्य केले नाहीतर मालमत्तांवर बोजा चढवून त्यांचा लिलाव करा अशा सूचना दिल्या आहेत. त्यानंतर करसंकलन विभागाने तब्बल दोन लाख थकबाकीदारांना नोटिसा बजावल्या आहेत. यामुळे थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत. महापालिकेच्या उत्पन्नात करसंकलन विभागाचा मोठा हातभार असतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून मालमत्ता कर थकबाकीचा डोंगर दिवसेंदिवस वाढत आहे.



## अतिक्रमणांविरोधात अंत्ययात्रा

### अधिकाऱ्यांना दिला बांगड्यांचा आहेर

**नाशिक : प्रतिनिधी**

सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीतील सुमारे १३० कारखान्यांतील अतिक्रमणाविरोधात सोमवारी (दि. २१) एमआयडीसी कार्यालय व अधिकाऱ्यांविरोधात अंत्ययात्रा आंदोलन काढत प्रशासनाचे लक्ष वेधले. यावेळी अधिकाऱ्यांना बांगड्यांचा आहेर देत एमआयडीसी अधिकाऱ्यांविरोधात निषेध नोंदवला.

राम नाम सत्य है म्हणत समाजसेवक संतोष शर्मा यांनी हातात मडके, अन् फुलांनी सजवलेल्या तिरडीची अंत्ययात्रा काढली. जोरदार घोषणा देत एमआयडीसी कार्यालया समोर आंदोलकांनी बांगड्या दाखवून निषेध केला. निमा कार्यालया येथून काढण्यात आलेल्या या प्रतिकात्मक अंत्ययात्रेत, हजारों महिला व नागरिकांनी सहभाग नोंदवला.

येत्या १० दिवसांत यावर कारवाई न झाल्यास १ मे कामगार दिनी मुंडण आंदोलन करणार असल्याचे शर्मा यांनी सांगितले. दरम्यान, उद्योग भवनातील कार्यकारी अभियंता जयवंत पवार हे गैरहजर असल्याने, अंबड विभागाचे उपअभियंता सुरकर, सातपूर विभागाचे उपअभियंता चौधरी यांची भेट घेत अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. अंत्ययात्रा आंदोलनात संतोष शर्मा व प्रिया शर्मा यांच्या नेतृत्वाखाली रज्जाक शेख, इस्माईल चाचा, कैलास दवंडे, परशुराम नायडू, बबलू चव्हाण, राम खरात, प्रशांत कहार, अविनाश मोरे, बबलू बनसोडे, विशाल पाडमुख, शकुंतला खरात, अलका डाखोरे, रजिया पठाण, अश्राफ शेख, मुन्ना पहिलवान सहभागी झाले होते.

# साधुग्रामचा विस्तार खोळंबला

## जमीन अधिग्रहणाचे घोडे अडलेलेच

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमध्ये दीड वर्षांनी होऊ घातलेल्या कुंभमेळ्यात दिवसाला दहा लाख तर पर्वणीच्या दिवशी एक कोटी भाविक येण्याची शक्यता लक्षात घेत महापालिका साधूग्रामचा विस्तार थेट सहाशे एकरापर्यंत करणार असल्याचे सांगितले जात होते. मात्र, सद्यस्थितीत हा विस्तार खोळंबला आहे. राज्य शासनाच्या उदासीनतेमुळे साधुग्राम व परिसरातील जमिनींचे अधिग्रहण रखडले आहे.

महापालिकेने तपोवनात साधूग्रामसाठी साडेतीनशे एकरावर आरक्षण टाकले आहे. परंतु यंदा साधू महंतांची संख्या लक्षणीय वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी ही जागा अपुरी ठरेल. त्यामुळे मेरी येथील शंभर एकर जागेचा साधूग्रामसाठी पर्याय आहे. त्याशिवाय शंभर ते दीडशे एकर जादा जागा लागणार असून त्यासाठी शोध मोहीम राबवली जात आहे. विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या नेतृत्वात मनपासह विविध यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनी नुकत्याच उत्तरप्रदेशातील प्रयागराज येथे झालेल्या तीन दिवसीय कुंभमेळा दौरा केला होता. तेथील नदी घाट, रिंगरोड, पूल, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, वाहनतळ, स्वच्छता, आरोग्य यांसह विविध सोयीसुविधांची पाहणी केली. प्रयागराज येथे ८० कोटी भाविकांनी हजेरी लावत रेकॉर्डब्रेक गर्दी केल्याचा दावा तेथील प्रशासनाने केला. ते पाहता नाशिक सिंहस्थ कुंभमेळ्यातही मोठ्या प्रमाणात गर्दीची शक्यता आहे. मनपाच्या नव्या अंदाजानुसार पर्वणीच्या दिवशी एक कोटी भाविक तर दिवसाला दहा लाख भाविक भेट देतील. मनपाने जो सिंहस्थ आराखडा तयार केला तो २०१५ च्या कुंभमेळ्यातील गर्दीच्या तुलनेनुसार केला. तेव्हा तीन कोटी भाविक आले होते. त्या आधारे यंदा पाच कोटी भाविक येतील हा अंदाज गृहित धरत सोयीसुविधांचे नियोजन करण्यात आले होते. प्रयागराजला भेट दिल्यानंतर तेथील गर्दीचा महापूर पाहता नाशिक सिंहस्थात दहा ते बारा कोटी भाविक येतील असा नवा अंदाज आहे.

सिंहस्थ कुंभमेळा

### ..तर संघर्ष अटळ

सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी जागा संपादन करण्याचे संकेत महापालिका प्रशासनाने दिले आहेत. मात्र जागा घ्या परंतु रोख मोबदला देण्याची मागणी शेतकऱ्यांची आहे. तर मोबदला नव्हे तर टीडीआर देऊ असा प्रस्ताव महापालिकेचा आहे. त्यामुळे जागा संपादित करण्याची वेळ आली तर या मुद्द्यावरुन शेतकरी व मनपा प्रशासन आमनेसामने येण्याची शक्यता आहे.

## संमेलन अध्यक्षपदी प्रवीण गायकवाड

**नाशिक : प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद आयोजित ३१ व्या अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रवीण गायकवाड यांची निवड झाली असल्याची माहिती साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांनी दिली. समता, बंधुता व एकात्मता ही मुल्ये केंद्रस्थानी मानून शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांने सामाजिक प्रबोधन व सामाजिक परिवर्तन या करिता प्रवीण गायकवाड गेली ३५ वर्षे कार्यरत आहेत. ९ व १० मे २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृह कराड या ठिकाणी हे संमेलन संपन्न होणार असून या संमेलनाचे उदघाटन खा. शरद पवार करणार आहेत. ग्रंथदिंडी, उदघाटन समारंभ, परिसंवाद, चर्चासत्र, कथाकथन, कविसंमेलन असा भरगच्च कार्यक्रम होणार असून या संमेलनात ९०० साहित्यिक उपस्थित राहणार आहेत. संमेलनाला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले.

# मनसेचे मनपासमोर घंटानाद आंदोलन

## प्रशासनाचे वेधले लक्ष; समस्या सोडविण्याची मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

**शहरातील नागरी समस्या सोडविण्यात याव्यात, या मागणीसाठी मनसेतर्फे काल राजीव गांधी भवन येथे घंटानाद आंदोलन करण्यात आले. आंदोलनानंतर शहरातील विविध समस्या सोडविण्याची मागणी करणारे निवेदन मनपा आयुक्त मनिषा खत्री यांना देण्यात आले.**

शहरातील नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत नागरी समस्यांनी त्रस्त आहेत. मनसेने यासंदर्भात वेळोवेळी निवेदन दिले होते. मात्र समस्या जैसे थे असल्याने अखेर मनसेने घंटानाद आंदोलन करत मनपा प्रशासनाचा निषेध केला.

शहरातील मुलभूत नागरी समस्या सोडविण्याबरोबरच कुंभमेळ्याचे नियोजन हे केवळ त्या काळापुरते न राहता, कायमस्वरूपी व दर्जेदार स्वरूपाचे असावे, अशी मागणी मनसेच्यावतीने करण्यात आली. मागण्या तातडीने मान्य



झाल्या नाहीत, तर मनसेकडून पुढील काळात जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा मनसेने दिला आहे.

याप्रसंगी प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, रतनकुमार इचम, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, जिल्हा उपाध्यक्ष नामदेव पाटील, संदीप किरवे, महिला सेना प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे, विभाग अध्यक्ष सत्यम खंडाळे, सचिन सिन्हा, धीरज भोसले, योगेश दाभाडे, प्रकाश बंटी कोरडे, प्रमोद साखरे, विजय रानाते, संदीप दोंदे, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष कौशल, रोहित उगावकर, सचिन रोजेकर, मिलिंद कांबळे, संतोष कोरडे, अतुल पाटील, विशाल भावले, विजय अहिरे, राकेश परदेशी, अर्जुन वेताळ, तालुकाध्यक्ष रामदास खैरनार, तुषार गांगुर्डे, शशी पाटील, नवनाथ कोठुळे, नितीन काळे, सुधाकर राऊत, खंडेराव मेढे, भूषण भुतडा, राहुल पाटील, नवनाथ जाधव, विनायक पगारे, मोकळ, प्रफुल बनबैरू, गोपी पगार, महिला सेना जिल्हाध्यक्ष ज्योती शिंदे, शहराध्यक्ष अर्चना जाधव, आरती खिराडकर, मीरा आवारे, गौरी सिन्नरकर, रवी खिलारे, मनोज सोनवणे, गणेश झोमन, कमलेश पाटील, दिनेश विश्वकर्मा उपस्थित होते.

### या प्रमुख मागण्या

■ गोदावरी, दारणा, नंदिनी व वालदेवी नद्यांचे प्रदूषणमुक्तीचे काम तातडीने सुरू करावे. ■ मनसेच्या सत्ताकाळातील प्रकल्प जनतेसाठी खुले करावेत. ■ सर्व रस्त्यांवरील खड्डे तातडीने दुरुस्त करावेत ■ पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आठ दिवसांत सोडवावा. ■ रस्ते, पाइपलाइन, ड्रेनेज, उद्याने या मूलभूत सुविधांना मंजुरी द्यावी. ■ सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतींसाठी सुविधा पुरवाव्यात. ■ सिंहस्थासाठी ५०० एकर जागा तातडीने निश्चित करावी.

# वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत १२ गरजूंना आर्थिक मदत

**नाशिक : प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी कार्यलयातील मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष कार्यान्वित होऊन एक महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला. महिनाभरात ९० नागरिकांनी वैद्यकीय सहायत्ता कक्षास भेट देत मदत मागीतली. त्यापैकी ६८ नागरिकांनी मोठ्या आजारासंबंधी मदतीसाठी चौकशी केली, त्यांची नोंद कक्षात करण्यात आली. त्यापैकी २५ प्रस्ताव मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष मुंबई येथे पाठवण्यात आले. त्यातील प्रस्तावाची छाननी करत महिनाभरात १२ नागरिकांना वैद्यकीय सहाय्यता कक्षामार्फत मदत मिळाली आहे.

गोरगरीब गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षातून थेट अर्थसहाय्य केले जाते. या योजनेमुळे रुग्णांचे प्राण वाचत असल्याने हा कक्ष आता राज्यातील प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू करण्यात आला आहे.

पूर्वी या कक्षाकडे अर्ज सादर करण्याबरोबरच पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अनेकदा मंत्रालयात हेलपाटे मारावे लागत होते. यादरम्यान होणारा त्रास लक्षात घेऊन ही सेवा सहज उपलब्ध व्हावी यासाठी हा कक्ष आता जिल्हास्तरावर सुरू झाला आहे.

> मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाला नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून दिवसाला चार ते पाच नागरिक चौकशीसाठी येतात. कक्षामार्फत माहिती मिळाल्यानंतर त्यांना वैद्यकीय सहाय्यतेसाठी प्रस्ताव तयार करण्यासाठी लागणर्या कागदपत्राची पूर्तता करणे सुखकर होते. गरजू नागरिकांना वैद्यकीय सहाय्यतेची गरज पडल्यास मुख्यमंत्री सहाय्यता कक्षामार्फत आवश्यक कागदपत्र असल्यास मदत देण्यात येते.
> – **डॉ. चैतन्य बैरागी,** (मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रमुख)

> जिल्हाधिकारी कार्यालयात सुरू करण्यात आलेल्या कक्षाची मला चांगली मदत झाली. मी मनमाडवरून चौकशीसाठी आलो होतो. मला कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सर्व माहिती समजून सांगितली. गरजू नागरिकांसाठी हा कक्ष अत्यंत उपयोगी ठरत आहे.
> – **धनंजय आंधळे,** (नागरिक)



## मनपाच्या पंचक शाळेचा दिल्लीमध्ये गौरव

**नाशिक : प्रतिनिधी**

दिल्लीत राष्ट्रीय स्तरावरील झालेल्या शैक्षणिक परिषदेत नाशिक महानगरपालिकेच्या जेलरोड येथील पंचक शाळा क्र.४९ चा गौरव करण्यात आला.

जिल्ह्यातून पंचक शाळेच्या शिक्षिका संगीता आढाव यांना संस्थेच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती वासुदेवन यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थ्यांना गणित विषयाची गोडी लागावी याकरिता सदर शैक्षणिक उपक्रम राबवला जातो आहे. दिल्ली येथे राष्ट्रीय स्तरावर आयोजित पहिल्या शिक्षण परिषदेमध्ये देशभरातून १०० शिक्षकांना निमंत्रित करण्यात आले होते. महाराष्ट्रामधून १० शिक्षकांना निमंत्रित करण्यात आले होते. नाशिक जिल्ह्यातून संगीता आढाव यांना निमंत्रित करण्यात आले. मनपा शाळा क्रमांक ४९ पंचक राज्य मॉडेल स्कूलमध्ये कार्यरत आहे. शिक्षण क्षेत्रात जागतिक स्तरावर कार्यरत एससीईआरटी संलग्न खान अकॅडमी च्या सहकार्याने महाराष्ट्रातील ४८८ मॉडेल स्कूलमध्ये गणित उपक्रम सुरू आहे. विद्यार्थ्यांना गणित विषयाची गोडी लागली आहे. इयत्ता सहावीतील विद्यार्थ्यांनी प्लॅटफॉर्ममध्ये ठेवलेले सातत्य व पालकांचा सहकार्यामुळे सहकारी शिक्षकांच्या मदतीने केंद्रप्रमुख गोपाल बैरागी व मुख्याध्यापक दत्तात्रय सूर्यवंशी यांच्या सहकार्याने उपक्रम यशस्वीपणे राबविला. एससीई आरटी व खान अकॅडमी यांच्या संयुक्तपणे सुरू असलेला गणित विषयाचा प्लॅटफॉर्म इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत आहे. गणित हा विषय विद्यार्थ्यांसाठी कठीण व नावडता विषय आहे. मात्र खान अकॅडमीचे प्लॅटफॉर्म मधून विद्यार्थ्यांना गणिताची गोडी निर्माण झाली. शालेय स्तरावर शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून उत्कृष्ट व प्रभावी उपक्रम राबविला गेला.


# वनराईतील 'कमळ बाग' फुलली!

## वसुंधरा दिन: पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने पाऊल

**नाशिक : प्रतिनिधी**

**जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधत नाशिकच्या वनराई येथे वसलेली 'कमळ बाग' यंदा आपल्या स्थापनेच्या तिसऱ्या वर्षात पदार्पण करत आहे. पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक आगळावेगळे पाऊल म्हणून उभा राहिलेला हा प्रकल्प आज विविध रंगछटांच्या आणि सुगंधी कमळांनी बहरलेला आहे.**

या बागेमध्ये सध्या १५१ कमळ कुंड आहेत. त्यामध्ये अनेक प्रकारची कमळे व कुमुदिनी फुललेली दिसतात. बागेचे मुख्य आकर्षण म्हणजे सहस्त्रदल कमळ, ज्याला पाहण्यासाठी दूरदूरवरून कमळप्रेमी येथे येतात. कुमुदिनींमुळे परिसरातील मधमाशांची संख्या वाढली असून, काही पक्ष्यांनी तर कमळाच्या पानांत घरटी देखील तयार केली आहेत. ही बाग पर्यावरणासाठी उपयुक्त ठरत आहे आणि जैवविविधतेला प्रोत्साहन देत आहे. शंभरहून अधिक देणगीदारांनी कमळ कुंड दत्तक घेतले आहेत. नाशिकसह दापोली, कोल्हापूर, रत्नागिरी, सटाणा, मुंबई, बंगळुरू येथील निसर्गप्रेमींनी देखील या उपक्रमात सहभाग नोंदवला आहे. अनेकांनी आपल्या कुटुंब, संस्था किंवा प्रियजनांच्या स्मरणार्थ कुंड दत्तक घेतले असून, त्यावर त्यांची नावे लिहिण्यात आली आहेत. 'आपलं पर्यावरण संस्था'च्या वतीने अनेक कमळप्रेमींना मोफत कमळ काकडी व कुमुदिनीचे कंद लागवडीसाठी वितरित करण्यात आले आहेत. बागेमध्ये कमळ व कुमुदिनी यामधील फरक स्पष्ट करून देणारे माहितीफलकही लावलेले आहेत.



> कमळाचे औषधी व पौष्टिक महत्त्व अधोरेखित करत, आयुर्वेदात त्याचा वापर औषधनिर्मितीत होतो. तसेच, कमळाच्या विविध भागांपासून बनवले जाणारे खाद्यपदार्थ हे चवदार व आरोग्यदायी मानले जातात. कमळ बागेस भेट देण्यासाठी पूर्वपरवानगी आवश्यक आहे.
> – **शेखर गायकवाड,** आपलं पर्यावरण संस्था



अग्रलेख

# गरिबांचा कैवारी

प्रेषित येशू ख्रिस्ताला सुळावर दिल्याचा शुक्रवार हा दिवस एक दु:खद दिवस मानला जातो. या दिवसाला गूड फ्रायडे म्हणतात. सुळावर दिल्यानंतर तीन दिवसांनी म्हणजे रविवारी येशू ख्रिस्त मृतावस्थेतून पुन्हा जिवंत झाले. या दिवसाला ईस्टर सण्डे म्हणतात. हा दिवस पवित्र, आनंदाचा, उत्साहाचा मानला जातो. आजारी असतानाही याच दिवशी रोमन कॅथॉलिक चर्चचे पोप फ्रान्सिस यांनी सार्वजनिक दर्शन दिले. सेंट पीटर चौकात जमलेल्या जवळपास ३५ हजार लोकांच्या गर्दीचे त्यांनी अभिवादन स्वीकारले. यानंतर दुसर्याच दिवशी त्यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी निधन झाले. आपले आयुष्य ईश्वराच्या सेवेसाठी, रोम येथील चर्चसाठी, गरिबांसाठी, शांततेसाठी समर्पित करणारे पोप फ्रान्सिस यांच्या निधनाबद्दल जगभरात शोक व्यक्त केला जात आहे. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते. त्यांच्या दोन्ही फुफ्फुसांमध्ये न्यूमोनियाचा संसर्ग झाला होता. फेब्रुवारी महिन्यात रोम येथील एका रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. त्यावेळी त्यांची प्रकृती आधी ढासळली होती. नंतर हळूहळू सुधारली होती. त्यांना रुग्णालयातून डिस्चार्जही देण्यात आला होता. प्रकृती बरी नसल्याने ईस्टर सण्डेला लोकांना दर्शन देतील आणि संवाद साधतील, अशी काही अपेक्षा नव्हती. प्रकृती अस्वस्थ असल्याने पोप फ्रान्सिस यांनी ईस्ट मासमध्ये सहभाग घेतला नाही. पण त्यांनी लहान मुलांना आशीर्वाद दिले. पोप या नात्याने धर्माचा संदेश देण्याचे कर्तव्य म्हणून बंधूंनो आणि भगिनींनो, असा उच्चार करत त्यांनी तुम्हाला ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या. आपल्या छोटेखानी भाषणात सगळ्या जगाचे हित व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करताना युक्रेन, गाझा, कांगो, म्यानमार यांसह जिथे जिथे संघर्ष सुरु आहे तिथे शांतता प्रस्थापित व्हावी यासाठी प्रार्थना केली. ज्या ज्या ठिकाणी युद्ध सुरु आहे त्यांनी त्या युद्धांना विराम द्यावा, बंधकांना सोडावे आणि शांततेच्या भविष्याकडे वाटचाल करावी, उपासमारीने झगडणाऱ्या लोकांना मदत करावी, समाजातील उपेक्षित घटकांचे कल्याण करावे, त्यांच्याबाबत सहानुभूती बाळगावी. आपण सगळे एकाच ईश्वराची लेकरं आहोत यावर विश्वास ठेवा आणि देवावरचा आपला विश्वास दृढ करा. असा आशय असलेला संदेश त्यांनी जमलेल्या लोकांसमोर दिला. जगाची, गरिबांची चिंता त्यांना असल्याचे याच भाषणातून दिसून येते. त्यांनी सुरुवातीपासूनच याच विषयावर भर दिला असल्याचे दिसून येते. रोमन कॅथोलिक चर्चचे ते पहिले लॅटिन अमेरिकन धर्मगुरू होते. त्यांचा जन्म अर्जेंटिनातील ब्युनोस आयर्स येथे १९३६ साली झाला. कार्डिनल जॉर्ज मारियो बर्गोग्लिओ हे त्यांचे मूळ नाव होते. वडील एक इटालियन स्थलांतरित रेल्वे कामगार होते, तर आई गृहिणी होती. तरुण असतानाच त्याच्या फुफ्फुसाला बाधा झाली. त्यावेळी त्यांचे एक फुफ्फुस काढण्यात आले. त्यांनी अनेक लहानसहान हलकी कामे केली. रसायनशास्त्र या विषयाचा अभ्यासही त्यांनी केला. वयाच्या ३२ व्या वर्षी त्यांचा धर्मोपदेशक म्हणून त्यांचा बाप्तिस्मा झाल्यानंतर ब्युनोस आयर्समधील गलिच्छ वस्त्यांमध्ये जाऊन त्यांनी गरिबांची सेवा केली, त्यांची काळजी घेतली. एक धर्मोपदेशक म्हणून हेच कार्य त्यांच्या जीवनाचे एक वैशिष्ट्य ठरले. शेवटपर्यंत त्यांनी गरिबांची सेवा करण्यावर भर दिला. हाच संदर्भ फ्रान्सचे राष्ट्रपती इमॅन्युएल मॅँक्रो यांनी शोक व्यक्त करताना दिला. ब्युनोस आयर्सपासून रोमपर्यंत, चर्चने गरिबांसाठी आनंद आणि आशा, अपेक्षा घेऊन यावे, अशी पोप फ्रान्सिस यांची इच्छा होती. मानवजातीमध्ये आणि निसर्गाशी एकता निर्माण करावी. ही आशा त्यांच्या पलीकडेही सतत पुनरुज्जीवित होत राहो, असे म्हणत मॅँक्रो यांनी शोक व्यक्त केला. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही हाच संदर्भ देत शोक व्यक्त केला. पोप फ्रान्सिस हे जगभरातील कोट्यवधी लोकांसाठी करुणा, विनम्रता आणि आध्यात्मिक धैर्याचे प्रतिक म्हणून सदैव स्मरणात राहतील. लहानपणापासूनच ते प्रभू येशू ख्रिस्तांच्या आदर्शांचा पाठपुरावा करत जीवन जगले. त्यांनी गरिबांच्या, उपेक्षितांच्या सेवेसाठी आपले संपूर्ण जीवन वाहून घेतले, असे मोदी यांनी म्हटले. पोप फ्रान्सिस एक परिवर्तनवादी होते. धर्मगुरू असूनही त्यांनी परंपरेला छेद देत चर्चच्या व्यवस्थापनात बदल घडवून आणले. कार्डिनल जॉर्ज मारियो बर्गोग्लिओ यांची २०१३ मध्ये बेनेडिक्ट सोळावे यांचे उत्तराधिकारी म्हणून निवड झाली. त्यांनी फ्रान्सिस हे नाव स्वतःहून घेतले. युरोपबाहेरील पहिले पोप म्हणून त्यांची निवड झाली तेव्हा सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला होता. चर्च हे गरिबांचे व्हावे, असे त्यांना वाटत होते. जे उपेक्षित आहेत, त्यांचा चर्चमध्ये समावेश व्हावा, ही त्यांची धारणा होती. पोप झाल्यानंतर अलिशान पपल (पोप यांचे राहण्याचे ठिकाण) अपार्टमेंट्समध्ये राहण्याऐवजी त्यांनी सांता मार्ता येथील एका लहानशा हॉटेलमध्ये राहण्याचा निर्णय घेतला. या ठिकाणी अभ्यागत धर्मोपदेशकांचा नेहमीच राबता असतो. आपली बॅग आपणच घेऊन ते रोमच्या रस्त्यांवरुन चालत गेले आणि स्वत:चा चष्मा स्वतःच विकत घेतला. जगातील लोकप्रिय आम नेत्यांपैकी एक नेते ते बनले. ते जगातील मूक लोकांसाठी ते सतत बोलत राहिले. बेघर लोकांसमवेत त्यांनी जेवण केले. कैद्यांचे पाय धुतले. युध्द किंवा आर्थिक अस्थिरतेने पळून आलेल्या स्थलांतरितांसाठी इटलीत त्यांनी घरांची सोय केली. चंगळवाद आणि व्यक्तीवादाला विरोध केला. अनुचित आर्थिक संरचना ही मानवी हक्कांचे उल्लंघन करणारी आहे, असे स्पष्ट मत त्यांनी मांडले. हवामान बदलाचा सामना करण्यासाठी पावले उचलावीत म्हणून सार्वजनिक वितरणासाठी त्यांनी जगभरातील कॅथॉलिक नेत्यांना एक औपचारिक पत्रही लिहिले होते. चर्चच्या केंद्रीय प्रशासनात त्यांनी सुधारणा घडवून आणली. चर्चचे अधिकारी आणि बिशप यांच्यासाठी राखीव असलेल्या व्हॅटिकनच्या कार्यालयांत आणि ठिकाणांवर महिला व पुरुषांना वावर करण्यास त्यांनी परवानगी दिली. जगभरात कोरोनाची लाट आली असतानाही त्यांनी सार्वजनिक प्रार्थनांमध्ये खंड पडू दिला नाही. अर्थात, लोकांना जमण्यास बंदी होती. रिकाम्या सेंट पीटर्स चौकात 'द पिपल्स पोप' संदेश द्यायला जायचे. कोरोना लस घेतल्यानंतर त्यांनी आपला वेळ वाया घालविला नाही. मोठी सुरक्षा जोखीम पत्करून ते इराकला गेले. इराकमधील मोसूल शहरात एकदा इसिसच्या दहशतवाद्यांनी चर्चेसची लुटमार केली होती. त्यांच्यासाठी पोप फ्रान्सिस यांनी प्रार्थना केली. इराकला भेट देणारे ते पहिले पोप ठरले. मूल्य, धैर्य, करुणा आणि प्रेम शिकवणारे पोप फ्रान्सिस काळाच्या पडद्याआड गेले.

# महाराष्ट्रात हिंदी सक्तीमागची कुटनीती...

केंद्राच्या नव्या शैक्षणिक धोरणातील हिंदी भाषा सक्तीने महाराष्ट्रातील वातावरण ढवळून निघालै आहे. राज्यातील महत्वाच्या प्रश्नांच्या सोडवण्यातील अडचणींना तोंड देता देता युती सरकारने विद्यार्थ्यांवर हिंदी सक्तीची तलवार उगारली आहे. केंद्राने कोणताही निर्णय घेतला की त्या निर्णयाचा अंमल करण्यासाठी देशातील काही ठराविक राज्यांवर समर्थनाची सक्ती असते. महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, उत्तरप्रदेश, बिहार अशा राज्यांनी निर्णयाचा अंमल आधी करायचा. या राज्यांना केंद्राने घेतलेल्या निर्णयाला विरोध करण्याचा अधिकार भाजप शासनप्रक्रियेने केव्हाच गुंडाळला आहे. निर्णय काहीही असो त्याची अंमलबजावणी केलीच पाहिजे, अशी केंद्राची या राज्यांविषयीची मानसिकता आहे. मोदींच्या सरकारने घेतलेल्या निर्णयांना विरोध करण्याची हिंमत भाजपच्या एकाही राज्यात नाही. ती महाराष्ट्राकडे असणे तर कदापि शक्य नाही. हिंदी सक्तीचा निर्णय याच प्रकारचा आहे. विरोध मोडून टाकण्यासाठी सरकारने संघटनांच्या गळी जनसुरक्षा नावाचे विधेयक आणलेच आहे. सरकारी निर्णयाला विरोध दर्शवल्यास त्याचे परिणाम अशी विधेयके आणून दाखवला जातो. यामुळे सरकारच्या निर्णयाची निमूट अंमलबजावणी करता येईल, असे राज्यकर्त्यांना वाटत असावे. महाराष्ट्र, गुजरातप्रमाणे दक्षिणेकडील राज्यांबरोबरच पंजाब, हरियाणा, प. बंगाल सारख्या राज्यांवर असा निर्णय लादणे कधीच शक्य नसते. भाजपेतर शासन असल्याने आणि मातृभाषेविषयी असलेल्या प्रेमापोटी भाषा सक्तीच्या निर्णयांचा अंमल करण्यात ही राज्य करूच शकत नाहीत. ही राज्ये केंद्राच्या निर्णयाची चिकित्सा करतात. या चिकित्सेने निर्णयात राजकारण नसल्याचे दाखवून दिले तरच निर्णय कृतीत उतरवला जातो. अन्यथा नाही.

हिंदी भाषा सक्तीची करताना राज्य सरकारने सारासार विचार करण्याची आवश्यकता होती. मराठी ही मातृभाषाच जिथे सक्तीने शिकवली जात नाही, तिथे विद्यार्थ्यांच्या डोक्यावर हिंदी भाषेची सक्ती करून सरकारने आगीत तेल ओतले आहे. राज्याच्या अनेक वर्षांच्या मागणीनंतर मराठीला अभिजात भाषेच्या दर्जा देण्याच्या केंद्राच्या निर्णयानंतर मराठीला चांगले दिवस येतील, असे वाटत असताना नव्या हिंदीच्या सक्तीला निमंत्रण देऊन सरकारनेच अभिजात व्याख्येला फाटा दिला आहे. महाराष्ट्रात राहणाऱ्या हिंदी भाषिकांची संख्या अगणित आहे. उत्तरप्रदेश, बिहार ही राज्य प्रामुख्याने हिंदी भाषिक गणली जातात. वर्षो न्वर्षं महाराष्ट्रात राहणाऱ्या या पट्टयातील १० टक्के लोकांनाही धड मराठी बोलता येत नाही. यात अधिकतर जाणीवपूर्वक मराठी बोलणे टाळणारे आहेत. या मराठी द्वेष्टांमुळे अनेकदा वाद उत्पन्न होतात. तेव्हा मराठीचा आग्रह धरणाऱ्यांविरोधातच कारवाईचा बडगा उगारला जातो. सरकारच्या या धोरणामुळेच मराठीला विरोध करणारे आजकाल रस्त्यावर उचलण्यासही मागेपुढे पाहत नाहीत. 'आम्ही मराठी बोलणार नाही', अशी खुलेआम मोहीम मुंबईसारख्या नगरात हाती घेतली जात असताना राज्य सरकार त्याची जराही दखल घेत नाही, ही मराठीची शोकांतिका आहे. असं असताना आता नव्याने हिंदी भाषा सक्तीची करून या मंडळींच्या हाती नवं कोलीत देण्याचे काम फडणवीस सरकारने केले आहे. अभिजात भाषेचा दर्जा आपल्या सरकारने दिल्याची पाठ स्वत:च पिटणाऱ्यांना मराठी प्रेम किती तकलादू आहे, हे लक्षात यायला वेळ लागत नाही.



शिक्षणाची सर्वाधिक आवडती भाषा म्हणून मातृभाषेला तज्ज्ञांनी सर्वाधिक पसंती दिली आहे. मातृभाषेशिवाय व्यवहारात वापरायच्या भाषेची निकड जरूर आहे. इंग्रजी भाषेचा अंगिकार करून महाराष्ट्राने ते पाऊल उचलले आहे. अभ्यासक्रमात दोन भाषा सक्तीच्या असूनही नव्याने हिंदीचा वापर करण्याची हाकाटी सरकार का देत आहे, हा प्रश्न आहेच. आपले म्हणणं रेटण्यासाठी हिंदी ही राष्ट्रभाषा असल्याचं सांगायला सरकारी पक्षाचे नेते कमी करत नाहीत. वास्तवात हिंदी

**प्रवीण पुरो**

ही राष्ट्रभाषा नाही. उत्तरेकडील अधिकतर देशवासी या भाषेचा वापर करत असले तरी देशभर ती सर्रास वापरली जाते असे म्हणता येत नाही. महाराष्ट्र तिचा आवश्यकतेने वापर करत असताना ती सक्तीची करण्यामागचा हेतू अस्पष्ट आहे. राज्यातील व्यवहारात मराठी ऐवजी हिंदीचा वापर सर्रास होत असतो. इथे राहणाऱ्या परप्रांतियांमध्ये मराठीविषयीचं प्रेम वाढावे, असा एकही प्रयत्न सरकारने केला नाही. उलट मराठीची गळचेपी होईल, असे निर्णय घेत राज्यातल्या सरकारने आपले अकलन दिल्ली सरकारच्या पायावर टाकले आहे. आधीच मराठीची ओरड, त्यात हिंदी सक्तीने शिकवण्याचा प्रयत्न झाल्यास मराठी न येणारे अधिकारात हिंदीची भलामण करणार हे ओघानेच आलं.

देशात एक संपर्क भाषा असावी या भाजपच्या धोरणाची री ओढताना मुख्यमंत्र्यांनी हिंदीची गरज पुढे केली आहे. राष्ट्रीय एकात्मता असे गोंडस नावही त्यांनी या धोरणाला दिले आहे. अशा भाषावार एकात्मतेची ओळख दक्षिणेकडल्या राज्यांनी या आधीच करून दिली आहे. केरळ, कर्नाटक, तामीळनाडू, आंध्रप्रदेश या राज्यांमध्ये स्थानिक भाषेला अगणित महत्त्व आहे. म्हणून तिथे व्यवहार रसातळाला गेले नाहीत. या राज्यांवर हिंदीचे अनेक प्रयोग केंद्राने याआधीही करून पाहिले. पण ते अंमलात आणता आले नाहीत. सत्ता कोणाचीही असो या राज्यातल्या आमदार, खासदारांनी सर्वाधिक महत्व स्थानिक भाषेला दिलेले दिसते. आपल्या आमदार आणि खासदारांना मराठीचे फारसे पडलेले नाही, असंच चित्र दिल्ली आणि महाराष्ट्रात दिसत आहे. शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार करण्यात महाराष्ट्रासारखी दरिद्री अवस्था इतर कुठल्या राज्यात असेल असं वाटत नाही. आधीच व्यवसायिक शिक्षणाचा वनवा. तिथे तिसऱ्या भाषेची सक्ती केली तर नैराश्य अधिकच वाढायचं. मराठी भाषेच्या शाळा चालवणं आजकाल किती कठीण बनलंय, हे या शाळा संचलन करणारेच सांगू शकतात. ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांचा टक्का सातत्याने घसरत असल्याने या शाळा बंद करण्याची टूम गेल्या १० वर्षांपासून सुरू आहे. एक शिक्षकी शाळा हा प्रयोग तर केव्हाच गुंडाळला गेला आहे. यातून खाजगी शाळांचं पेव वाढलं. मोफत शिक्षणाची कास निकालात निघाली. त्यात शिक्षक भरती हा विषयच सरकारच्या हाताबाहेर गेलेला. खाजगी शाळांमध्ये १० वी, १२ वी झालेल्यांकडून बिनधास्त धडे शिकवले जात आहेत. शिक्षण अधिकाऱ्याकडे तक्रार करण्याची हिंमत पालक दाखवू शकत नाहीत. तिथे मिळणारं उत्तर एकतर गोलमाल असतं आणि उत्तर मिळालंच तरी कारवाईचा पत्ता नसतो. अशा विचित्र कात्रित सापडलेल्या राज्यात शिक्षणाचे तेरा वाजलेच आहेत. राज्यातल्या शिक्षणाच्या या अवस्थेकडे पाहून शिक्षण तज्ज्ञ असलेले सुकाणू समितीचे सदस्य रमेश पानसे यांनी सरकारच्या या धोरणाला स्पष्ट विरोध दर्शवला. सक्तीच्या हिंदी शिकवण्याचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी त्यांनी लावून धरली आहे. केंद्राच्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठीच्या सुकाणू समितीचा विरोध डावलून राज्याने खरंतर असा निर्णय घेणं उचित नाही. मात्र सरकारमध्ये अनेकजण स्वयंघोषित तज्ज्ञ असल्याने खऱ्या तज्ज्ञांच्या ज्ञानाला त्यांच्या दरबारी किंमत नाही. सुकाणू समितीला डावलून कोणताही निर्णय होणार नाही, असं धोरण जाहीर करताना सरकारने स्पष्ट करूनही समितीला न विचारताच हा निर्णय अंमलात आणला जात असल्याने सरकार आता जनतेलाही गृहित धरू लागल्याचं स्पष्ट दिसतं. मराठीचं प्रेम असणाऱ्यांची राज्य सरकारमधल्या मंत्र्यांची संख्या आणि सरकारमधल्या प्रमुख भाजपतल्या नेत्यांची संख्या लक्षात घेता मराठीचं महत्व कमी करण्यासाठीच हा निर्णय घेतला जात असल्याचा आरोप होतोय, तो अगदीच चुकीचा नाही. बिहार राज्यातील विधासनभा आणि मुंबईसह राज्यातील महानगरपालिकेच्या निवडणुका डोळ्यासमोर धरून राज्य सरकार हा घातक निर्णय घेत असल्याचा उघड आरोप होतो आहे. मराठी मतांसाठी राज्याची मातृभाषा दावणीला लावत असतील तर अशा सत्ताधाऱ्यांची करावी तितकी निर्भत्सना कमीच...

# पृथ्वी विनाशाच्या उंबरठ्यावर!

सध्या सूर्य प्रचंड आग ओकत आहे. अंगाची लाहीलाही होत आहे. हे सर्व केवळ माणूस नावाच्या प्राण्यामुळे. पृथ्वीचे तापमान दिवसेंदिवस वाढत आहे. पृथ्वीवर जिथे जिथे माणसांचा संचार वाढला आहे तिथे तिथे घाणीचे साम्राज्य पसरले आहे, झाडांची बेसुमार कत्तल झाली आहे आणि सिमेंटचे जंगल वाढले आहे. म्हणून एकेकाळी विविधतेने व हिरवळीने नटलेली सुंदर पृथ्वी म्हणजे आपली वसुंधरा आज विनाशाच्या उंबरठ्यावर आहे. २२ एप्रिल हा दिवस जगभर जागतिक वसुंधरा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने आपण सर्वांनी आपली पृथ्वी ओसाड, रखरखीत व कुरूप होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे.

एकेकाळी झाडे, लतावेली व हिरवळीने नटलेली पृथ्वी किती सुंदर आणि मनमोहक दिसायची. जिकडे तिकडे झाडांची गर्दीच गर्दी होती. जंगलाचे प्रमाण संतुलित होते. जंगलात पशुपक्षांची गर्दीच गर्दी होती. सजीवसृष्टी नेहमी हिरवीगार आणि फलाफळांनी बहरलेली होती. पक्षांचा मंजूळ किलबिलाट, वाऱ्याची झुळूक आणि मुसळधार पाऊस यांनी पृथ्वीचे रूप नेहमी सुंदरतेने ओतप्रोत भरलेले दिसायचे. नद्या नेहमी स्वच्छ व नितळ पाण्याने भरलेल्या असायच्या. अगदी लहान गावे, खेडी, वाडी, तांडे झाडांच्या गर्दीत लपलेले दिसायचे. जिकडे तिकडे कसे मनमोहक व आल्हाददायक असे पृथ्वीचे रूप पाहून मनाची तृप्ती होत असे. परंतु, माणूस नावाच्या प्राण्यांची नियत बदलली. त्याने कारखाने, बंगले उभे करण्यासाठी, रस्ते व रेल्वे मार्गाचे जाळे पसरवण्यासाठी झाडांची बेसुमार कत्तल सुरू केली आणि इथूनच पृथ्वीच्या विनाशाचा मार्ग सुरू झाला.

देशाची राजधानी दिल्लीमध्ये प्रदुषणाचा बोलबाला वाढला आहे.

**बबन गुळवे**
९५४५४४२६४८

इथली हवा अतिशय दुषीत आहे. इथे शुद्ध ऑक्सिजन मिळणे कठीण झाले आहे. मुंबई महाराष्ट्राची राजधानी व देशाची आर्थिक राजधानी आहे. लोकल रेल्वेने प्रवास करताना पाहिले असता रेल्वे रुळावर व कडेला कचरा व घाण साचलेले दिसतात. मुंबई लगतचा अरबी समुद्र फार प्रदुषित झाला आहे. त्याच्या पाण्यावर जिकडे तिकडे कचरा पसरलेला दिसतो. महाराष्ट्रातील जवळ जवळ सर्वच शहरांमध्ये जागोजागी कचऱ्याचे ढीग साचलेले दिसतात. बहुतांश शहरात अगदी दर्शनीय ठिकाणी घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसते. खूप मोठ्या संख्येने असलेले कारखाने हवा प्रदूषित करत आहेत तसेच जलप्रदूषण वाढवत आहेत. शहरांच्या बाहेर कचऱ्याचे ढीग उघड्यावर टाकलेले दिसतात, कचरा जाळून प्रदुषण वाढवले जाते. बऱ्याच गावांमध्ये घरी शौचालय असूनही त्याचा वापर न करता सरळ उघड्यावर जाऊन गाव परिसरात घाणीचे साम्राज्य पसरवले जाते. ही सगळी कृपा मानवाच्या निष्काळजी पणाची आणि चलता है या वाईट वृत्तीची आहे. हिरव्यागार झाडीत लपलेली गावे आता ओसाड, उजाड झाली आहेत आणि सिमेंटच्या जंगलात होरपळून निघत आहेत. झाडांची संख्या कमी झाल्याने जमिनीची धूप वाढली आहे. पाऊस बेभरवशाचा झाला आहे. एक तर कोरडा दुष्काळ पडतो नाही तर ढगफुटी होऊन शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते, जीवीतहानी सुध्दा होते. म्हणजे गरजेपोटी नव्हे तर चंगळवादी जीवनासाठी माणसाने पृथ्वीला विनाशाच्या खाईत लोटले आहे.

या पृथ्वीवर माणसांचा संचार जेथे जेथे होत आहे तेथे तेथे घाणीचे साम्राज्य पसरलेले दिसत आहे. केवळ माणूस नावाच्या प्राण्यामुळे पृथ्वी प्रदुषणाच्या विळख्यात अडकली आहे. माती, पाणी आणि हवा मोठ्या प्रमाणात प्रदूषित झाले आहेत. यावर उपाययोजना फक्त सरकारी यंत्रणेने करावी, आम्ही नागरिक मात्र प्रदुषण करत राहू अशी मानसिकता झाली आहे. जे झाले ते पुरे झाले. स्वत:च्या पायावर धोंडा मारुन घेण्यापेक्षा प्रत्येकाने सावध होण्याची गरज आहे. पर्यावरणप्रेमी बनून आपल्या सुंदर व हरित पृथ्वीला नष्ट होण्यापासून वाचवण्याची खरी गरज आहे. चला सजग होऊया, पर्यावरण रक्षक बनून पुन्हा एकदा आपल्या लाडक्या पृथ्वीला सृष्टी सौंदर्याने नटवूया!

# ही तर मराठी मनाची भावना

जून १९६६ मधे बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेन स्थापना केली तीच मुळात मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आणि लढण्यासाठी. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण करण्याऱ्या शिवसेनेकडे अनेक मराठी आकर्षित झाले, अनेक पिढ्या शिवसेनेशी आणि ठाकरे घराण्याशी जोडल्या गेल्या आणि शिवसेना ही एक शक्ती बनली. मात्र गेल्या काही वर्षांपासून शिवसेनेला काहीसे ग्रहण लागले, शिवसेनेत छगन भुजबळ यांच्या रूपाने पहिली मोठी फुट पडली.कालांतराने नारायण राणे बाहेर पडले आणि २००५ साली खुद्द राज ठाकरे यांनी शिवसेनेमधून बाहेर पडत महाराष्ट्र नवनिर्माण करण्यासाठी वेगळी वाट निवडली. वास्तविक राज ठाकरे हेच खऱ्याअर्थाने बाळासाहेब ठाकरे यांचे राजकीय वारसदार आहेत.ठाकरे बंधूच्या वाटा वेगळ्या झाल्या हे मात्र मराठी मनाला रूचले नाही. राज ठाकरे यांनी २००९ च्या निवडणुकीत तब्बल १३ आमदार निवडून आणले, नाशिक महापालिकेत सत्ता मिळवली, मुंबई, पुणे महानगरपालिकेत दखल घेण्याइतके नगरसेवक निवडून आणले तर ऊद्धव ठाकरे यांनी देखील आमदार, खासदार निवडून आणत मुंबई महानगरपालिकेत सत्ता राखली. मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी ठाकरे बंधूच्या सेनेचाच मोठा आधार आहे हे अनेकदा अधोरेखित झाले आहे. महाशक्ती आणि इतर राष्ट्रीय पक्षांनी दोन्ही ठाकरे बंधूंचा केवळ वापरच करुन घेतला. या सगळ्यांत मनसेच्या ईंजिनाचा प्रवासच खुंटला तर २०२२ साली एकनाथ शिंदे यांना हाताशी धरून महाशक्ती ने ठाकरे यांच्या शिवसेनेवर निर्णायक प्रहार केला.

**अनंत बोरसे**
शहापूर, जिल्हा ठाणे

ऐवढेच नव्हे यंत्रणांना हाताशी धरत मुळ शिवसेना पक्ष एकनाथ शिंदे यांच्या हाती सोपवला. मात्र मराठी माणसाला हे कसे पटेल. यामुळेच दोन्ही ठाकरे बंधुनी एकत्र यावे आणि मराठी माणसासाठी लढावे, ही मराठी जनांची इच्छा होती आणि आजही आहे. दोन्ही बंधूमध्ये सलोखा करण्याचे अनेक प्रयत्न झाले. आता ऊद्धव ठाकरे हे मविआ आघाडीत तर राज ठाकरे हे कुठल्याच युतीत नसले तरी त्यांचा जवळीक महायुतीला भाजप आणि शिंदे सेनेची आहे. मात्र गेल्या विधानसभा निवडणुकीत माहिमध्ये शिंदे सेनेच्या अट्टाहासापायी अमित ठाकरे यांचा पराभव झाला आणि राज ठाकरे सावध झाले. महायुतीत अधिकृतपणे त्यांना प्रवेश मिळणे शक्य नाही. गेल्या काही दिवसांपासून मुंबईत मराठी माणूस विरूद्ध इतर धर्मिय वाद वाढतो आहे. अशावेळी दोन्ही ठाकरे बंधुनी एकत्र येऊन पुन्हा शिवसेनेची ऊभारणी करावी, अशी सर्वसामान्य मराठी मनाची इच्छा आहे. परंतु ठाकरे बंधू एकत्र येणे वाटते तितके सोपे नाही. विठ्ठलाला बडव्यांनी घेरले आहे, असा आरोप करत राज ठाकरे बाहेर पडले होते. आता एकत्र आले तर बडव्यांपासून विठ्ठल मुक्त कसे करणार आणि ऐकमेकांशी जुळवून घेतांना मनसैनिक-शिवसैनिक यांचे मनोमिलन कितपत होणार? त्याच बरोबर ठाकरे बंधू एकत्र येतांना मविआबाबत ऊद्धव ठाकरे यांना तर महायुती आणि भाजपच्या जवळीबाबत राज ठाकरे यांना निर्णय घ्यावा लागणार तो वाटतो तितका सोपा नाही. ठाकरे बंधूच्या एकत्र येण्याची नुसती चर्चा होताच अनेक पक्षात चलबिचल सुरू झाली आहे. कोणी मानभावीपणे प्रतिक्रिया देत आहेत तर कोणी मौन बाळगून आहे. राष्ट्रीय पक्षांनी मराठी संघटनांचा केवळ वापर करून घेतला आहे. म्हणूनच ठाकरे बंधूचे मनोमिलन व्हावे ही मराठी जनाची भावना आहे. मुंबई, नाशिक, ठाणे तसेच राज्यातील अनेक महानगरपालिकेच्या निवडणुका केव्हाही घोषित होऊ शकतात. या चिमण्यांनो परत फिरा रे अशी साद सोडून गेलेल्या शिवसैनिकांना घातली तर अनेकांची घरवापसी होईल आणि एकसंघ शिवसेनेला नक्कीच अच्छेदिन येतील.

# चला, अक्षय ऊर्जा स्रोतांकडे वळुया

पृथ्वीच्या अमूल्य परिसंस्थेचे आणि मानवजातीशी असलेल्या तिच्या अतूट संबंधांचे रक्षण करण्यासाठी जगभरात अनेक जागरूकता मोहिमा आणि उपक्रम राबविले जातात. या अनुषंगाने गेल्या ५५ वर्षांपासून दरवर्षी २२ एप्रिल रोजी जागतिक वसुंधरा (पृथ्वी) दिन साजरा केला जातो. पृथ्वीच्या पर्यावरणरक्षणाची जाणीव करून देण्याच्या उद्देशाने अमेरिकेच्या सेनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल १९७० रोजी अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. त्यानंतर आता जगातील १७५ देशात हा वसुंधरा दिन पाळला जातो.

या वर्षी, म्हणजे २०२५ साली जागतिक वसुंधरा दिनाची थीम आपली शक्ती, आपला ग्रह अशी असून सर्वांनी अक्षय ऊर्जा स्रोतांचा अधिकाधिक वापर करावा यासाठी ही थीम प्रेरित करते. या दिवसाच्या निमित्ताने जगभरातील शासकीय संस्था, पर्यावरणवादी आणि निसर्गप्रेमी एकत्र येऊन निसर्ग आणि परिसंस्थांचे संरक्षण आणि महत्त्वाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रम राबवतात.

जनमनाचे प्रतिध्वनी

या उपक्रमांमध्ये वृक्षारोपण करणे, नद्यांचे जल स्वच्छ ठेवणे, प्लास्टिकच्या वापराविरुद्ध आवाज उठवणे, वन संवर्धनासाठी रॅली काढणे, कागदाचा कचरा कमी करणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे. शेतीत रासायनिक खतांचा वापर कमी करून जैविक खतांचा वापर करणे इत्यादी उपक्रमांचा समावेश आहे. अशावेळी धोकादायक हरितगृह वायू उत्सर्जन कमी करून पृथ्वीचे संरक्षण करण्यासाठी प्रयत्न करणे ही आपल्या सर्वांचीच जबाबदारी आहे. यंदाच्या वसुंधरा दिनाचा तोच संदेश आहे.

**प्रदीप मोरे**

# मानवी मन जोडणारा घाट

कशेडी घाटात बोगदा झाला नव्हे ते आवश्यकच होते. इंधनासह वेळेची बचत त्यामुळे होणार आहे हे निश्चित. परंतू मानवी मन कुठेतरी गुरफट असतच अगदी त्याप्रमाणे रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना जोडणारा, निसर्ग आणि माणूस यांची जवळीक साधणारा कशेडी घाट होय. ज्याच्या अंगा खांद्यावरून गेली ७०- ७५ वर्ष प्रवास केला, ज्याने निसर्ग आणि मानवी मनाचे मनोमिलन घडवले, साथ सोबत केली, वनचरे आम्हां सोयरीची खरीखुरी ओळख, नकळत शिकवण दिली, घाटातून जाताना वाहन चालकाला प्रत्येक वेळी नवा प्रवास, नवा आनंद, नवा अनुभव, नवा हर्ष नवी उमेद सातत्याने देत राहिला तो कशेडी घाट मात्र आता विस्मरणात जातोय की काय अशी धास्ती वाटायला लागलीय. संबंधित यंत्रणेने कशेडी घाट, मूळ रस्ता कायमस्वरूपी सुस्थितीत रहावा, तो दुर्लक्षीत राहू नये. कारण घाटप्रेमी वाहन चालकांना कशेडी घाटाचा, त्या वळणावळणाच्या नागमोडी रस्त्याचा, तेथील निसर्गाचा, दऱ्या, डोंगरांचा कायमस्वरूपी आनंद घेता यावा म्हणून नव्हे या साठीच हे मनोगत.

**विश्वनाथ पंडित, ९५८८४५०४४२**

# सत्समागम हा सर्व साधनांचा राजा !



विचारधन

मनुष्यजन्माला येणे, संतांची भेट होणे आणि त्यांना ओळखून त्यांचा सहवास होणे या तिन्ही गोष्टी फार दुर्घट आहेत. म्हणूनच संतसमागमासारखा लाभ नाही असे म्हणतात. सत्समागम म्हणजे सर्व साधनांचा राजा होय. काही मागण्याची इच्छाच संत नष्ट करतात, मग मिळवायचे कुठे राहते ? संत बनणे व्यावहारिकदृष्ट्या काही सुखाचे नसते. एखाद्या स्नानसंध्याशील आणि सदाचरणी माणसाच्या अंगावर तेज दिसते, कारण देहाला धरून झालेल्या कर्माचे ते तेज असते; पण एखाद्या सत्पुरुषाच्या देहावर बाहेर तसे तेज दिसणारही नाही. आत वावरणाऱ्या भगवंताच्या ज्ञानाला योग्य असा सत्पुरुषाचा देह असतो. देहाच्या आधाराने भोगण्याची या जगामधली जी सुखे आहेत, त्यांचे मार्ग सत्पुरुषापेक्षा आपण प्रापंचिक लोक जास्त जाणतो. परंतु देहाच्या पलीकडे असणारे आणि कायमचे टिकणारे, आणि देहाला विसरून आणि देवाला स्मरून जे मिळवायचे, असे भगवंताचे सुख आहे.

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन

संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस

संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस

मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६

विभागीय कार्यालये :

सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.

मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००

दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.

'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.

e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com

RNI REG. No.1934/57

बाजार - कंपन्या - मनोरंजन



## कोण होतीस तू, काय झालीस तू मालिकेचा दमदार लॉन्च सोहळा

**मुंबई :** लोकप्रिय अभिनेते वैभव मांगले यांनी घातलेल्या गाऱ्हाण्याचा नादात 'कोण होतीस तू, काय झालीस तू' मालिकेच्या लॉन्च सोहळा पार पडला. या मालिकेचं बरचसं शूटिंग कोकणातल्या कुडाळमध्ये होणार आहे. वालावल मंदिर, निवतीचा समुद्र किनारा अशी निसर्ग सौंदर्याने नटलेली बरीचशी प्रेक्षणीय स्थळं मालिकेत पाहायला मिळणार आहेत. मालिकेची गोष्ट कोकणात घडत असल्यामुळे शूटिंगचा श्रीगणेशा आणि लॉन्चिंग सोहळा देखिल या देवभूमीत करण्यात आला. याप्रसंगी सुकन्या कुलकर्णी, वैभव मांगले, मंदार जाधव, गिरीजा प्रभू, अमृता माळवदकर, अमित खेडेकर, संजय शेजवळ आणि स्टार प्रवाहचे व्यवसाय प्रमुख सतीश राजवाडे उपस्थित होते. या मालिकेतल्या प्रत्येक कलाकाराची कोकणाशी नाळ जोडलेली आहे. मालिकेच्या कथानकाविषयी देखिल उत्कंठा दिवसेंदिवस वाढते. सोमवार २८ एप्रिल पासून ही मालिका रात्री ८ वाजता स्टार प्रवाहवर दिसणार आहे.

## आनंद नागरी पतसंस्थेस १ कोटी ६९ लाखाचा नफा

**नाशिकरोड : वार्ताहर** आर्टिलरी सेंटर रोडवरील आनंद नागरी



सहकारी पतसंस्थेस या आर्थिक वर्षात सर्व तरतुदींची पूर्तता करत १ कोटी ६९ लाख रुपयांचा निव्वळ नफा झाल्याचे संस्थेचे चेअरमन महेंद्र धाडीवाल यांनी सांगितले. चालू आर्थिक वर्षात संस्थेचे वसूल भाग भांडवल १कोटी ४२ लाख रुपये असुन संस्थेकडे ११ कोटी ४५ लाख रुपयांचा निधी जमा आहे. संस्थेकडे ५० कोटी ७७ लाख रुपयांच्या ठेवी आहे. ही संस्थेवरील विश्वासाची पावतीच आहे असे व्हा. चेअरमन मिलींद चोपडा यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, संस्थेने ३३ कोटी रुपयांचे सुरक्षित कर्ज वाटप केले आहे. कर्ज वाटपा इतकीच रक्कम म्हणजे ३३ कोटी रुपयांची गुंतवणूकही केलेली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात ९५.१५ टक्के वसुली झाली आहे. थकबाकीचे प्रमाण ४.८५ टक्के आहे असेही ते म्हणाले. सर्व कर्जदार बांधवांनी कर्ज वसुलीसाठी केलेले सहकार्य सभासद ठेवीदारांनी दाखविलेला विश्वास व संचालक मंडळ यांनी घेतलेले अचूक निर्णय, कर्मचारी वर्गाची ग्राहकांसाठी, सभासदांसाठी असलेली आत्मियता व तत्पर सेवा ही संस्थेच्या प्रगतीस कारणीभूत ठरली आहे असे ज्येष्ठ संचालक अजित संकलेचा व व्यवस्थापक दिलीप वर्मा यांनी सांगितले. यावेळी प्रकाश कोठारी, डॉ. राजेंद्र मंडलेचा, चांदमल कोचर, नंदलाल जैन, सतिश धाडीवाल, नामदेव आहिरे, प्रतिभा चोरडिया, इंदिरा वर्मा, शितल मनीष शहा, प्रभा संजय सुराणा, तज्ञ संचालक युवराज धाडीवाल, शैलेंद्र साबद्रा, सौरभ गिडिया आदी संचालक आवर्जुन उपस्थित होते.

## 'झापुक झुपूक' चित्रपटातील गाणे 'वाजीव दादा' मेटा च्या सहयोगाने प्रदर्शित

**मुंबई :** अख्ख्या महाराष्ट्रात झापुक झुपूकचं वेड पसरलय. सर्वत्र



सूरज चव्हाणच्या आगामी सिनेमाची चर्चा आहे. अशातच आता 'झापुक झुपूक' या चित्रपटाचं एक भन्नाट गाणं 'वाजीव दादा' प्रदर्शित झालंय. पहिल्या दोन गाण्यांना मिळालेल्या जबरदस्त प्रतिसादानंतर 'झापुक झुपूक' सिनेमातील हे खास हळदीचे गाणे सध्या कमाल करत आहे. मराठी हळदी गाण्याच्या शोधात असाल, तर हे गाणे तुमच्या लग्नाच्या प्लेलिस्टमध्ये अवश्य जोडा! मस्तीने पुरेपूर आणि उत्साह ने भरपूर असलेलं असं हे पारंपरिक उत्साहात भर टाकणार हे नक्कीच. हळदीच्या तेजस्वी पिवळ्या रंगाप्रमाणेच हे मजेदार गाणं आहे जे प्रेक्षकांच्या पसंतीस उतरलय आणि नक्कीच तुमचं वातावरण आनंद आणि उर्जेने भरून टाकेल. 'वाजीव दादा' हे गाणं सूरज चव्हाण सह जुई भागवत हेमंत फरांदे आणि त्याच्या बिग बॉस सीझन पाच मधील काही कलाकारांवर म्हणजेच जान्हवी किल्लेकर, छोटा पुढारी, वैभव चव्हाण, इरिना आणि पुरुषोत्तम पाटील यांच्यावर चित्रित केलं गेलय. गाण्यात ह्या सर्वांचा कल्ला आणि एकमेकांसोबतची जुगलबंदी पहायला मिळत आहे.

# सलग पाचव्या दिवशी शेअर बाजार तेजीत

## सेन्सेक्स ८५५ अंकांनी वाढला; निफ्टी २४,१२५ वर बंद

**मुंबई :** आशियाई बाजारातील कमकुवतपणा आणि गिफ्ट निफ्टीमधील मंदी असूनही, सोमवार, २१ एप्रिल रोजी देशांतर्गत शेअर बाजार जोरदार वाढीसह बंद झाला. आयसीआयसीआय बँक आणि एचडीएफसी बँक सारख्या मोठ्या बँकिंग समभागांच्या वाढीमुळे बाजाराला मोठा आधार मिळाला. यासोबतच, निवडक आयटी शेअर्समधील वाढीमुळे बाजार वरच्या दिशेने खेचला गेला.



बीएसईचा ३० शेअर्सचा निर्देशांक सेन्सेक्स आज ३०० पेक्षा जास्त अंकांनी वाढून ७८,९०३.०९ वर उघडला आणि सुरुवातीच्या व्यवहारात त्यात आणखी वाढ दिसून आली. व्यवहारादरम्यान तो ७९,६३५ अंकांवर गेला होता. शेवटी, सेन्सेक्स ८५५.३० अंकांनी किंवा १.०९% ने वाढून ७९,४०८.५० वर बंद झाला.

नॅशनल स्टॉक एक्सचेंजचा निफ्टी-५० देखील २३,९४९.१५ च्या पातळीवर जोरदारपणे उघडला. व्यवहारादरम्यान तो २४,१८९.५५ अंकांवर गेला होता. शेवटी, निफ्टी २७३.९० अंकांनी किंवा १.१५% ने वाढून २४,१२५.५५ वर बंद झाला.

### टॉप गेनर्स

सेन्सेक्समधील ३० पैकी २३ समभागांनी वाढ नोंदवली. यामध्ये टेक महिंद्रा, इंडसइंड बँक, पॉवर ग्रिड कॉर्पोरेशन, बजाज फिनसर्व्ह आणि महिंद्रा अँड महिंद्रा यांच्या शेअर्समध्ये ४.९१ टक्क्यांपर्यंत वाढ झाली.

### टॉप लूजर्स

दुसरीकडे, अदानी पोर्ट्सला सर्वात जास्त तोटा झाला. याशिवाय हिंदुस्तान युनिलिव्हर, आयटीसी, एशियन पेंट्स, नेस्ले इंडिया, भारती एअरटेल, सन फार्मा यांचे शेअर्स घसरले.

### जागतिक बाजारपेठांची स्थिती काय आहे?

जागतिक स्तरावर, सोमवारी सकाळी जपानचा निक्केई २२५ ०.७४ टक्क्यांनी घसरला. दक्षिण कोरियाचा कोस्पी ०.५ टक्क्यांनी वधारला. त्याच वेळी, आज इस्टरच्या सुट्टीमुळे ऑस्ट्रेलिया आणि हाँगकाँगमधील बाजारपेठा बंद आहेत.

आज अमेरिकन इंडेक्स फ्युचर्स कमी व्यापार करत होते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिकन फेडचे अध्यक्ष जेरोम पॉवेल यांची हकालपट्टी लवकरच होऊ शकत नाही असे म्हटल्यानंतर हे घडले आहे. ड्झ ५००, छरीवर्र-१०० आणि ड्ढु गेपशी निर्देशांकांवरील फ्युचर्स ०.५ टक्क्यांनी घसरले. ट्रम्पच्या व्यापार धोरणांमुळे फेडच्या २ टक्के महागाई लक्ष्य साध्य करण्याच्या योजनेला धोका निर्माण होऊ शकतो, असा इशारा पॉवेल यांनी दिल्यानंतर त्यांची ही टिप्पणी आली.

### गेल्या ट्रेडिंग सत्रात ट्रेंड कसा होता?

गुरुवारी भारतीय इक्विटी बेंचमार्क्समध्ये सुमारे २ टक्क्यांनी वाढ झाली, ज्यामुळे एका लहान ट्रेडिंग आठवड्याचा शेवट जवळजवळ चार वर्षांतील सर्वात मजबूत साप्ताहिक कामगिरीने झाला. व्यापार चर्चेत प्रगती झाल्यानंतर आणि वाढत्या टॅरिफ सवलतींमुळे नव्याने जोखीम घेतल्याने भावना वाढल्या. ठेवींच्या दरात कपातीमुळे मार्जिनच्या अपेक्षा वाढल्या असल्याने खाजगी बँकांच्या समभागांनी वाढ नोंदवली. परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) केलेल्या खरेदीमुळेही तेजीला चालना मिळाली.

# अदानी पोर्ट्सचे शेअर्स सर्वाधिक घसरले

## कंपनी करणार २.५ अब्ज डॉलर्सचा 'हा' करार

**मुंबई :** अदानी पोर्ट्स आणि स्पेशल इकॉनॉमिक झोनच्या शेअर्समध्ये आज २१ एप्रिल रोजी ४ टक्क्यांपर्यंत घसरण झाली. ७ एप्रिलनंतर या शेअरमध्ये झालेली ही सर्वात मोठी इंट्राडे घसरण आहे. कंपनी ऑस्ट्रेलियामध्ये कोळसा टर्मिनल खरेदी करणार असल्याच्या बातमीनंतर कंपनीच्या शेअर्समध्ये ही घसरण झाली. कंपनीने गेल्या आठवड्यात सांगितले की ते सुमारे २.५४ अब्ज (सुमारे रु. २१,६००) च्या एंटरप्राइझ मूल्यावर ऑस्ट्रेलियन खोल पाण्यातील कोळसा निर्यात टर्मिनल खरेदी करेल. यामुळे कंपनीला जागतिक स्तरावर आपली उपस्थिती वाढविण्यास मदत होईल.

तथापि, ब्रोकरेज फर्म नुवामा वेल्थ मॅनेजमेंटचे म्हणणे आहे की या करारामुळे कंपनीच्या प्रति शेअर कमाईत घट होऊ शकते. याशिवाय, या करारात काही नॉन-कोअर मालमत्ता आणि दायित्वे देखील समाविष्ट आहेत, जी कंपनी देखील विकत घेईल. सकाळी १०.२५ च्या सुमारास, अदानी पोर्ट्सचे शेअर्स २.७२ टक्क्यांनी घसरून १,२२५ रुपयांवर व्यवहार करत होते.

अदानी पोर्ट्सने गुरुवारी, १७ एप्रिल रोजी सांगितले की ते २.४ अब्ज डॉलर्सच्या नॉन-कॅश डीलमध्ये ऑस्ट्रेलियन कोळसा टर्मिनल खरेदी करणार आहेत. या करारानुसार, अदानी पोर्ट्स कार्मायकल रेल अँड पोर्ट सिंगापूर होल्डिंग्जकडून उत्तर क्वीन्सलँड एक्सपोर्ट टर्मिनलची मालकी असलेल्या ॲबॉट पॉइंट पोर्ट होल्डिंग्जचे अधिग्रहण करेल. हे अधिग्रहण सर्व-शेअर डील असेल, ज्या अंतर्गत अदानी पोर्ट्स कार्मायकल रेल अँड पोर्ट सिंगापूर होल्डिंगला सुमारे १४.३८ कोटी शेअर्स जारी करेल नॉर्थ क्वीन्सलँड एक्सपोर्ट टर्मिनल ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किनाऱ्यावर स्थित आहे. हे खोल पाण्यातील कोळसा निर्यात टर्मिनल आहे ज्याची वार्षिक क्षमता ५० दशलक्ष टन आहे. अदानी पोर्ट्स अदानी पोर्ट्सने प्रथम २०११ मध्ये ते २ अब्ज डॉलर्समध्ये विकत घेतले होते, परंतु २०१३ मध्ये ते अदानी कुटुंबाला विकले जेणेकरून कंपनी भारतातील तिच्या मुख्य कामकाजावर लक्ष केंद्रित करू शकेल.



# स्थापना दिनानिमित्त निपमचा स्नेह मेळावा

## नवोदित कलाकारांच्या कलागुणांना वाव : कासार

**नाशिक : प्रतिनिधी** नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट (एनआयपीएम), नाशिक चॅप्टरचा ४५ वा स्थापना दिन निपमचा स्नेह मेळावा झाला. मेळाव्यांच्या माध्यमातून नवोदित कलाकारांच्या सूप्त कलागुणांना वाव मिळतो असे प्रतिपादन नाशिक शाखेचे अध्यक्ष राजाराम कासार यांनी केले.

याकार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निपमचे अध्यक्ष राजाराम कासार होते. प्रमुख पाहुणे म्हणून निपमचे माजी अध्यक्ष डॉ. उदय खरोटे, ॲड. एस. एस. खैरनार, सुधीर पाटील, जनार्दन शिंदे, श्रीधर व्यवहारे, उपाध्यक्ष राहुल बोरसे , विनायक पाटील , मानद सचिव प्रकाश गुंजाळ, मानद सहसचिव राजेंद्र आचारी, सचिन ठोके, पाटील, खजिनदार सुस्मित दळवी,कार्यकारी समिती सदस्य मनोज मुळे, श्रीकांत पाटील, गोविंद बोरसे, ब्रिजेश जाधव, रामेश्वर थोरात , विनेश मोरे, यादवी पवार हर्षदा सोनवणे, आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक निपम चे मानद सचिव प्रकाश गुंजाळ यांनी केले. निपमच्या सभासदांच्या मुलांच्या उत्साह आणि प्रतिभेचे दर्शन घडवणाऱ्या नेत्रदीपक नृत्य आणि गायनाने व्यासपीठ चैतन्यमय झाले. प्रसिद्ध कराओके कलाकार. गजानन साठे यांच्या भावपूर्ण गायनाने संध्याकाळ आणखी उजळली, भूषण कापडाने यांनीही एकाहून एक कर्ण मधुर सुरेल गीत सादरीकरण केले,

सांस्कृतिक कार्यक्रमादरम्यान झालेली स्पर्धत एनआयपीएम नाशिक चॅप्टरचे माजी अध्यक्ष . सुधीर पाटील यांना विजेते घोषित करण्यात आले. त्यांना, चार सह-सहभागींसह, मलबार गोल्ड, नाशिक यांनी प्रायोजित केलेल्या विशेष भेटवस्तू देण्यात आल्या.. प्रकाश गुंजाळ,कुमारी संस्कृती मोरे,मास्टर यशोधन दळवी यांचा सन्मान करण्यात आला संध्याकाळचे सूत्रसंचालन . राहुल बोरसे, रामेश्वर थोरात, यादवी पवार आणि हर्षदा सोनवणे यांनी केले,

कार्यक्रम यशस्वीतेसाठी उपाध्यक्ष राहुल बोरसे , विनायक पाटील सहसचिव राजेंद्र आचारी, कार्यकारी सदस्य श्रीकांत पाटील, ब्रिजेश जाधव , गोविंद बोरसे , मनोज मुळे, रामेश्वर थोरात, विनेश मोरे, यादवी पवार, हर्षदा सोनवणे यांनी परिश्रम घेतले.

# उबर, ओला रिक्षा व टॅक्सी यांनी नियमानुसार मीटरभाडे घ्यावे

## ग्राहक पंचायतीचे उपाध्यक्ष पाटील यांचे आवाहन

**नाशिक :** महाराष्ट्र शासनाने उबर,ओला रिक्षा व टॅक्सी यांनी ऑनलाइन प्रवास सेवा घेणाऱ्या ग्राहकांकडून शासनाने किंवा आर.टी.ओ यांनी ठरविलेल्या टेरीफ दरानेच भाडे घ्यावे, असा शासकीय आदेश (जी.आर) पारित केला आहे. परंतु आज नाशिक, ठाणे, जळगांव आदी सर्व ठिकाणी शासनाने ठरविलेल्या टेरीफ दराने कोणतीही रिक्षा, टॅक्सी भाडे घेत नाही.

शासकीय दराच्या १०० टक्के पेक्षाही अधिक भाडे घेत आहेत. सदर प्रकार पोलिस व आर टी ओ यांच्या सहकार्याने होत आहे. उबर ओला सारख्या सार्वजनिक वाहतूक सेवा देणाऱ्या कंपन्या जादा भाडे घेऊन ग्राहकाला लुबाडणे चालू ठेवत असतील तर ट्राफिक पोलिस काही कारवाई करतील, याची हमी मा. गृहमंत्री तथा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देतील का? हा प्रश्न सर्वसामान्य ग्राहकाला पडला आहे. कारण मुळातच प्रवासी ग्राहकांची तक्रार करण्यासाठीची यंत्रणा "जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद" ही गेल्या पाच वर्षांपासून बंद आहे.मग ग्राहक तक्रार कोठे करणार? असा प्रश्न नाशिक जिल्हा ग्राहक पंचायतचे उपाध्यक्ष सुरेश पाटील यांनी उपस्थित केला आहे.

उबर आणि ओला यांसारख्या टॅक्सी, रिक्षा सेवा प्रदात्यांबद्दल अनेक तक्रारी आहेत. भाडे आकारणी, ड्रायव्हरचे वर्तन आणि अचानक प्रवास रद्द करणे यांसारख्या समस्यांमुळे अनेक ग्राहक त्रस्त आहेत. सदर सार्वजनिक प्रवासी वाहतूक कंपन्यांनी ग्राहकांच्या तक्रारी गांभीर्याने घेणे आवश्यक आहे आणि तक्रार निवारण प्रक्रियेत सुधारणा करणे आवश्यक आहे.तसेच शासनाचा रिक्षा टॅक्सीनी नियमाप्रमाणे भाडे घ्यावे या आदेशाचे पालन होताना दिसत नाही.तरी त्यात सुधारणा करावी व सदर आदेश पालन यंत्रणा कायदा इन्फोर्समेंट निर्माण करण्यासाठी शासनाने योग्य ती ग्राहकहिताची कार्यवाही करावी "असे आवाहन नाशिक जिल्हा ग्राहक पंचायतीचे उपाध्यक्ष सुरेश पाटील, सेक्रेटरी विलास देवळे, अनिल नांदोडे,सुभाष तिडके, कृष्णा गडकरी यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

# 'ॲमेझॉन डॉट इन'मुळे उन्हाळा सुसह्य होणार

**नाशिक : प्रतिनिधी** वाढत्या तापमानामुळे थंड आणि आरामदायक राहणं ही सगळ्यांची गरज बनली आहे. ॲमेझॉन डॉट इन वर थंडावा देणारी पेये, उर्जादायक उत्पादने, पाळीव प्राण्यांसाठी आवश्यक वस्तू आणि बाळांसाठी खास देखभाल उत्पादने अशा अनेक उन्हाळी गरजांची पूर्तता एकाच ठिकाणी उत्तम किमतीत आणि जलद, विश्वासार्ह डिलिव्हरीसह येथे उपलब्ध आहे.

अमेझॉन पे वापरून ग्राहकांना जास्त बचत आणि अधिक सोय मिळते, तर प्राईम सदस्यांना १० लाखांहून अधिक उत्पादनांवर त्याच दिवशी डिलिव्हरीची सुविधा दिली जाते. ॲमेझॉन डॉट इन लिक्विड आय. व्ही., स्लिपी आउल, ग्लूकॉन-डी, हिमालया, बाम्बू नेचर, पेटविट आणि गूफी टेल्स यांसारख्या नामांकित ब्रँड्सची सर्व गरजेची उत्पादने थेट दारापर्यंत पोहोचवते. लिक्विड आय. व्ही. हायड्रेशन मल्टीप्लायर - उच्च दर्जाच्या घटकांनी तयार केलेले, नैतिक चवींनी समृद्ध असलेले हे उत्पादन व्यायाम, प्रवास किंवा लांब दिवसांसाठी आदर्श आहे. ग्लूकॉन- डी टँगी ऑरेंज ग्लूकोज पावडर - या ग्लुकोज पावडरसोबत तुम्ही ताजेतवाने आणि ऊर्जा भरलेले राहू शकता. तातडीने ऊर्जा मिळवण्यासाठी डिझाइन केलेले, हे थकवा कमी करण्यास मदत करते आणि उष्ण, थकवणाऱ्या दिवसांत तुम्हाला चांगले राखते. त्याची चवदार संत्र्याची चव हायड्रेशनला अधिक मजेदार बनवते. पाण्यात मिसळा आणि कुठेही, केव्हाही ऊर्जा मिळवा. कॉन्टिनेंटल धिस लेमन आईस्ड टी- कॉन्टिनेंटल धिस लेमन प्रीमिक्स आईस्ड टी ने थंड होऊन ताजेतवाने रहा, नैतिक चवींनी बनवलेली आणि कृत्रिम पदार्थांशिवाय ताजेतवानी केलेली संत्र्याची चहा. सेकंदात तयार होणारी, ही ताजेतवानी, तिखट लिंबाची चहा कोणत्याही प्रसंगासाठी योग्य आहेमोगू मल्टी फ्लेवर मिक्स फ्रूट ज्युस - मोगू मोगू चा अनुभव घ्या, जो एक अद्वितीय फळांचा रस आहे जो नाटा डे कोको ने समृद्ध केलेला आहे- कोको पाणी अर्धवट केलेला चवदार आणि चविष्ट पदार्थ. प्रत्येक घोट फळांच्या चवींसोबत एक अद्वितीय बनावट तयार करतो, ज्यामुळे हायड्रेशन एक अत्यंत आनंददायक अनुभव बनवतो.स्लिपी आउल असॉर्टेड कोल्ड ब्रिव्ह कॉफी बॅग्ज - मऊ, ताजेतवानी आणि सोपे ब्रू करा. रात्रीभर ठेवून नैतिक गोड आणि समृद्ध कोल्ड ब्रू तयार करा, कुठल्याही उपकरणाची आवश्यकता नाही! १००% अरेबिका बियांनी बनवलेले, हे संतुलित, चॉकलेटी चव देणारे आहे, जे गरम किंवा थंड दोन्ही प्रकारे उत्तम आहे. ओशन एनर्जी ड्रिंक - नॅचरल, वनस्पती-आधारित एनर्जी बूस्ट मिळवा! ग्रीन टी, आवश्यक पोषक घटक आणि बी जीवनसत्त्वांनी भरलेले, हे ताजेतवाने पेय तुम्हाला संपूर्ण दिवसभर ऊर्जा देतं.

# पेट्रोल-डिझेल होणार स्वस्त?

## कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण

**मुंबई :** रशिया-युक्रेन आणि अमेरिका-इराण चर्चेच्या यशाचा परिणाम कच्च्या तेलाच्या किमतींवर दिसून येत आहे. अमेरिका आणि इराणमधील आण्विक चर्चा प्रगतीपथावर असल्याने पुरवठ्याच्या समस्या कमी झाल्या आहेत. त्यामुळे सोमवारी आशियामध्ये कच्च्या तेलाच्या किमती एक टक्क्यांहून अधिक घसरल्या.

ब्रेंट क्रूड फ्युचर्स १.५०% घसरून ६६.९४ प्रति बॅरलवर पोहोचले. याशिवाय, यूएस वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट क्रूडमध्येही १.५२% ची घट झाली. त्यानंतर किंमत प्रति बॅरल ६३.७० पर्यंत खाली आली. या महिन्यात कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. एक वेळ अशी आली जेव्हा किमती चार वर्षातील नीचांकी पातळीवर पोहोचल्या होत्या. यामागील कारण म्हणजे अमेरिकेचा टॅरिफ. अमेरिका आणि चीनमधील वाढत्या व्यापार युद्धामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या मागणीत घट होऊ शकते, अशी चिंता गुंतवणूकदारांना आहे. याशिवाय, ओपेकने उत्पादन अधिक वेगाने वाढवण्याच्या निर्णयामुळे मंदी आणखी वाढली आहे. बाजारात अतिरिक्त पुरवठ्याची भीतीही वाढत आहे. अमेरिका आणि इराण यांनी शनिवारी अणु करारासाठी एक चौकट तयार करण्यावर सहमती दर्शवली. ज्याचे वर्णन अमेरिका आणि इराणच्या अधिकाऱ्यांकडून चांगली प्रगती म्हणून केले जात आहे.

# १ मे पासून एटीएम सेवा महागणार

**नवी दिल्ली :** १ मे २०२५ पासून एटीएम व्यवहारांवरील शुल्क वाढणार आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया च्या प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर, आता दुसऱ्या बँकेच्या एटीएममधून व्यवहार करणे आणखी महाग होणार आहे.

हे नवीन शुल्क ग्राहकांच्या मासिक मोफत मर्यादेपेक्षा जास्त व्यवहारांवर लागू होतील. महानगरांमध्ये ५ आणि नॉन-मेट्रो भागात ३ व्यवहार मोफत करण्याची मर्यादा आहे. एटीएम नेटवर्क ऑपरेटर आणि व्हाईट लेबल एटीएम कंपन्यांनी त्यांच्या देखभाल आणि ऑपरेशनल खर्चात वाढ झाल्यामुळे इंटरचेंज फी वाढवण्याची मागणी केली होती. एनपीसीआयने ही मागणी आरबीआयसमोर ठेवली, जी मंजूर करण्यात आली. ग्राहकांना आता नॉन-होम बँक एटीएममधून रोख रक्कम काढण्यासाठी किंवा बॅलन्स तपासण्यासाठी जास्त शुल्क द्यावे लागेल. यामुळे इतरांच्या एटीएम नेटवर्कवर जास्त अवलंबून असलेल्या लहान बँकांवर भार वाढू शकतो.

बँका त्यांचे खाते देखभाल शुल्क देखील वाढवू शकतात. जे लोक वारंवार एटीएम वापरतात त्यांनी अतिरिक्त खर्च टाळण्यासाठी त्यांच्या घरच्या बँकेचे एटीएम किंवा डिजिटल पेमेंट पर्यायांचा अधिक वापर करावा. सरकारी आकडेवारीनुसार, आर्थिक वर्ष १४ मध्ये भारतात डिजिटल पेमेंटचे एकूण मूल्य ९५२ लाख कोटी होते, जे आर्थिक वर्ष २३ मध्ये वाढून ३,६५८ लाख कोटी झाले. यावरून असे दिसून येते की देश कॅशलेस अर्थव्यवस्थेकडे वेगाने वाटचाल करत आहे.

### एसबीआयने व्यवहार मर्यादा बदलली

स्टेट बँक ऑफ इंडियाने त्यांच्या ग्राहकांसाठी एटीएम व्यवहार मर्यादा आणि शुल्क बदलले आहेत. हे नवीन नियम १ फेब्रुवारी २०२५ पासून लागू झाले आहेत. त्याच वेळी, आरबीआयच्या सूचनांनुसार, १ मे २०२५ पासून, रोख रक्कम काढण्यासाठी अधिक शुल्क भरावे लागेल.

# तीन विमान कंपन्यांना १५०० कोटींची कर नोटीस


## इंडिगो व १५ आंतरराष्ट्रीय विमान लेसर्सचा समावेश; शेल कंपन्यांद्वारे करचोरीचा आरोप

**नवी दिल्ली :** प्राप्तिकर विभागाने इंडिगोसह तीन देशांतर्गत विमान कंपन्या आणि त्यांच्याशी संबंधित १५ आंतरराष्ट्रीय विमान लेसर्सना १,५०० कोटी रुपयांची कर नोटीस पाठवली आहे. आयर्लंडमध्ये स्थापन झालेल्या कागदी कंपन्यांद्वारे (शेल कंपन्या) कर चुकवल्याचा आरोप आयकर विभागाने त्यांच्यावर केला आहे. या नोटिसा ऑक्टोबर २०२४ आणि मार्च २०२५ मध्ये पाठवण्यात आल्या होत्या. करचुकवेगिरीचे हे प्रकरण २०२१-२२ आणि २०२२-२३ या आर्थिक वर्षांशी संबंधित आहे.

या विमान कंपन्यांनी आयर्लंडमध्ये विमान भाड्याने घेण्यासाठी (स्पेशल पर्पज व्हेईकल) नावाच्या शेल कंपन्या तयार केल्या, ज्या प्रत्यक्षात कोणताही व्यवसाय, कार्यालय किंवा कर्मचारी नाहीत. आयर्लंड-भारत कर कराराचा फायदा घेऊन भारतात कर भरणे टाळणे हा त्यांचा एकमेव हेतू होता. तथापि, कंपन्यांनी ते चुकीचे म्हटले आहे आणि त्या न्यायालयात आव्हान देणार असल्याचे म्हटले आहे. त्याच वेळी, आयर्लंड सरकारने देखील त्यांच्या भाडेपट्टेदारांचा बचाव केला आहे आणि म्हटले आहे की त्यांच्या कंपन्यांना शेल म्हणण्याचे आरोप चुकीचे आहेत. त्या खऱ्या कंपन्या आहेत. इंडिगोचे शेअर्स आज म्हणजेच २१ एप्रिल रोजी २.३८% वाढीसह ५,४९३.५० रुपयांवर व्यवहार करत आहेत. गेल्या ५ ट्रेडिंग दिवसांत या स्टॉकने ६.६७% परतावा दिला आहे. गेल्या १ वर्षात या शेअरमध्ये ४७.४०% वाढ झाली आहे.

### इंडिगोला ९४४.२० कोटींची कर नोटीस

यापूर्वी ३० मार्च रोजी, आयकर विभागाने इंडिगोची मूळ कंपनी इंटरग्लोब एव्हिएशनला ९४४.२० कोटी रुपयांचा दंड आकारण्याचा आदेश पाठवला होता. कंपनीने एक्सचेंज फाइलिंगमध्ये म्हटले आहे की, हा दंड २०२१-२२ या कर निर्धारण वर्षासाठी आयकर कायद्याच्या कलम २७०अ अंतर्गत आकारण्यात आला आहे. यासोबतच, चेन्नईच्या संयुक्त आयकर आयुक्तांनी कंपनीला २.८४ कोटी रुपयांचा दंडही ठोठावला. कंपनीने सांगितले की कलम १४३(३) अंतर्गत कर निर्धारण आदेशाविरुद्धचे त्यांचे अपील प्रलंबित होते परंतु कर अधिकाऱ्यांनी ते फेटाळून लावले आणि दंड ठोठावला. कंपनी या प्रकरणात आता कायदेशीर मार्ग स्वीकारतील आणि या आदेशाला आव्हान देतील.



## महत्त्वाचे

### शिष्यवृत्ती योजना अर्ज सादर करण्याचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी** शासनाच्या इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत प्रती वर्षी विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील ७५ विद्यार्थ्यांना (मुला-मुलींना) परदेशात पुदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे (पी.एच.डी) अध्ययनासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी प्रक्रिया सुरू झाली असून, पात्र विद्यार्थ्यांनी परिपूर्ण अर्ज इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस, दुसरा मजला,एम.एच. बी. कॉलनी, म्हाडा कमर्शियल कॉम्प्लेक्स, समता नगर, येरवडा, पुणे या कार्यालयात समक्ष अथवा पोस्टाने सादर करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण नाशिक विभागाचे प्रादेशिक उपसंचालक भगवान वीर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. विहित नमुन्यातील अर्ज शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून किंवा https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in या संकेस्थळावरील ताज्या घडामोडी या दुव्यावरून डाऊनलोड करून घ्यावेत. या योजनेंतर्गत महाराष्ट्रातील विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील पदव्युत्तर पदवी आणि संशोधनात्मक अभ्यासक्रमाचे पीएच.डीसाठी अद्ययावत (Qx world universigy Ranking)२०० च्या आतील परदेशातील शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेश घेण्याऱ्या ७५ विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. त्यापैकी ३० टक्के जागांवर मुलींची गुणवत्तेनुसार निवड करण्यात येते. पात्र विद्यार्थ्यांना विमान प्रवास भाडे, परदेशातील शैक्षणिक संस्थेची शिक्षण फी, निर्वाह भत्ता,आकस्मिक खर्च याचा लाभ या योजनेंतर्गत मिळतो. पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ३५ वर्षे व पीएच.डी साठी ४० वर्षे ही कमाल वयोमर्यादा आहे.

### जिल्ह्यात ३ मेपर्यंत शस्त्र व जमावबंदी

**नाशिक : प्रतिनिधी** जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांनी मुंबई पोलिस अधिनियम १९५१ चे ३७ (१) (३) अन्वये नाशिक शहर कार्यक्षेत्रात ३ मेपर्यंत शस्त्र व जमावबंदी आदेश जारी केला आहे. सदरचे आदेश लग्नकार्य, मिरवणुका, तालुका आठवडे बाजार किंवा प्रेतयात्रेच्या जमावास लागू राहणार नाहीत. तसेच हा आदेश पोलीस अधिकारी, कामावर असलेल्या इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना तसेच सभा अगर मिरवणुका काढण्यास रितसर परवानगी घेतली असलेल्या व्यक्तींना लागू नाही. या आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितावर महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ चे कलम १३५ अन्वये कारवाई करण्यात येईल, असेही कर्णिक यांनी आदेशात नमूद केले आहे.



### मानवधनमध्ये पदवी प्रदान सोहळा

**नाशिक :** विद्यार्थी जीवनात अनेक शैक्षणिक टप्पे येत असतात. प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे, प्रोत्साहन देणे, कौतुक करणे याद्वारे त्यांचे मनोबल वाढवले तर विद्यार्थी नक्कीच त्यांच्या जीवनात यशस्वी होतात. याच व्यापक दृष्टिकोनाला समोर ठेवून मानवधन सामाजिक शैक्षणिक विकास संस्था नाशिक संचलित धनलक्ष्मी बाल विद्यामंदिर व प्राथमिक शाळेतील मोठ्या गटातून पहिलीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला. मराठी शाळेमध्ये अशा पद्धतीने पदवी प्रदान सोहळा आयोजित करणारी मानवधन ही पहिली संस्था ठरली आहे. मराठमोळ्या पद्धतीने आयोजित या पदवीदान सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून मानवधन संस्थेचे संस्थापक डॉ. प्रकाश कोल्हे, संस्थेच्या सचिव तथा मुख्याध्यापिका ज्योती कोल्हे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते या चिमुकल्या विद्यार्थ्यांना पगडी घालून सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. ज्योती कोल्हे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रकाश कोल्हे यांनी डिजिटल युगात आपली मुले भरकटू नयेत, यासाठी त्यांना वेळ देऊन त्यांच्या भावविश्वाला जपण्याचे महत्त्व सांगितले. यावेळी पालकांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या समन्वयक म्हणून सारिका पवार व वैशाली पालवे यांनी कार्य सांभाळले. सूत्रसंचालन अपर्णा कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षकांनी अथक परिश्रम घेतले.



### भाजपा मंडल अध्यक्ष जाहीर

**नाशिक : प्रतिनिधी** भारतीय जनता पक्षाने दि.२० एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्रातील १२२१ मंडल अध्यक्षांपैकी ९६३ मंडल अध्यक्षांची निवड जाहीर करण्यात आली. नाशिक शहरातील १० मंडल विभागापैकी ७ मंडल अध्यक्षांची निवड घोषित करण्यात आली. पंचवटी अध्यक्ष - राहुल कुलकर्णी, तपोवन - चंद्रशेखर पंचाक्षरी, नाशिकरोड- शांताराम घंटे, सातपूर - नारायण जाधव, सिडको - राहुल गणोरे, नवीन नाशिक - डॉ.वैभव महाले, पाथर्डी - जितेंद्र चोरडीया. या ७ मंडलाच्या अध्यक्षांच्या नावाची घोषणा सर्व कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांच्या उपस्थितीत निवडणूक अधिकाऱ्यांनी केली. या निवड प्रक्रियेमध्ये सुनील केदार, काशिनाथ शिलेदार, रोहिणी नायडू, महेश हिरे, अमित घुगे, प्रा.कुणाल वाघ, अजिंक्य साने यांनी निवडणूक निरीक्षक म्हणून कामकाज केले. भारतीय जनता पक्ष ही एकमेव संघटना अशी आहे की ज्यांनी एकाच दिवशी संपूर्ण महाराष्ट्रात ९६३ मंडल अध्यक्षांची निवड केली. या निवडीचे भाजपा शहराध्यक्ष प्रशांत जाधव, आ.प्रा.देवयानी फरांदे, आ.सीमा हिरे, आ. राहुल ढिकले, प्रदेश प्रवक्ते लक्ष्मण सावजी, ज्येष्ठ नेते विजय साने, माजी आमदार बाळासाहेब सानप, प्रदीप पेशकार, माजी महापौर सतीश कुलकर्णी, ॲड. श्याम बडोदे, हिमगौरी आडके यांनी अभिनंदन केले आहे.


### अंबड एमआयडीसीत ७ लाखांचे वायर बंडल चोरीला; अज्ञातांविरुद्ध गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी** अंबड एमआयडीसी परिसरातील डी.एस. केबल अँड स्विच गिअर कंपनीच्या गोदामातून सुमारे ७ लाख रुपये किमतीचे वायर बंडल अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि. २० एप्रिलच्या मध्यरात्री २.१३ ते ३.१५ वाजेच्या सुमारास प्लॉट नं. २४, शकुंतला प्लाझा, अंबड एमआयडीसी येथील कंपनीच्या बाजूला असलेल्या गोडावूनमध्ये ही चोरी घडली. चोरीस गेलेल्या मालामध्ये ६ बाय ४ कॉपर अर्माड एफ आर एल एस प्रकारच्या वायर केबलचे ८० मीटर लांबीचे प्रत्येकी सुमारे ४० किलो वजनाचे २८ बंडल आहेत. एका बंडलची किंमत अंदाजे २५,००० रुपये असून, एकूण मालाची किंमत सुमारे ७ लाख रुपये आहे. या प्रकरणी संदिप उत्तम कारे (वय ४६, रा. उमा पार्क ओ-१०, न्यू अंबिका नगर, डीजीपी नगर, अंबड, नाशिक) यांनी अंबड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.असुन पुढिल तपास अंबड पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राकेश हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक दिलीप भंडे करीत आहेत

## पोकार कॉलनीतील स्थिती; वीस वर्षांपासून विकास नाही

# उद्यानात नागरिकांऐवजी पाळीव श्वानांचाच 'मॉर्निंग वॉक'





उद्यानाच्या आवारात पडलेला पालापाचोळा तर दुसऱ्या छायाचित्रात उद्यानाच्या आवारातील पाथ वेवरील पेव्हर ब्लॉकची अवस्था.

**पंचवटी : सुनील बुणगे** प्रभाग क्रमांक एक मधील दिंडोरी रोडवरील पोकार कॉलनीत साधारण १५ ते २० वर्षांपूर्वी उद्यान विकसित करण्यात आले. परंतु या उद्यानात कोणत्याच प्रकारची सुविधा नाही, खेळणी नाही. सध्या परिसरातील नागरिक पाळलेल्या श्वानांना घेऊन जात असून, हे उद्यान नागरिकांसाठी की श्वानांसाठी असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दिंडोरी रोडवरील पोकार कॉलनीत १५ ते २० वर्षांपूर्वी उद्यान विकसित करण्यात आले आहे. विकसित करण्यात आले तेव्हापासून या उद्यानात एकही खेळणी नाही. केवळ पाथ वे तयार करण्यात आले आहे. उद्यानाची अवस्था बघता याठिकाणी असलेल्या पाथ वे वर बसविण्यात आलेले पेव्हर ब्लॉक देखील निघून गेले आहेत. गेल्या १५ ते २० वर्षांत केवळ ठेकेदार पोसण्याचे काम उद्यान विभागाकडून केले जात आहे. पोकार कॉलनी परिसरात मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती असून, या परिसरातील नागरिकांना विरंगुळा करण्यासाठी उद्यानाची निर्मिती केली असली तरी नागरिकांना मात्र फायदा होताना दिसत नाही.उद्यानाच्या आवारात केवळ मोजकेच झाडे असून, गाजरगवत उगवलेले आहे. उद्यानाच्या आवारात आठ ते दहा दिवसांतून एखाद्या वेळी पाणी मारले जात असल्याचे परिसरातील नागरिकांनी सांगितले. शहरातील अनेक उद्यानांची दुर्दशा झालेली असून, महापालिकेचा उद्यान विभाग नेमका काय करतो? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. मध्यंतरी आयुक्त मनीषा खत्री यांनी शहरातील उद्यानांची पाहणी केली होती. मात्र, काहीच कार्यवाही पुढे झालेली नाही. शहरातील अनेक उद्यानांमध्ये मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला आहे. अनेक उद्याने मद्यपी आणि गर्दुल्यांचे अड्डे बनलेले आहेत. महापालिका उद्यानावर लाखो रुपयांचा खर्च केला जात असताना पालिकेच्या उद्यानांना अवकळा प्राप्त झालेली आहे. सातपूर, सिडको, नाशिकरोड या भागातील उद्यानांची अवस्थाही अतिशय दयनीय झालेली आहे.

#### नागरिकांनी हटकल्यास वादाचे प्रसंग

पोकार कॉलनी परिसरात मोठ्या प्रमाणात नागरी वस्ती आहे. उद्यानाच्या बाजूला नागरिक राहतात. या उद्यानात लहान मुलांना खेळण्या बागडण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या खेळण्या नाही. परिसरातील नागरिकांनी पाळलेले श्वान नागरिक सकाळ सायंकाळ घेऊन येत असतात. हे श्वान उद्यानाच्या आवारात घाण करतात. नागरिक श्वान मालकांना बोलायला गेल्यास वाद देखील उद्भवतात असेही नागरिकांनी सांगितले.

#### लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष

प्रभाग क्रमांक एकमध्ये पोकार कॉलनीचा परिसर येतो.या प्रभागाला महापौर,सलग दोन वेळा स्थायी समिती सभापतीपद तसेच गटनेता पद लाभले होते.तरीही अशा प्रकारे उद्यानाची दुरावस्था असून लोकप्रिनिधींनी याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप परिसरातील नागरिकांनी केला आहे.

#### खर्च गेला कुठे?

गेल्या १५ ते २० वर्षापूर्वी उद्यान विकसित करण्यात आले. परंतु उद्यानात कुठलीही सुविधा नाही.२० गुंठ्यापर्यंत उद्यानाच्या देखभालीसाठी ५ हजार रुपये महानगरपालिकेकडून ठेकेदाराला देण्यात येत असल्याचे उद्यान विभागाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले. मात्र गेले अनेक वर्षे इतका खर्च होऊनही उद्यानाची अवस्था बघता इतका खर्च गेला कुठे? असा देखील प्रश्न उपस्थित होतो.

## ना.रोडला पिसाळलेल्या कुत्र्यास जेरबंद करण्यात मनपाला यश

**नाशिकरोड : प्रतिनिधी**

सदगुरूनगर व डावखरवाडी परिसरात एका चिमुकलीसह पाच जणांवर हल्ला करणाऱ्या पिसाळलेल्या कुत्र्यास पकडण्यात मनपाच्या पथकाला यश आले आहे.



महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक किशोर गांगुर्डे आणि नितीन टेमघरे यांच्या पथकाने तातडीने कारवाई करत कुत्र्याला जेरबंद केले. हल्ल्यात नितीन पंडित, देवांशी सोरे, सतीश चंदनशिवे, राज पिंजारी, अनिता गावित यांच्यावर हल्ला केला होता या सर्व जखमींवर सद्या वैद्यकीय उपचार सुरू आहेत. दरम्यान, या हल्ल्यांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. लहान मुले, वयोवृद्ध आणि महिलांना घराबाहेर पडणं कठीण झाले होते.

> भटक्या कुत्र्याच्या चाव्यानंतर जखमी नागरिक बिटको हॉस्पिटल येथे उपचार घेण्यास जातात परंतु औषधांच्या तुडवड्यामुळे त्यांना वणवण फिरावे लागले. कुत्र्याच्या चाव्यामुळे गंभीर रोग होतो. अँटिबायोटिक्स २४ तासांच्या आत घेणे गरजेचे असते. अशा परिस्थितीत औषधे उपलब्ध नसल्यामुळे जखमींना गंभीर परिणाम भोगावे लागतील.याची दाखल प्रशासनाने घेतली पाहिजे
> **- नितीन पंडित,** शहर उपाध्यक्ष, मनसे

## नांदगावला २४ पासून बाल बालसंस्कार शिबिर

### नंदकिशोर महाराज यांची माहिती: बाल मनावर होणार संस्कार

**नाशिक : प्रतिनिधी** नांदगाव येथे श्री विठ्ठल वारकरी शिक्षण संस्थेचे गुरुवार दि.२४ एप्रिल ते १२ मे या दरम्यान बालसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर महाराज दौंड यांनी दिली. महिनाभर हे बालसंस्कार चालवले जाणार असल्याची माहिती आयोजक नंदकिशोर महाराज दौंड यांनी दिली.



शहरातील जतपुरा रोडवरील हनुमान नगर येथे सदर शिबिर होत आहे. आधुनिकतेच्या युगात अध्यात्माची बालपणीच संस्कार व्हावेत. तसेच भौतिक साधनसामग्रीने संपन्न होत असलेले मानवी जीवन स्वैराचार स्वार्थी तसेच वैयक्तिक नैराश्याने ग्रासलेले दिसून येते आहे. सध्याची पिढी विवेक, योग्य अयोग्य आणि कुटुंब वात्सल्यापासून दूर जात आहे. संस्कारयुक्त समाज हीच शिक्षणाची ठेवण असावी. माणसाचा सामाजिक, राजकीय, आर्थिक विकास होत असताना संस्कार हे सदैव, आचरणात असले पाहिजे. त्याची सुरुवात बाल्यावस्थेपासून झाली तरच विद्यमान जग आणि माणुसकीचा ताळमेळ आदर्श व्यक्तिमत्त्व विकास दूरदृष्टी व सत्शील समाज देश धर्म हे कुटुंब म्हणून सांभाळणारी पिढी घडविण्यासाठी हे बालसंस्कार आयोजित केल्याचे आयोजक नंदकिशोर महाराज दौड यांनी म्हटले आहे. शिबिराच्या समारोप प्रसंगी ज्ञानेश्वर महाजन बोगीर यांचे १० मे रोजी सायंकाळी सहा ते आठ, अक्रूर महाराज साखरे यांचे ११ रोजी तर सोपान महाराज सानप यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होईल. दरम्यान, या बालसंस्कार शिबिरात योगासने, प्रार्थना व सुविचार, गीतापाठ, गायन वादनाचा क्लासेस, शालेय विषय व्याकरण, विविध विषयात पारंगत असलेल्या व्यक्तींची व्याख्याने, सायंकाळी साडेचार ते साडेपाच संगीत क्लास, सहा ते आठ हरिपाठ व सांघिक खेळ, रात्री भोजन व रात्री दिवसभरातील विषयावर शंकांचे समाधान अशी दररोजची दिनचर्या असणार आहे. शिबिरात शिक्षकवृंद म्हणून संगीतविशारद सदानंद महाराज कडुळे, वारकरी चालीसाठी समाधान महाराज स्वामी, पांडुरंग महाराज भोसले, गोविंद महाराज कणसे आदींसह महाराष्ट्रातील गायक वादक विदयार्थ्यांना धडे देणार आहेत. नांदगाव तालुक्यातील पालकांनी आपल्या पाल्यांना शिबिरात दाखल करून त्यांच्या मनावर अध्यात्मिक संस्कार घडवून घ्यावे.असे आवाहन नंदकिशोर महाराज दौंड यांनी केले.



## भक्ती नांदुर्डीकर यांच्या सुरांनी गुंजला भक्तिरस

### विविध रचनांतून साकारली आध्यात्मिक अनुभूती

**नाशिक : प्रतिनिधी** तरल स्वरांचे माधुर्य , स्वरांची लय व उपजत अभिजात स्वर यांचे गोंदण घेऊन सुर विश्वास ची मैफल उत्तम.रंगली. यातून ईश्वर भक्तीची आस उपस्थितांनी अनुभवली. नव्या पिढीतील कलाकारांच्या अविष्काराला हक्काचे व्यासपीठ देण्यासाठी 'सूर विश्वास' या अनोख्या मैफलीचे आयोजन करण्यात आले होते भक्ती नांदुर्डीकर यांचे शास्त्रीय गायन संपन्न झाले. वैष्णवी भडकमकर,(तबला), अभिजीत भटजिरे (संवादिनी) यांची त्यांना साथसंगत केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.स्मिता मालपुरे यांनी केले.विश्वास गार्डन, ठाकूर रेसिडेन्सी येथे हा कार्यक्रम झाला. उदयोन्मुख कलावंताच्या प्रयोगशीलेचा अविष्कार रसिकांना दर महिन्याला अनुभवण्यास मिळत आहे.मैफलीची सुरुवात हो करतार या बडाख्याल रचनेने झाली. या बंदिशीच्या गंभीर आणि रसपूर्ण राग अहिर भैरवच्या गहिऱ्या स्वरांनी समर्पक साथ दिली. आलाप व तानांच्या प्रयोगातून भक्ती यांनी रसिकांना ध्यानात्मक अनुभव दिला.कार्यक्रमाचा समारोप पदमनाभा नारायणा या अभंगाने झाला.कलावंतांचा सन्मान शौर्य संगीत.अकादमीच्या सुमित्रा पाटोळे ,चित्रकार, सुहास जोशी,अमेय दीक्षित,यांचे हस्ते करण्यात आला.गायिका मधुरा बेळे केतन इनामदार यांचाही सन्मान करण्यात आला.यावेळी विश्वास ज्ञान प्रबोधिनी फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ.मनोज शिंपी उपस्थित होते.

## सिडकोत भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट नागरिकांत भीती;मनपाचे दुर्लक्ष

**नाशिक : प्रतिनिधी**

सिडकोच्या गणेश चौक परिसरात विविध ठिकाणी भटक्या कुत्र्यांनी मोठ्या प्रमाणात उच्छाद मांडला असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महापालिकेने या मोकाट कुत्र्यांचा तातडीने बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

या परिसरात भटक्या कुत्र्यांनी अनेक लोकांना चावा घेतला असून, रस्त्याने जा-ये करणाऱ्या लोकांवर तसेच वाहनांवर ही कुत्री भुंकत वाहनांच्या मागे लागत असल्याने अपघात होण्याची शक्यता आहे.

गणेश चौक येथे दाट वस्ती असून याठिकाणी चौका-चौकात लहान मुले खेळत असतात. त्यामुळे या भटक्या कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांनी महापालिकेकडे केली आहे.

गणेश चौक, सोनवणे चाळ, तानाजी चौक - स्वामी समर्थ केंद्र, दत्त चौक आदी ठिकाणी भटक्या कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. नागरिक व लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारामुळे नागरिक भयभीत झाले असून यापूर्वी सुद्धा भटक्या कुत्र्यांनी या परिसरात थैमान घातले होते. भटक्या कुत्र्यांच्या त्रासामुळे नागरिक सकाळी व रात्री पायी फिरण्यासाठी घराबाहेर सुद्धा निघू शकत नाही. भटक्या कुत्र्यांनी धुमाकूळ घातल्याने नागरिक त्रस्त झाले असून, या संदर्भात महापालिकेला वेळोवेळी कळवून देखील महापालिका कार्यवाही करीत नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

> गणेश चौक – सोनवणे चाळ या ठिकाणी भटक्या कुत्र्यांमुळे लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिकांना घराबाहेर पडणे अवघड झाले आहे. सकाळी शाळेत, क्लासला जाणारी मुले, फिरायला जाणाऱ्या जेष्ठ नागरिकांना या भटक्या कुत्र्यांचा सामना करावा लागत आहे. पूर्वी या ठिकाणी अनेक लोकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेत जखमी केले आहे. त्यामुळे येथील नागरिक भयभीत झाले असून महापालिकेने या भागातील भटक्या कुत्र्यांचा ताबडतोब बंदोबस्त करावा.
> **-मंगेश पाटील (स्थानिक नागरिक)**

## आदिवासी मंत्री न केल्याची झिरवाळ यांची खंत

# खुंटविहिरला आदिवासींचा विवाह सोहळा उत्साहात

**सुरगाणा : प्रतिनिधी** आयोजकांनी चूकून आदिवासी विकास मंत्री असा उल्लेख केला. मी आदिवासी विकास मंत्री नव्हे. मात्र आदिवासी आहे हे निश्चित, अशी खंत अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी व्यक्त केली.

डांग जिल्हा गुजरात सीमेलगत खुंटविहीर येथे श्री सत्य साई सेवा समिती कडोली, मरोली विभाग नवसारी गुजरात यांच्यातर्फे आयोजित सामूदायिक विवाह सोहळ्याप्रसंगी केले. या विवाह सोहळ्या प्रसंगी कळवण सुरगाणा विधानसभेचे आमदार नितीन पवार, साक्री विधानसभेच्या आमदार मंजुळा गावित,आदिवासी सेवक चिंतामण गावित, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भिका राऊत, एन.डी गावित, समीर चव्हाण, गोपाळ धूम, भिका राठोड, सरपंच आनंदा झिरवाळ, विजय कानडे, तुळशीराम महाले,पांडुरंग वाघमारे, नवसू गायकवाड, रामदास केंगा, रामदास गवळी, सत्य साई सेवा समितीचे हसमुखभाई मिस्त्री, हंसाबेन मिस्त्री, हरीश भाई पटेल शैलेशभाई पटेल, राजुभाई शाह, मोहिनीबेन वाणी, एन.डी.गावित, तहसिलदार रामजी राठोड, पोलीस निरीक्षक राहुल मोरे आदी उपस्थित होते. सामुदायिक विवाह ही आज काळजी गरज बनली असून जेष्ठ दिवगंत कार्यकर्ते हरिभाऊ महाले यांनी ४० वर्षापूर्वी काळाची गरज ओळखून सामुदायिक विवाह सोहळ्याला सुरुवात केली होती. असेही झिरवाळ म्हणाले.

खुंटविहीरचे सरपंच आनंदा झिरवाळ यांनी करून दाखवली याबाबत कौतुक केले. या सोहळ्यात परिसरातील सरपंच, उपसरपंच, सदस्य, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते आदी बहुसंख्येने उपस्थित होते.

